श्री लक्ष्मीनारायण शिक्षण प्रसारक मंडळ

[मु. कशेळी. ता. राजापूर, जि. रत्नागिरी]

या संस्थेचे

# विठ्ठल सीताराम गुर्जर विद्यामंदिर

# स्मरणिका



कै. वि. सी. गुर्जर २५ वा स्मृतिदिन

शनिवार दिनांक १९ सप्टेंबर १९८७



साहित्यसेवक कै. विठ्ठल सीताराम गुर्जर

# विठ्ठल सीताराम गुर्जर स्मारक समिती, मुंबई.

अध्यक्ष – श्री. जगन्नाथ रा. नाफडे

उपाध्यक्ष – श्री. वामनराव बा. कुलकर्णी

श्री. राजा र. सुतार

श्री. हरीश्चंद्र ना. कशेळकर

प्र. कार्यवाह – श्री. गणपत म. ठकरुल

सह कार्यवाह – श्री. मधुकर मा. पेडणेकर

,, नरेंद्र ह घाणेकर

,, बाळकृष्ण जा. ठकरुल

खजिनदार – श्री. चंद्रकांत र. कशेळकर

## –कार्यकारिणी सदस्य–

श्री. द्वारकानाथ भि. पोतडे
,, दिगंबर सी. फोडकर
,, विश्वनाथ प. कशाळकर
,, चंद्रकांत भा. भागवत
,, मनोहर तु. भिगार्डे
,, भालचंद्र सो. चांदोरकर
,, शांताराम वि. भागवत
,, रामचंद्र ध. सातोपे
,, पर्शुराम बा फणसे
,, विष्णू स. भोसले

श्री. वसंत ता. बावकर
,, गौतम र. फोडकर
,, शंकर ना. गोठणकर
,, अनंत म. पवार
,, दत्ताराम का. वेल्ये
,, रघुनाथ स. वाडकर
,, दत्ताराम के. डुकळे
,, सखाराम भा. लाखण
,, सखाराम का. फोडकर
,, गंगाराम गो. पाटील



# वि. सी. गुर्जर विद्यामंदीर कशेळी

१९८७-८८

## —: प्रार्थना :—

### ※ मानव सर्व समान ※

तव तेजः कण मनुज दयाधन, कुणी थोर ना सान
मानवतेच्या मंदिरात या, मानव सर्व समान ।।धृ।।

उगम तुझ्यातून विलय तुझ्यातच तू जग जीवनमान
तुझ्या कृपेचा मेघ वर्षतो, सर्वाठायी समान
चराचरांतून भरून राहिले तव चैतन्य महान ।।१।।

प्राणिमात्रही अविष्कार तव स्थूल सुक्ष्म सर्वा
विश्वामाजी व्यापियलेसी आत्मतत्वां
भेदभाव ही करून राहिला केवळ मानव अजाण ।।२।।

जातिधर्म विसरून अवघे जन एकरूप व्हावे
दुःख हरावे, दैन्य नुरावे, सकळ सुखी व्हावे
एक आईची जशी लेकरे ऐसे दे वरदान ।।३।।

"कवी व गायक"
'अरविंद पोवार'
"कोल्हापूर"

# श्री लक्ष्मी नारायण शिक्षण प्रसारक मंडळ, कशेळी

रजि. नं. / स्थापना-पी.टी. आर. आर. ई-२३०/१६-६-१९६७

## -: विद्यमान पदाधिकारी :-

सन १९८७-८८

| | | |
|---|---|---|
| श्री. जनार्दन विश्वनाथ कशेळकर | : | अध्यक्ष |
| ,, सदाशिव भगवंत पळसुले | : | उपाध्यक्ष |
| ,, दामोदर बाळाजी कुलकर्णी | : | ट्रस्टी |
| ,, बाळकृष्ण धोंडू फणसे | : | सभासद |
| ,, भिकाजी सखाराम शिरवडकर | : | सभासद |
| ,, अनंत हरी मांडवकर | : | सभासद |
| ,, सदाशिव धकटू ठुंबरे | : | सभासद |
| ,, विनायक रामचंद्र नाफडे | : | सभासद |

## -: हायस्कूल कमिटी :-

१९८७-८८

| | | |
|---|---|---|
| श्री. सदाशिव भगवंत पळसुले | – | चेअरमन व सरपंच |
| ,, नझीर करीम मुल्ला | – | सेक्रेटरी, (स्कूल कमिटी) मुख्या. |
| ,, रमेश पांडूरंग ओळकर | – | उपसरपंच |
| ,, रमाकांत भार्गव हळदणकर | – | सभासद |
| ,, भास्कर नारायण भागवत | – | सभासद |



प. पू. स्वामी गगनगिरी महाराज यांचा आशिर्वाद

# विमलज्ञान

गेली कित्येक वर्षे अशा संदेशामार्फत माझे काही थोडे विचार लोकांपुढे मांडले जातात. हे एक चांगले कार्य आहे. समाजाला सुद्धा साधूचे विचार कळण्याचा तो एक योग असतो. परंतु मी वापरीत असलेले शब्द अगर विचार हेच सर्वस्व नाही. मला जे सांगावयाचे आहे ते शब्दांपलीकडचं काही आहे. ते ज्ञान, मग त्याला तुम्ही बोध म्हणा - प्रबोध म्हणा ती एक विमल ज्ञानाची अवस्था आहे.

तुमच्याशी बोलत असताना या क्षणाला उलट माझ्यात काय घडतंय ते मी तुम्हाला सांगणार आहे. इथली कोणतीही बाह्य घटना मला त्या त्या वस्तूमार्फत नवं ज्ञान देत रहाते व अंतर्मुख बनविते. तो भारद्वाज पक्षाचा आवाज तुम्हाला ऐकू येतोय? त्या आवाजाकडे कांही क्षण संपूर्ण लक्ष अगर चित्त केंद्रित करा त्या पक्ष्याचा आवाज ऐकत असताना माझ्या शरिरातील सूक्ष्म ज्ञानतंतूंच्या गाभ्यात एक प्रकारचे कंपन व काही नव्या संवेदना सुरु झाल्या. मन अगदी शांत होऊन त्यात एक लयनिर्माण झाली आणि ती लय लागल्यामुळे काही क्षण वातावरण संगीतमय व पवित्र बनलं, हा आत्मबोध!

या अवस्थेत आत्मविश्वास व चातुर्याचा भाग आहे ही सगळी जिवंत ज्ञानाची प्रक्रिया-शब्दा-पलीकडची इथं पांडित्य नाही, ग्रंथ नाहीत व कोणत्याही प्रकारचा कर्मठपणाही नाही. सोसाटयाचा वारा, पावसाच्या सरीमागून सरी येण्यातील संगीत किंवा गडावरील आषाढ महिन्यातील धुकं मला अंतर्मूख करतं व तेज व शक्ती देऊन जातं. एवढंच नव्हे तर एखादं संकट जरी माझ्यावर आलं तरी महाराज त्याला सामोरे जाऊन त्या संकटातील शक्ती ग्रहण करतात. व त्यातूनच त्या संकटावर मात करण्याचं उत्तर काढतात. येणारं संकट एक नवी शक्ती आतील ज्ञानतंतूना देऊन लय व आनंद समृद्ध करतं अशा लयींत संघर्ष व द्वैत ओलांडण्याची ताकद असते व ऐक्याचे नाते जोडले जाते. तेव्हा दररोजच्या जीवनातसुद्धा आव्हाने साधूला ज्ञान, चातुर्य व आत्मविश्वास देतात. बाहेरच्या जगातील नाना वस्तु, नाना विषय व विविध आव्हाने साधूच्या जीवाने स्वीकारली, त्यांचे ज्ञान घेतलं,

भोगलं व तसंच सहजतेनं ते सगळं सोडून दिलं. या वृत्तीनेच त्या साधूला नवंनवं ज्ञान शोधण्याची ग्रहण करण्याची व त्याच्या पलीकडे जाण्याची ताकद निर्माण झाली. तुम्हाला जर ही प्रक्रिया माझ्याकडून शिकता आली तर कोणतेही ग्रंथ अगर कुणाचाही आधार घेण्याची जरुरी भासणार नाही. तुम्ही स्वावलंबी व स्वयंभू व्हाल. खरं आध्यामिक जीवन काय आहे, याची तुम्हाला कल्पना येऊ लागेल. अशी स्वतंत्र "प्रज्ञाजागृतीची विद्या" माझ्याकडून अवगत केल्यास तुमच्या जीवनात एक नवा आत्मविश्वास निर्माण होईल. स्वतःच्या अनुभवावर स्वतंत्र कसं उभं रहायचं, धैर्याने निर्णय कसे घ्यायाचे व स्नेहाने लोकसंग्रह कसा करायचा या युक्त्या कळू लागतील. ही आत्मप्रचितीची वाट आहे. गुरु प्रचिती बरोबर आत्मप्रचितीच्या जीवनाला सुरुवात करणे व त्यातून तुमचं नेहमीचं दैनंदीन जीवन आतून व बाहेरुन समृद्ध करणारं सामर्थ्य त्या विमल ज्ञानात आहे. पुरूषार्थरूपी वैभवाशाली परमार्थाची गुरुदक्षिणा मला तुमच्याकडून अपेक्षित आहे. अशा तुमच्या खऱ्या गुरुदक्षिणेतूनच तुमचं, तुमच्या कुटुंबाचं, तुमच्या भोवतालच्या समाजाचं आणि भारतीय संस्कृतीचं जीवन व्यापक व समर्थ होईल.

"त्रि. सी. गुर्जर विद्यामंदिर" हायस्कूल व "वि. सी. गुर्जर स्मरणिका" प्रकाशन समारंभाला शुभाशीर्वाद!

**स्वामी गगनगिरी महाराज – गगनगड**



मुख्यमंत्री
महाराष्ट्र शासन
मंत्रालय मुंबई–४०० ०३२.
दिनांक १४ सप्टेंबर, १९८७.

कशेळी जिल्हा रत्नागिरी येथील श्री लक्ष्मी नारायण शिक्षण प्रसारक मंडळातर्फे थोर मराठी साहित्यिक कै. वि. सी. गुर्जर यांच्या नावाने एक विद्या मंदिर सुरु करण्यात आले आहे. ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे. कै गुर्जर यांच्या २५ व्या पुण्यतिथीनिमित्त मुंबईमध्ये एका खास समारंभात कै. गडकरी यांच्या "एकच प्याला" नाटकाचा प्रयोग व स्मरणिकेचे प्रकाशन करण्याची कल्पना स्वागतार्ह आहे कै. गुर्जरांचे स्मारक म्हणून स्थापिलेल्या या विद्यामंदिरास महाराष्ट्रातील साहित्यप्रेमी व शिक्षणप्रेमी जनता उत्तम प्रतिसाद देईल अशी अपेक्षा आहे.

नियोजित समारंभ व संस्थेच्या भावी वाटचालीस माझ्या हार्दिक शुभेच्छा.

सही
(शंकरराव चव्हाण)

With Best

Compliments From :

**_M/s. Gandhi Patel & Associates_**

Builders & Developers

'GEETANJALI' OPP. CIVIL HOSPITAL, THANE.



मंत्री
शिक्षण, तांत्रिक शिक्षण व सेवायोजन
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई–४०० ०३२.

दिनांक १४ सप्टेंबर, १९८७.

थोर साहित्यीक आणि कवी श्री. कै. विठ्ठल सीताराम गुर्जर ह्यांच्या स्मरणार्थ कशेळी ह्या त्यांच्या जन्मगावी सुरु करण्यात आलेल्या विद्यामंदिराच्या मदती साठी "एकच प्याला" नाटकाचा प्रयोग सादर केला जात आहे, वाचून आनंद वाटला.

कै. गुर्जर ह्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ विद्यामंदिर करीत असलेले ज्ञान साधनेचे कार्य खरोखरीच स्तुत्य आहे. साहित्याच्या क्षेत्रात गुर्जरांचा वसा आणि वारसा पुढे चालविणारे साहित्य सेवक या विद्यामंदिरातून उदयाला येतील अशी अपेक्षा व्यक्त करुन ह्या नाट्य प्रयोगात व शाळेच्या भावी वाटचालीत सुयश चिंतितो.

सही
(प्रा. राम मेंघे)



मंत्री
शिक्षण, तांत्रिक शिक्षण व सेवायोजन
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई–४०० ०३२.

दिनांक १४ सप्टेंबर, १९८७.

थोर साहित्यीक आणि कवी श्री. कै. विठ्ठल सीताराम गुर्जर ह्यांच्या स्मरणार्थ कशेळी ह्या त्यांच्या जन्मगावी सुरु करण्यात आलेल्या विद्यामंदिराच्या मदती साठी "एकच प्याला" नाटकाचा प्रयोग सादर केला जात आहे, वाचून आनंद वाटला.

कै. गुर्जर ह्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ विद्यामंदिर करीत असलेले ज्ञान साधनेचे कार्य खरोखरीच स्तुत्य आहे. साहित्याच्या क्षेत्रात गुर्जरांचा वसा आणि वारसा पुढे चालविणारे साहित्य सेवक या विद्यामंदिरातून उदयाला येतील अशी अपेक्षा व्यक्त करुन ह्या नाटय प्रयोगात व शाळेच्या भावी वाटचालीत सुयश चिंतितो.

सही
(प्रा. राम मेंघे)

– हार्दिक शुभेच्छा –



# श्री महाकाली कृषि उत्पादन केंद्र

मु. पाथर्डे
ता. राजापूर
जि. रत्नागिरी

प्रोप्रा. : ह. भ. जाधव



मंत्री
सार्वजनिक आरोग्य, ग्रामविकास, दारूबंदी, रोजगार हमी योजना मत्स्यव्यवसाय, बंदरे, खार जमिनी, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये आणि कुटुंब कल्याण
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक १४ सप्टेंबर, १९८७.

रत्नागिरी जिल्हयाच्या राजापूर तालुक्यातील कशेळी येथील श्री. लक्ष्मीनारायण शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेने गत पिढीतील प्रख्यात साहित्यिक कै. विठ्ठल सीताराम गुर्जर यांचे स्मारक म्हणून सुरु केलेल्या विठ्ठल सीताराम गुर्जर विद्यामंदिराच्या आर्थिक मदतीसाठी एक स्मरणिका प्रकाशित करण्यांत येत असल्याचे वाचून आनंद झाला.

कै. गुर्जर हे खऱ्या अर्थाने कोकण पुत्र होते त्यांच्या साहित्याला लोकमान्यता मिळाली तरी कोकणातील कशेळी या आपल्या छोटया गावी राहून अत्यंत व्रतस्थ वृत्तीने अखेर पर्यंत त्यांनी साहित्यसेवा केली. या कोकण पुत्राची यथोचित स्मारक होणे अत्यंत गरजेचे आहे. समाजातील धनिक वर्ग, साहित्य प्रेमी लोक यांनी उदार हस्ते या कार्याला मदत केली पाहिजे. शक्य तेवढया लौकर ही शाळा पूर्ण स्वरुपात उभी राहील असा मला विश्वास वाटतो.

सही
(भा अ. तथा भाई सावंत)

" हार्दिक शुभेच्छा "

# " मंगल एजन्सीज "

## इंडियन ऑइल डीलर्स

ता. राजापूर

जि. रत्नागिरी

*With Best Compliments From :*

**M/s. Dattatray Plastics**

19-A, Haji Kasam Compound, N. M. Joshi Marg, Bombay-400 013.
N. D. Mandavkar Phone : 422 97 16

*With Best Compliments From :*

M/s. Kanchan Shipping Services
Shipping, Clearing & Transport Agents

285, Mougal Building 2nd Floor, Behind Bhagatsingh Road,
Fort, Bombay-400 038.
Offi : 26 94 45, 26 62 03

With best Compliments From :

***M/s. SPECIAL PROCESS EQUIPMENT ENGINEERING CO.***

Office : Arunoday Market Road, Thane-400 601, Tel. C/o. : 50 66 58
Factory : F-1/25 M.I.D.C. Badlapur-421 503.

With Best Compliments From :

***M/s. Jagdish Enterprises***

Manufacturers of Presentation Articles

Daivadnya Dnyatigriha, Padmabai Thakkar Road,
Shivaji Park, Dadar, Bombay-400 028.
Prop. Ashok S. Kashelkar Phone : 430 64 67.



राज्यमंत्री
नियोजन, उद्योग, लाभक्षेत्र विकास प्राधिकरणे (कडा)
बंदरे, मत्स्यव्यवसाय, पुनर्वसन आणि खार जमिनी
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक १४ सप्टेंबर १९८७

श्री. लक्ष्मीनारायण शिक्षण प्रसारक मंडळ कशेळी. ता. राजापूर जिल्हा रत्नागिरी संस्थेतर्फे कै. वि. सी. गुर्जर यांच्या २५ व्या पुण्यतिथी निमित्तानें एक स्मरणिका प्रकाशित करण्यात येत असल्याचे वाचून आनंद झाला.

गेल्या पिढीतील सुविख्यत मराठी साहित्यीक कै. विठ्ठ सीताराम गुर्जर यांच्या साहित्याचा परिचय सर्व स्तरांवरील बांधवांना व्हावा. त्यांच्या कार्याची माहिती पुढील पिढीला व्हावी हा या प्रकाशनाचा महत्वाचा उद्देश आहे. समाजातील साहित्यप्रेमी, शिक्षणप्रेमी लोक स्मरणिकेचे स्वागत करुन प्रस्तुत संस्थेच्या उत्कर्षाकरितां सहकार्य करतील ही मला खात्री आहे.

स्मरणिकेला माझ्या हार्दिक शुभेच्छा.

सही
वि. गो. प्रभुगांवकर

With Best Compliments From :

**Shree Sainath Agencies**

*CLEARING, SHIPPING & FORWARDING AGENTS*

Pantaky House, 8, Maruti Cross Lane, 2nd Floor, Near Handloom House, Fort, Bombay-400 001. Phone : 265659

---

**WITH BEST COMPLIMENTS FROM :**

M/s. Sodhi Transport Company

85, Essaji Street, Bombay-400 003.

703, Swastik Chambers, Sion Trombay Road, Chembur, Bombay-400 078.

Operation : 324172 - 3 Lines, 331871 Admin. : 528309, 528315

---

WITH BEST COMPLIMENTS FROM :

***ADARSH BUILDERS***

***M/s. S. Kumar Const. Co.***

*CIVIL ENGI. & GOVT. CONTRACTORS*

B-1, Rajmahal, Sir M. V. Road, Andheri (E), Bombay-400 069.
Offi : 6300137, 6320423 Resi : 626747

---

WITH BEST COMPLIMENTS FROM

**M/S. M. K. CHEMICALS**

*Prop. M. L. Kashalkar*

13/17, Hanumant Kutir, Shreyas Colony, Aarey Road,
Path No. 2, Goregaon (E), Bombay-400 063. Phone : 694974

---

With Best Compliments From

M/s. R. S. Kandalkar & Co.

CLEARING FORWARDING & SHIPPING AGENTS

Sahayog, Ground Floor, R. No 5, 5-7, Mint Road, Bombay-400 001.
Tel : 264966

दिनांक १६–९–८७

कशेळी गावचे वि. सी. गुर्जर विद्यामंदिर हायस्कूल व वि. सी. गुर्जर स्मारक स्मरणिका प्रकाशन समारंभाचे निमंत्रण मिळाले. समारंभाला उपस्थित राहता येत नाही. या बद्दल खेद वाटतो.
कै गुर्जर या साहित्यिकाशी जरी माझा, दुदैवाने प्रत्यक्ष संबंध येऊ शकला नाही तरी "एकच प्याला" नाटकातील अमर पदे व इतर कथा नाटके, कादंबऱ्या वगैरे साहित्य यांच्या रुपाने त्यांना कोण ओळखत नाही मग माझा अपवाद कोकणी असून कसा?

अशा थोर विभुतीचे स्मारक आपल्या गावाने उभ केलं आहे ही सर्व कोकणवासियासाठी अभिमानाची बाब आहे. या हायस्कूलची भरभराट होवो हीच ईश्वर चरणी प्रार्थना. मलाही या अभिनंदनिय व प्रशंसनीय कामा मध्ये केव्हा तरी सहभागी होता येवो हीच मनिच्छा.

माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा.

सही

अ. र. अंतुले

B. N. BHAGWAT,
YU 0023
At - Post - Kash
Tal. - Rajapur,
Dist. - Ratnagiri.
Pin :- 416707

– हार्दिक शुभेच्छा –

सांस्कृतिक कार्यक्रम व नाटके यासाठी
पडदे व इतर साहित्य

# " मुष्टिफंड संस्था "

मु. पो. कशेळी, ता. राजापूर
जि. रत्नागिरी

**चेअरमन : ज. वि कशेळकर**
**सेक्रेटरी : भा. ना. भागवत**



# शुभसंदेश

ल. र. हातणकर
एम्. एल्. ए. राजापूर
दिनांक १२–९–१९८७

श्री. लक्ष्मीनारायण शिक्षक प्रसारक मंडळ, कशेळी, ता. राजापूर या संस्थेने कशेळी गावचे सुपुत्र आणि थोर साहित्यिक कै. विठ्ठल सीताराम गुर्जर यांच्या नांवे कशेळी, ता. राजापूर या गावी सुरु केलेल्या "विठ्ठल सीताराम गुर्जर विद्या मंदिर" या विना अनुदान तत्वावरील माध्यमिक शाळेच्या मदतीसाठी मुंबईत ता. १९–९–८७ रोजी आयोजित केलेल्या कार्यक्रमाला सुयश चिंतितो.

सृष्टी सौदयाचे लेणे लाभलेल्या कोकणातील कशेळी हे निसर्ग सौंदर्याने नटलेले गांव! कशेळीला पहिल्यांदा पोहचलेल्या कोणाही रसिकाला गावांत एखादा दुसरा दिवस तरी रहावे असा मोह होतोच. कशेळी गावाला केवळ सौंदर्याचेच लेणे लाभले आहे असे नाही तर त्या गावाला स्फूर्तिदायक इतिहासही लाभला आहे शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पुनित झालेल्या या गावाची कीर्ती गावाच्या थोर सुपुत्रानी दूरवर पसरविली आहे. कै. विठ्ठल सीताराम गुर्जर यानी गावाच्या कीर्तीच्या मंदिरावर साहित्याचा कळस चढविला. या थोर सुपुत्राच्या नांवे सुरु करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेला साजिरे स्वरुप यावे यासाठी सुहृदांचे सर्व प्रकारचे सहाय्य लाभेल हे निश्चितच! कार्यकर्त्यांचे व हितचिंतकाचे स्वप्न साकार होवो ही सदिच्छा!

सही
ल. र. हातणकर

*With Best Compliments From :*

## M. B. Eduljee Cassinath Sons

(REGD·)
(Established)

Stevedores, Dubhashes & Contractors

17, A. K. Naik Marg, (Bestion Road), Fort, Bombay-400 001.
Phones : Office : 204 47 08 / 204 16 57
Resi. : 29 30 13
Tel. : Address : Fornitore

---

With Best Compliments From :

## *M/s. Soorajmull Baijnath*

*IRON & STEEL STOCKISTS*

21/22, Loha Bhavan, P. D'Mello Road, Bombay-400 009.
Offi : 332438, 323687 Resi : 8126850 Cable : 'BILLETS'

Branches : MADRAS ★ CALCUTTA ★ DELHI ★ SONEPAT
H O. : 188, Canning Street, Calcutta-700 001.

---

*25 YEARS OF SERVICES TO THE NATION & YOU*

## M/s. Rekhi Roadlines Pvt. Ltd.

707, Swastik Chambers, Junction of Sion-Trombay Road,
Kurla Mahul Road, Bombay-400 071.

Phone : 523422. 523423, 523424 Gram : REKHISTAR

---

With Best Compliments From :

## NAIK ICE & COLD STORAGE

'NAIK BRAND'

Leading Exporter of Marine Sea Food, Shrimps & Lobster Tails
Winner of best Exporters award of Maharashtra State 1982/83
and 1983/84 and award Certificate for year 1984/85
And the Certificate of approciation issued by the
Maharashtra State Financial Corporation, Bombay.

Head Office M. G. Road, Ratnagiri.
Phone : 2115, 2853 Resi. : 2151
Cable : Naikfoods Telex : 0144 207 Naik In
Factory : Peth Killa, Ratnagiri. Phone : 2250, 3060

WITH BEST COMPLIMENTS FROM

## Indian Chemical Corporation

Dealers in Industrial Solvents & Chemicals.

319/21, Narshi Ntha Street, Above Dena Bank,
2nd floor, Bombay-400 009.
Tel : 337188, 333237 Resi. : 5125025

## M/s. TEX-CHEM

WITH BEST COMPLIMENTS FROM

5, Prabhadevi Industrial Estate,
Prabhadevi, Bombay-400 025.

## M/s. RADIO ELECTRIC INSTITUTE



394, Bhadkamkar Road
Bombay 400 004.

*With Best Compliments From :*

## M/s.Assam Bengal Roadways Ltd.

1-2-3, Vayapar Bhavan, Ahmedabad Street, Bombay-400 009.
Phone : 333253, 355202, 332610, 332287, 342912
Thane Phone : 501797

With Best Compliments From :

*Mr. VIJENDRA M. SHENAI (Prop.)*

MILAP CINEMA, Milap Estate Pvt. Ltd., S. V Road,
Kandivali (W), Bombay-400 067.

## – हार्दिक शुभेच्छा –

# कशेळी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि.

(स्थापना १९१६)

मु. पो. कशेळी, ता. राजापूर

जि. रत्नागिरी

| | |
|---|---|
| सभासद संख्या | ७७३ |
| सभासद भाग भांडवल | ६५,६५५-०० |
| शासन भाग भांडवल | २०,०००-०० |
| ठेवी | ६८,६४४-०० |
| निधी | ७५,८९६-०० |

खेळते भांडवल ३,६७,७२८-८०

ऑडिट वर्ग "अ"

सेवा : १) शेतकरी कर्ज पुरवठा

२) लघुउद्योग कर्ज पुरवठा

३) शेतकऱ्यांना खत पुरवठा

४) ग्राहक भांडार

५) नियमित व अनियंत्रित कापड दुकान

## कै. वि. सी. गुर्जर यांची प्रसिध्द झालेली पुस्तकें

संगीत नंदकुमार
गौंप्यगोपान
भ्रमनिरसन
संगीत प्रणयमुद्रा
कमळेचे लग्न
संगीत राजलक्ष्मी
(ऐतिहासिक कादंबऱ्या)
जीवन संध्या
शशांक
(सामाजिक)
अंजन
कांचनमाला
कुलकलंक भाग १
,, भाग २
गुणगौरव पूर्वार्ध
,, उत्तरार्ध
देवता भाग २

देवदास
पतिपत्नी भाग २
पौर्णिमेचा चंद्र
प्रेम-संयोग
शारदा
संगम
संसार संसार
स्वप्नभंग
हतभागिनी
हिरक-वलय (लघु कथा)
द्राक्षांचे घोस
प्रेमकहाणी ४ थी-ललित भाग २
भाग्यलक्ष्मी (सामाजिक कादंबऱ्या)
चरित्र हीन (पूर्वार्ध)
,, (उत्त रार्ध)
देवदास
नागमोड
प्रीतीची रीत
शेवटचा परिचय

रामनाथ पंडीत- मराठी रंगभूमी मूलभूत संशोधन केंद्राच्या सौजन्याने

---

हार्दिक शुभेच्छा
**नारायण लक्ष्मण नवाळे**
हॉटेल कशेळी बांध, ता. राजापूर, जि. रत्नागिरी

# DELUXE SHIPPING AGENCY

Deluxe House, 182, Mody Street, Fort Market, Bombay-400 001.
Tel. Off.: 262323, 262324, 267447
Telex: 011-73385 DLUX IN    Cable: KHATOO

---

With Best Compliments From:

## *M/s. SHREERAM*

**CLEARING & FORWARDING AGENCY**
Liceneed Custom House Agents

8/9, Rex Chambers, 1st Floor, Walchand Hirachand Marg,
Opp. Indira Dock, Ballard Estate, Bombay-400 038.
Gram: FAST JOB    Phone: 265210, 260093    Resi: 6362309

---

With Best Compliments From:

## M/S. VENUS STEEL CENTRE

(House of Stainless Steel & Novelties)

Malati Niwas, Library Road, Dadar (W), Bombay-400 028.  Tel.: 4226043

---

With the compliments of

## Volkart Fleming Shipping & Services Limited

*General Agents in India for MAERSK LINE*

21, A. K. Nayak Marg, Post Box No. 481, Bombay-400 001.
Telephone: 2040151/2/3/4 / 2048981

---

WITH BEST COMPLIMENTS FROM:

## *Mr. Vijendra M. Shenai*

(Prop.)

Barkha Cinema, Manmala Exhibitors
Manmala Tank Road, Matunga (W), Bombay-16.

# असे होते अण्णा

डॉ. भाऊ जोशी, आडिवरे

होय ! अण्णा प्रामाणिक होते,

तर्क–शुद्ध तर होतेच होते !

त्याच अस झालं............

अण्णा डॉ. कळक्यांकडून गंभीर शस्त्रक्रिया यशस्वी होऊन गावी आले होते. इथे आल्यानंतर प्रकृतीच्या काही तक्रारी नव्याने सुरु झाल्या. साहजिक मला बोलावणे आले. मीही लगेच 'सावऱ्यात' त्यांच्या घरी गेलो.

प्रथम क्षेम–कुशल झाले. ती त्यांची घरगुती माणसांशी वागण्याची पद्धत होती: नंतर त्यांनी क्रमाने व संथपणे सर्व तक्रारी सांगितल्या. औषधे काय काय सुरु आहेत तेही सांगितले. नंतर मी दर्शन-स्पर्शन–प्रश्न इत्यादी पद्धतीने त्यांना तपासले. 'निदान' काय झाले हे त्यानी तत्काळ व न विसरता विचारले. 'निदान' सांगितले. रोज तीन प्रमाणे आठ दिवसांच्या चौवीस पुड्या देतो. दुधातून घ्यावयाच्या हे सांगितले. इतर किरकोळ पथ्य–पाणीही सांगितले. शुभेच्छा व्यक्त करुन आठ दिवसांनी येतो असे सांगून मी परतलो.

त्याच सायंकाळी आठ दिवसांचे औषध दवाखान्यातून घेऊन त्यांचा गडी गेलाही !

पुन्हा आठ दिवसानंतर मी व योगायोगाने मला गुरुस्थानी असलेले कशेळीचे श्री. नाना (गोविंदराव) हर्डीकर वाटेत भेटल्याने ते, असे आम्ही दोघेही त्यांच्याकडे गेलो. प्रथमदर्शनीअण्णा जरा रागातच दिसले. मला वाटले कदाचित अपेक्षित गुण आला नसेल. पण वस्तुस्थिती अगदी वेगळी होती. त्यांनी गुण चांगला आल्याचे सांगून माझ्याकडे तक्रार केली. म्हणाले – "डॉक्टर, तुम्ही मला २४ पुड्या पाठविल्यात त्या २३ च भरल्या!"

मी लगेच माझा कम्पौंडरवर विश्वास असल्याने म्हणालो,

"अण्णा, असे नाही होणार."

"मग मी खोटे बोलतो?" –अण्णा.

"आपण खोटे नाही बोलणार हेही पटते."..........मी.

"बरे चौवीस पुड्यात विभागावयाचे औषध तेवीसवर विभागल्यामुळे १/२४ ने गुण कमी–जास्त झाला असेल का?" त्यांची शंका.

तेवढ्यात "अरे, भालचंद्रा – तू बोलू नकोस. कम्पौंडर चुकला असेल." नको तिथे नाना मधेच बोलले. मी अंदाज पाहून म्हटले, "अण्णा, पुढील खेपेला बोलू या. मी चौकशी करतो."

"चौकशी जरुर करा. पण मीं कशाला खोटे बोलू डॉक्टर?" पुन्हा एकदा ते म्हणाले. आम्ही निरोप घेतला.

मीं तासाभराने दवाखान्यात येऊन बसलो तर पाठोपांठ अण्णांची चिठी घेऊन खास माणूस आला. नानाही माझ्याबरोबर माझ्याकडे आले होते.

कमालीच्या अधिरतेने पत्र फोडले. चिठीत लिहिले होते...............

डॉ. भाऊ, क्षमस्व !

चौवीसावी पुडी डब्याची भिंत व आतले वेष्टन यामध्ये अडकली होती. आपणास त्रास दिला.

मी व नाना अवाक् झालो.

केवढी तर्कशुद्धता !

केवढा प्रामाणिकपणा !!

प्रांजल कबुली देणारे मोठे मन !!!

जिथे नत–मस्तक व्हावे !!!!

---

शुभेच्छा – मंगल कार्यालय

टिळक आळी, रत्नागिरी. मालक – अण्णा वैद्य

With Best Compliments from :

Shrikant Kanetkar

With Best Compliments From :

M.s. Popatlal L. Sanghivi & Co.

With Best compliments from :

Jogdish N Shetty

RAVI REFRESHMENTS
Mahalaxmi, Bombay-400 026.

With Best Compliments from :

**Dawood Pavaskar & Sons**

With Best Compliments From :

**M/s. Odhavji & Sons**

With Best Compliments From :

***Joy Printers***

Poornima, M G. Road,
Mulund (W), Bombay-80.
Phone : 5600479

With Best Compliments From :

**M/s. Pavasia Exports**

With Best Compliments From :

Lucky Enterprises
**Mfg. of Readymade Garments**

Khambadevi Lane, Dharavi, Sion,
Bombay-17.

With Best Compliments From

*VISHAL CONSTRUCTIONS*

Shivneri Bldg; Kurla (E)

With Best Compliments from

**Balaji Construction Corpn.**

*183, Kika Street, Bombay-400 004.*

# आमचे अण्णा कै. वि. सी. गुर्जर

**– श्री. शं. भा. सावरे**

कै वि. सी गुर्जर यांचे वडील कै. सीताराम बाबाजी गुर्जर हे पुण्याला आपले जावई अण्णा-साहेब भोपटकर यांचेकडे रहात असत. त्यांचे दुसरे जावई कशेळीचे रघुनाथराव कळके हे होत. कै. सीताराम बाबाजी गुर्जर, श्रीकृष्ण गुर्जर पाध्ये व रघुनाथ दामोदर गुर्जर पाध्ये यांचे एकत्र मालकीचे घर कशेळी गावातील सावरे वाडीत होते. याच घरात कै. वि. सी. गुर्जर यांनी सुमारे ४० वर्षे राहून अखंड लेखन केले.

कै. वि. सी. गुर्जर यांना एक मुलगा व दोन मुली होत्या. एक मुलगी बोंद्रे यांचेकडे दिलेली व दुसरी मुटाटचे घाटयांकडे. त्यांचा एक मुलगा गणेश. गणेश यांना लग्नानंतर १ मुलगी व २ मुलगे अशी मुले झाली. ही मुले फारच लहान ३ ते ५ वर्षाची असताना कै. गणेश यांचे आकस्मिक निधन झाले. पुढे कै. गणेश यांच्या सौ.ने आपण स्वतः पुण्याला नोकरी करुन या मुलांचे शिक्षण केले. हे दोनही मुलगे मुंबईत स्थायिक झाले.

कै. वि सी. गुर्जर यांची रहाणी अगदी साधी होती. ते पूर्णपणे निर्व्यसनी होते. त्यांचा स्वभाव थोडा तापट होता. ते मितभाषी व प्रसिद्धि पराङमुख होते रोज सकाळी सूर्यनमस्कार समंत्रक घालून काही योगासनेही करीत असत. नंतर लिखाण करीत. दुपारी १२ चे सुमारास जेवण नंतर थोडी वामकुक्षी. उठल्यावर थोडा वेळ वाचन करुन सायंकाळी ४/५ वाजता फिरण्यासाठी बाहेर पडत. प्रथम सावित्री वडीण येथील स्मशानांत जेथे त्यांच्या ३ वर्षांच्या नातीचा अंत्यविधी केला होता तेथे जाऊन तेथे थोड्या पेपरमिंट गोळ्या ठेवीत व पुढे आपले मेव्हणे कै. रघुनाथराव कळके यांचे घरी वरच्यावाड्याला सुमारे ३ मैल चालत जात. कळके यांचेकडे जाताना पोस्टातून आपले टपाल घेऊन जात. पुढे कळके वारल्यावर तिकडे जाणे बंद झाले. व कै. भास्कर नीळकंठ सावरे व कै. जगन्नाथ विष्णु सावरे यांचेकडे जात असत. बाकी कशेळीत कोणाशी त्यांचा फारसा संबंध नसे. त्यांच्या घराचा पुढचा दरवाजा नेहमी बंद असे त्यांची बैठक मागचे दारी असे.

ते अत्यंत नियमित वागणारे होते दिवसातून दोन वेळा चहा, दोन वेळ जेवण व केव्हातरी चिवडा खात असत. वर्षाचे ४/५ महिने पावसाळी पुणे - मुंबई येथे जात व ७/८ महिने कशेळी गावात रहात. या मुदतीत त्यांना फक्त ४० किलो तांदूळ व २० किलो पोहे लागत. शिवाय रोज १ लिटर दूध लागत असे.

---

शुभेच्छा –

**मे. त्रिमूर्ती मेडिकल स्टोअर्स**

बाजारपेठ, देवरुख.

प्रोप्रा. : पांडूरंग यशवंत आवळकर

ते थोडेसे नास्तिक असावे असे वाटते कारण, ते रोज श्री. शं. भा. सावरे यांचे घरी कनका-दित्य मंदिरातून जात पण देवाला नमस्कार केलेला कोणी पाहिलेला नाही.

ते भावनाप्रधान मात्र होते असे म्हणावे लागेल. कारण वर उल्लेख केल्याप्रमाणे रोज ते स्मशानात जात शिवाय नातीचे मृत्यूचे दिवशी दरसाल दोघेही पतिपत्नी उपास करीत. गावात ज्ञातीमधील कोणाचा मृत्यू झाला तर ते अंत्ययात्रेला हमखास जात असत.

गावातील काही लोकांचे आग्रहास्तव ते काही वर्षे ग्रा. पं. स्कूल कमिटीचे चेअरमन होते. शाळेच्या कामावर व शिक्षकांच्या हजेरीवर त्यांची नियमित देखरेख असे. त्यांचे कारकीर्दीत कशेळी शाळा नं. १ ही आदर्श शाळा ठरली होती कशेळीत त्यावेळी सुरु असलेल्या हायस्कूलकडेही ते लक्ष देत. कशेळी सहकारी पतपेढीच्या कार्यात सदैव मार्गदर्शन करीत. सोसायटीचे इमारतीचे उद्घाटनाचे समारंभासाठी कै. प्र. के. अत्रे यांचे "कवडी चुंबक" नाटक स्थानिक लोकाकडून बसवून घेतले होते. सदर नाटकासाठी त्यांनी खास गाणी लिहून ती ही तयार करुन घेऊन नाटकाचा प्रयोग उत्कृष्ठपणे सादर केला होता.

कै वि. सी गुर्जर उत्तम लेखक होते. त्यांनी शास्त्रीय संगीताचेही शिक्षण घेतले होते. ते वक्तशीर व शिस्तीचे भोक्ते होते. पण त्यांचे जवळ वक्तृत्व कला नसल्यामुळे त्यांची प्रसिद्धी कमी झाली. त्यांना सभाकंप भरत असे.

ते मुंबईला आपली मुलगी कै. विजया बोंद्रे यांचेकडे रहात. पण दुपारचा चहा त्यांचा विविधवृत कचेरीत होत असे. त्यांचे "नंदकुमार" नाटक गंधर्व नाटक मंडळीने बसविले. ते बसवि-ण्यासाठी ते सतत ८ महिने गंधर्व नाटक मंडळीत जात असत. ते नियमितपणे डायरी लिहीत असत. पण त्यांचे मृत्यूनंतर काही वर्षांनी ते रहात असलेले घर पडून गेले त्यामध्ये त्यांचे बरेच लिखाण नष्ट झाले. नाहीतर हा त्यांच्या लिखाणाचा खजिना आज समाजाला बरेच काही शिकण्यास उपयोगी पडला असता.

---


शुभेच्छा –

**दिगंबर गोविंद जोशी**

विद्यामंदीर, पावस.

---

शुभेच्छा –

**संजय पर्शुराम तारळकर** (गणपतीचे कारखानदार)

मु. पो नवेदर, पो. आडिवरे.

  

## दि. १९ सप्टेंबर १९८७ कै. अण्णांची २२वी पुण्यतिथी

कै. अण्णांच्या आत्म्याला आम्हा छात्रवृंदाची भावपूर्ण श्रद्धांजली!

कै. अण्णा! साहित्य क्षेत्रांतील एक निष्काम कर्मयोगीच होऊन गेले. लेखन कार्याचा जागतिक विक्रम करणाऱ्या साहित्यिकाची कोठे नांव निशाणीही दिसत नव्हती. अशा वेळी कशेळीच्या ग्रामस्थांनी त्यांचे स्मारक म्हणून सुरू केलेले हे हायस्कूल पुढील अनेक पिढ्यांना कै. अण्णांच्या साहित्य सुगंधाचा लाभ देईल. या त्यांच्या स्मारकाला आम्ही विद्यार्थी प्राणाचेही मोल देऊन जवळ करू! हीच आमची छात्रवृंदाची श्रद्धांजली!

# वि० सी० गुर्जरांच्या घरी......

ले० मधु मंगेश कर्णिक

श्रावणांतल्या एका सोनेरी सायंकाळी मी कशेळी गावात पोचलो. राजापूर ते कशेळी हे फक्त अठरा किंवा वीस मैलांचे अंतर तोडायला जीपला तब्बल सव्वादीड तास लागला; यावरून रस्ता किती वाईट असावा, त्याची कल्पना येईल. परंतु कशेळीच्या अंगणात पाऊल टाकले नि सगळा शीणभाग नाहीसा झाला. कोकणातील निसर्गसौंदर्याने बहरलेली, नटलेली अनेक गावे माझ्या ओळखीची आहेत. त्या सर्व गावात आता कशेळीचाही समावेश दिलखुलासपणे करायला हवा, असे मी मनाशी म्हणत कशेळीच्या बांधावरील साकव ओलांडून घाटी चढू लागलो. कै० विठ्ठल सीताराम गुर्जरांचे गाव आणि घर पाहण्यासाठी मी कशेळीला आलो होतो नि तिथले गर्द हिरवे भातमळे, हिरव्या झाडीतले टेंगणे डोंगर नि बुलंद घाट्या, पेशवेकालीन चिरेबंदी पाखाड्या, आखीव पाणंदी, रेखीव जुनी घरे, झुळझुळणारे वहाळ आणि सर्वत्र भरून राहिलेली उदात्त, नीरव शांतता यांनी मी प्रथमदर्शनीच मोहित झालो होतो....

विठ्ठल सीताराम गुर्जर या एकेकाळी शेकडो 'गोष्टी' लिहिणाऱ्या प्रख्यात लेखकाचे हे गाव. या थोर लेखकाने आपल्या आयुष्याची अखेर याच गावात घडविली...थोडी-थोडकी नव्हे, बेचाळीस वर्षे गुर्जर कशेळी येथे आपल्या निवांत घरात बैठक मारून लिहीत होते. एकोणीसशेवीस साली त्यांनी 'मनोरंजन' मासिकाचे संपादकत्व सोडले; काशीनाथ रघुनाथ मित्रांचा मुंबईतला सुखद सहवास सोडला आणि ते तडक कोकणातल्या या एकीकडील टोकाच्या, आडवळणाच्या गावी येऊन राहू लागले...बासष्ट साली मृत्यूने गाठेपर्यंत हा लेखणीबहाद्दर, गोष्टीवेल्हाळ लेखक आपल्या जुन्या, कौलारू घरात, टेंगण्या मेजासमोर ठाण मांडून बसलेला होता...

या एकेकाळच्या सर्वांना घरच्या माणसासारखा परिचित असलेल्या, दर आठवड्याला आपण लिहिलेली 'संपूर्ण गोष्ट' न चुकता वाचण्याचा हजारो वाचकांना नाद लावणाऱ्या; पण आज विस्मृतीच्या अंधारात लोपलेल्या लेखकाचे

वि० सी० गुर्जर येथे राहात...



काठी टाकून दूरवर फिरायला जाणे एवढाच त्यांचा दिनक्रम असे. फक्त सावरे नावाचे एक त्यांचे विशेष मित्र होते, त्यांचेकडे जाणे-येणे...बाकी सारा दिवस घराचे दार लावून एकलकोंड्यासारखी त्यांनी ही सारी वर्षे घालवली...

"आश्चर्य आहे! गावात त्यांचे सामाजिक कार्य वगैरे चालत असे की नाही?"

"छे हो! तो त्यांचा पिंडच नव्हता...परंतु अखेरी-अखेरीला त्यांना गांवकऱ्यांनी इंग्रजी शाळेच्या 'स्कूल कमिटी'वर चेअरमन म्हणून आग्रह करून घेतले. तेवढ्या-पुरते त्यांचे सामाजिक म्हणा, शैक्षणिक म्हणा, कार्य झाले—"

"पण तेथेही अण्णा गुर्जरांनी नेमून दिलेले काम चोख बजावले. ते आकस्मिक शाळा तपासणीस जात. शिक्षक वेळेवर येतात की नाही, मुलांची हजिरी वाढते की नाही, वर्ग नीट चालविले जातात की नाही, वगैरे सर्व गोष्टींकडे जातीने लक्ष देत. शेरेबुकात त्यांचे तपशीलवार शेरे पाहायला मिळतात."

भागवतांनी मला एक जुने शेरेबुकच दाखवले. पाच डिसेंबर एकोणीसशेबावन्न रोजींची वि० सी० गुर्जरांची शाळातपासणी. त्यांनी स्वहस्ताक्षरात लिहिलेला शेरा असा—

आज दुपारी ३ वाजता शाळेला भेट दिली. अवघे ३ शिक्षक हजर होते. एक,—श्री० शेजवलकर उशिरा येणार असून, दुसरे श्री० काणेकर पोटदुखीमुळे आले नव्हते. एवढी मोठी शाळा फक्त ३ शिक्षकांवर चालू ठेवणे फार कठीणांपैकी आहे. सर्व शिक्षकवर्गाने लक्ष दिल्यास बरे होईल. बाकी सर्व व्यवस्था ठीक दिसली.

शेरा — ३॥ वाजता

वि० सी० गुर्जर
चेअरमन, स्कूल कमिटी, कशेळी

"पण अण्णा गुर्जरांना सामाजिक जाणीव होती व ते गोरगरिबांबद्दल सहृदयतेनंच विचार करीत हे त्यांनी लिहि-लेल्या दुसऱ्या एका शेऱ्यावरून दिसून येते—" भागवत सांगत होते. त्यांनी तो शेरा दाखवला. अण्णा गुर्जरांनी लिहिले होते—

आज मोठ्या रजेनंतर भेट दिली. २ शिक्षक रजेवर होते. हजेरी अजूनही वाढत नाही. परीक्षा चालू असल्यामुळे वर्गवार चाचणी घेता आली नाही.

एका अतिशय जरुरीच्या उणीवेचा येथे प्रसंगानुरूप उल्लेख करतो. शाळेसाठी एका चांगल्या विहिरीची फार जरुरी आहे. विद्यार्थ्यांना पाण्याची आवश्यकता वाटताच ते आसपासच्या विहिरींकडे जातात. पण त्या इतरांच्या मालकीच्या. म्हणून पाणी मिळणे त्यांच्या मर्जीवर अव-लंबून असते. हरिजन विद्यार्थ्यांना त्यांना बंदी करता येते. सबब या अत्यंत जरुरीच्या बाबीकडे अधिकाऱ्यांनी ताबड-तोब लक्ष देणे अवश्य आहे.

हा शेरा २१।८।५२ चा आहे. वि० सी० गुर्जर

हरिजनांच्या मुलांना पाणी मिळावे, यासाठी मुद्दाम शेरा लिहिणारे गुर्जर प्रत्यक्ष समाजात मिसळत नसले तरी मनाने समाजाला घट्ट चिकटून होते, एवढे आपल्याला कळून येते.

गुर्जर आपल्या त्या जुनाट वास्तूमध्ये जेथे लिहावयास बसत, ती जागा मी पाहिली...पडवीच्या टोकाला, लाकडी रेज्यांच्या भिंतीपाशी ते खाली बसून लिहीत. जवळच एक स्वतंत्र खोली. त्या खोलीत त्यांच्या पुस्तकांच्या ट्रंका असत. त्यांच्या पत्नी इंदिराकाकू आणि ते अशी दोघेच त्या घरात वावरत. नंतर त्यांनी एका लहान नातीला आणले होते. (बहुधा मुलाची किंवा मुलीची ती मुलगी असावी.) या नातीची एक हृदयस्पर्शी आठवण भागवतांनी सांगितली... गुर्जर तसे स्वभावाने गंभीर, अबोल आणि काहीसे तुसडे ...पण ही नात घरात आली नि घरातले वातावरण बदलले. गुर्जरांना गाण्याची आवड होती. एक जुना तानपुराही त्यांच्या संग्रही गवसणीत पडलेला होता.

"अण्णा खुषीत असले की एकटेच तंबोरा घेऊन ॐऽऽऽ ॐऽऽ असे करीत, किनऱ्या सुरात कसले तरी गाणे म्हणत. ते आम्ही लांबून ऐकू...पण नात घरात आली आणि घरात चिमण गाणी सुरू झाली. म्हातारा-म्हातारी पडवीत मोकळेपणी हसू बोलू लागली...नातीला घेऊन आजोबा घाटी उतरून गावात जाऊ लागले. अगदी कनकादित्यासही ते नातीसह जाऊ लागले..." भागवत सांगत होते.

आणि कसलातरी आजार होऊन ती चिमुकली मुलगी देवाघरी गेली. गुर्जरअण्णा नि इंदिराकाकू खचल्या. तानपुरा पुन्हा गवसणीत गेला...मग गुर्जरांनी एक वेगळीच मागणी गावकऱ्यांकडे केली. जिथे त्यांच्या नातीचा अंत्यसंस्कार केला होता तेथली पसाभर जमीन त्यांना विकत हवी होती. स्मशान गावाच्या मालकीचे— अशी जमीन कुणा एका व्यक्तीला देण्याचा पायंडा नव्हता. गुर्जर सरकारदरबारी पत्रव्यवहार करू लागले. पण त्यांच्या प्रयत्नांना यश आले नाही. नातीच्या दहनभूमीवर त्यांना छोटेसे स्मारक बांधायचे होते...मग ते तिच्या मृत्युदिनादिवशी सपत्नीक त्या ठिकाणी

पदे लिहिली, चाली लावल्या आणि दणक्यात नाटक हाणले. आचार्य अत्रे यांची परवानगी प्रयोगासाठी घेतली होती... पण आपली पदे त्या नाटकात घुसडली आहेत, ही गोष्ट अण्णांनी अत्र्यांना कळवली नाही की त्याबद्दल फार ऊहापोह केला नाही! हर्षे शिक्षकांनी त्या नाटकात अण्णांच्या दिग्दर्शनाखाली कामही केले होते...त्यांनी एक पद साभिनय म्हणून दाखवले.

मी हुषार वछत्र तमा न मज लत्र सुरेख पाक्रा करी
धनी मज देई न दमडी जरी ॥ धृ० ॥

अखेर अखेरच्या दिवसांत अण्णा गुर्जर आपल्या आठवड्याच्या गोष्टींतून बाहेर पडून जगाच्या कादंबरीची पाने लिहू लागले होते. हळूहळू ते समाजजीवनात मिसळू लागले होते. करोळी गावासाठी काहीतरी करावे असेही त्यांना वाटू लागले होते. पण आता ते थकले होते. संध्याछाया भिवू लागल्या होत्या. मनात काहीही असले तरी त्याचा स्पष्ट उच्चार कधी झाला नाही. संकल्प मनातच राहिले आणि बेचाळीस वर्षांच्या एका गोष्टीचा मुक्काम पोस्ट करोळी येथे १९–९–१९६२ रोजी अकस्मात शेवट झाला...

इंदिराकाकूंना त्यानंतर करोळीत एकटे राहणे शक्यच नव्हते. त्या पुणे येथे निघून गेल्या. गुर्जरांची कित्येक वर्षांची नियमितपणे लिहिलेली डायरी त्यांच्याकडे आहे. त्या डायरीत तत्कालीन मराठी साहित्य व साहित्यिक यांबद्दलची असंख्य दुर्मिळ स्मरणे ग्रथित केलेली आहेत.

आज गुर्जरांच्या त्या पडक्या, जीर्ण घरात काही फुटक्या औषधाच्या बाटल्या, जुन्या फळ्या, डबे, पाळण्याचे खूर, देव्हाऱ्याचे अवशेष फक्त विखुरलेले आहेत...गुर्जरांचे लिहिण्याचे मेज, झोपायची खाट किंवा त्यांच्या स्पर्शाचा वारसा सांगणारी एकही वस्तू आज तिथे अस्तित्वात नाही...आहे ते फक्त एक उजाड घर...आणि दारात आणि परसात माजलेली अस्ताव्यस्त झाडे, वेली...

गुर्जरांच्या हजार गोष्टींपैकीच एखादी करुणरसप्रधान शोकांतिका गुर्जर आपल्या त्या वास्तूच्या रूपाने तिथे ठेवून गेले असावेत असे मला निघताना वाटले.

करोळी गावातली श्रावणातली सोनेरी उन्हे आता काळवंडली होती...मी गच्च मनाने परत घाटी चढत होतो.

□ □

(हा लेख लिहिताना श्री० वा० रा० ढवळे, मुंबई आणि श्री० भास्कर नारायण भागवत, श्री० सावरे, श्री० दीक्षित, श्री० प्रभाकर दत्तात्रेय हर्षे, करोळी यांनी पुरविलेल्या माहितीचा खूप उपयोग झाला. छायाचित्रे श्री० प्रकाश विश्वासराव यांनी घेतली आहेत. लेखक या सर्वांचा ऋणनिर्देश करीत आहे.)







## दि. १९ सप्टेंबर १९८७ कै. अण्णांची २२वी पुण्यतिथी

कै. अण्णांच्या आत्म्याला आम्हा छात्रवृंदाची भावपूर्ण श्रद्धांजली!

कै. अण्णा! साहित्य क्षेत्रांतील एक निष्काम कर्मयोगीच होऊन गेले. लेखन कार्याचा जागतिक विक्रम करणाऱ्या साहित्यिकाची कोठे नांव निशाणीही दिसत नव्हती. अशा वेळी कशेळीच्या ग्रामस्थांनी त्यांचे स्मारक म्हणून सुरू केलेले हे हायस्कूल पुढील अनेक पिढ्यांना कै. अण्णांच्या साहित्य सुगंधाचा लाभ देईल. या त्यांच्या स्मारकाला आम्ही विद्यार्थी प्राणाचेही मोल देऊन जवळ करू! हीच आमची छात्रवृंदाची श्रद्धांजली!

शुभेच्छा

## मोतिराम यशवंत शेटचे

किराणा जनरल स्टोअर्स

मु राजवाडी, ता. राजापूर, गि. रत्नागिरी

शुभेच्छा

## मरीन डिपार्टमेंट खारलँड व बिल्डींग कॉन्ट्रक्टर

गोविंदराव तोडणकर

गव्हर्नमेन्ट कॉन्ट्रक्टर

मु. पो. गावखडी, ता राजापुर, जि. रत्नागिरी

शुभेच्छा

## श्री गगनगिरी सॉ मिल्स

इमारती व लाँचसाठी लाकुड योग्य भावात मिळेल

प्रोप्रा भालचंद्र धोंडू सागवेकर

राजेश फिश फॅक्टरी फोन नं. २२

ड्रायफिश, फिश, मॅन्युअर यांचे उत्पादक

प्रोप्रा नारायण शंकर सागवेकर

मु. पो. नाटे. ता राजापुर

शुभेच्छा

## सुश्रीका स्टोअर्स

वाडापेठ – आडिवरे

ता. राजापूर, जि. रत्नागिरी

# वि॰ सी॰ गुर्जरांच्या घरी......

ले॰ मधु मंगेश कर्णिक

श्रावणांतल्या एका सोनेरी सायंकाळी मी कशेळी गावात पोचलो. राजापूर ते कशेळी हे फक्त अठरा किंवा वीस मैलांचे अंतर तोडायला जीपला तब्बल सव्वादीड तास लागला; यावरून रस्ता किती वाईट असावा, त्याची कल्पना येईल. परंतु कशेळीच्या अंगणात पाऊल टाकले नि सगळा शीणश्रम नाहीसा झाला. कोकणातील निसर्गसौंदर्याने बहरलेली, नटलेली अनेक गावे माझ्या ओळखीची आहेत. त्या सर्व गावात आता कशेळीचाही समावेश दिलखुलासपणे करायला हवा, असे मी मनाशी म्हणत कशेळीच्या बांधावरील साकव ओलांडून वाटी चढू लागलो. कै॰ विठ्ठल सीताराम गुर्जरांचे गाव आणि घर पाहण्यासाठी मी कशेळीला आलो होतो नि तिथले गर्द हिरवे भातमळे, हिरव्या झाडीतले टंगणे डोंगर नि बुलंद घाट्या, पेशवेकालीन चिरेबंदी पाखाड्या, आखीव पाणंदी, रेखीव जुनी घरे, झुळझुळणारे वहाळ आणि सर्वत्र भरून राहिलेली उदात्त, नीरव शांतता यांनी मी प्रथमदर्शनीच मोहित झालो होतो....

विठ्ठल सीताराम गुर्जर या एकेकाळी शेकडो 'गोष्टी' लिहिणाऱ्या प्रख्यात लेखकाचे हे गाव. या थोर लेखकाने आपल्या आयुष्याची अखेर याच गावात घडविली...थोडी-थोडकी नव्हे, बेचाळीस वर्षे गुर्जर कशेळी येथे आपल्या निवांत घरात बैठक मारून लिहीत होते. एकोणीसशेवीस साली त्यांनी 'मनोरंजन' मासिकाचे संपादकत्व सोडले; काशीनाथ रघुनाथ मित्रांचा मुंबईतला सुखद सहवास सोडला आणि ते तडक कोकणातल्या या एकीकडील टोकाच्या, आडवळणाच्या गावी येऊन राहू लागले...बासष्ट साली मृत्यूने गाठेपर्यंत हा लेखणीबहाद्दर, गोष्टीवेल्हाळ लेखक आपल्या जुन्या, कौलारू घरात, टेंगण्या मेजासमोर ठाण मांडून बसलेला होता...

या एकेकाळच्या सर्वांना घरच्या माणसासारखा परिचित असलेल्या, दर आठवड्याला आपण लिहिलेली 'संपूर्ण गोष्ट' न चुकता वाचण्याचा हजारो वाचकांना नाद लावणाऱ्या; पण आज विस्मृतीच्या अंधारात लोपलेल्या लेखकाचे

वि॰ सी॰ गुर्जर येथे राहात...



गाव पाहावे, घर पाहावे, त्याच्या आठवणी ग्रामस्थांकडून ऐकाव्या, या हेतूने मी कशेळीला येऊन पोचलो होतो. तेथील श्री० दीक्षित, हर्षे, भागवत या ग्रामस्थांना वाटाडे करून मी अण्णा गुर्जरांच्या घराची वाट चालत होतो.

दमछाक करणाऱ्या एकदोन घाट्या चढून-उतरून गेलो नि झाडीत लपलेली तुरळक घरे दिसू लागली. माझ्याबरोबर चालणारे भागवत आणि हर्षे हे दोघेही शिक्षक. गावाचा इतिहास-भूगोल त्यांना तोंडपाठ. ते सांगत होते— "हे घर शेजवलकरांचे—"

"म्हणजे आपले—"

"तेच ते त्र्यंबक शंकर शेजवलकर!"

मी कुतूहलाने घर न्याहाळले; आज ते बंदच आहे. जुन्या कोकणी बांधणीचे, एखाद्या व्रतस्थ इतिहासकाराची स्थितप्रज्ञावस्था धारण केलेले गंभीर चेहऱ्याचे घर...

"आणि हे राजारामशास्त्री भागवतांचे—"

हे घर मी आत जाऊन पाहिले. या घरात सध्या श्री० हर्षे राहतात. मोठाल्या तुळ्या, रुंद फळ्यांची माडी, प्रशस्त माजघर...बाहेर ओटी, पडवी...घराची निगा चांगली राखलेली....शंभर वर्षापूर्वीचे हे घर आजही दुर्गा भागवतांएवढेच सतेज आणि तरतरीत दिसते.

जरा पुढे घाटी उतरून गेलो. त्या सखल भागात आजू-बाजूला गर्द पावसाळी वनस्पती माजल्या होत्या आणि एक पडकी वास्तू कपाळावर उदासवाणे गंजलेले कुलूप लटकावून मूकपणे उभी होती. घरावरील नळे खसरले होते. छपरावर तेरडे माजले होते. पडक्या भिंतीवर गवत फोफावले होते. वासे काळे होते. आणि कोणत्याही घटकेला ते कोसळू शकेल अशी भीती वाटत होती...माझी शंका खरीच ठरली. हर्षे सांगू लागले—

"हेच अण्णा गुर्जरांचे घर–"

मी क्षणभर उभा राहिलो...हे घर पंधरा वर्षापूर्वी अण्णा गुर्जर जिवंत असताना कसे दिसत असेल, अण्णा गुर्जर दारात उभे राहून आल्यागेल्याचा कसा परामर्श घेत असतील; त्यांच्या 'गोष्टी' इथे कशा लिहिल्या गेल्या असतील, याचे मनाशी चित्र रंगवू लागलो...कल्पनेने साक्षात अण्णा गुर्जरांना पाहू लागलो...'मनोरंजन', 'यशवंत', 'विविधवृत्त', 'वसंत', 'नवाकाळ' यांतून लहानपणी त्यांचे नेहमी 'पाहिलेलं' ठसठशीत नाव आठवू लागलो. तोच हर्षे म्हणाले—"शेजारीच वासूअण्णा गुर्जर राहतात; त्यांचेकडे किल्ली असते—"

आम्ही वि० सी० गुर्जरांच्या घराला भिडून असलेल्या वासुअण्णांच्या घरी गेलो—भागवत म्हणाले,

"वासुअण्णा, हे मुंबईचे पाहुणे आले आहेत...त्यांना अण्णा गुर्जरांचे घर बघायचं आहे—जरा किल्ली देता?—"

"देता येणार नाही!" नव्वदीला पोचलेले, दर्भाप्रमाणे शुचिर्भूत व शुष्क दिसणारे, तीक्ष्ण भेदक डोळ्यांचे, खण-खणीत आवाजाचे गोरेपान वासुअण्णा ठाम, कर्कश आवाजात उत्तरले. आम्ही सारे हतबुद्ध झालो.

"पण का?" हर्षे धीर करून विचारते झाले.

"अण्णा गुर्जराचे घर इथे नाही!"

"पण हे शेजारचं—"

"ते घर तुमच्या अण्णा गुर्जरास कोणी दिले? त्याचा संबंध काय? ते घर माझ्या मालकीचे आहे! तुम्हांस अण्णा गुर्जरांचे घर बघायचे असेल तर ते मला दाखवता येणार नाही. आलात तसे परत जा—"

आता भागवतांच्या आणि हर्षांच्या ध्यानात एकूण प्रकार आला. कोंकणी माणसासारखेच वासुअण्णा नियमां-वर बोट ठेवून बोलत होते...खरोखरच वि० सी० गुर्जर राहात असलेले घर मालकीहक्काने वासुअण्णांचे होते... त्यावर सहज बोलतानासुद्धा वि० सी० गुर्जरांचा मालकीहक्क लादलेले त्यांना पसंत नव्हते.

"तसं नव्हे वासुअण्णा, घर तुमचंच आहे...पण त्यात अण्णा गुर्जर राहायचे म्हणून त्यांचं घर म्हटलं...चूक माफ असावी—"

"तर मग ठीक आहे; बसा या झोपाळ्यावर...सरबत आणतो"—"अहो, त्या अण्णा गुर्जरांचे काय आहे—" असा इतिहास सांगत वासुअण्णा चपळ हालचाली करू लागले. हां हां म्हणता त्यांनी सरबताचे पेले आतून आणून आमच्या हाती दिले. त्यांच्या स्वरातली शुष्कता जाऊन तेथे स्निग्धता निर्माण झाली. हातात किल्ली घेऊन ते स्वतः झाडाझुडुपांतून अण्णा गुर्जर राहात होते, त्या घराचे कुलुप उघडण्यासाठी पुढे झाले.

करकर करीत दार उघडले...आणि त्या कित्येक वर्षे बंद असलेल्या वास्तूचा कुबट, पुरातन वास नाकात भिनला... जवळ एक माचा (लाकडी पलंग) होता...मी विचारले—"इथे झोपायचे का वि० सी० गुर्जर?"

"इथं नाही; हा माचा माझा आहे! अण्णाचा या वस्तूशी काही संबंध नव्हता...नाही!" पुन्हा तो शुष्क, करडा आवाज...मग हर्षे आणि भागवत सांगू लागले.—

वि० सी० गुर्जर बेचाळीस वर्षे कशेळीत राहिले. पण गावाशी त्यांचा तसा फारसा संबंध त्यांनी ठेवलाच नव्हता. स्वतःचे घर, संसार, लेखन, वाचन, पत्रव्यवहार आणि एकवेळ पाय मोकळे करण्यासाठी दोन्ही खांद्यावर पाठीमागे

काठी टाकून दूरवर फिरायला जाणे एवढाच त्यांचा दिनक्रम असे. फक्त सावरे नावाचे एक त्यांचे विशेष मित्र होते, त्यांचेकडे जाणे-येणे...बाकी सारा दिवस घराचे दार लावून एकलकोंड्यासारखी त्यांनी ही सारी वर्षे घालवली...

"आश्चर्य आहे! गावात त्यांचे सामाजिक कार्य वगैरे चालत असे की नाही?"

"छे हो! तो त्यांचा पिंडच नव्हता...परंतु अखेरी-अखेरीला त्यांना गांवकऱ्यांनी इंग्रजी शाळेच्या 'स्कूल कमिटी'वर चेअरमन म्हणून आग्रह करून घेतले. तेवढ्या-पुरते त्यांचे सामाजिक म्हणा, शैक्षणिक म्हणा, कार्य झाले—"

"पण तेथेही अण्णा गुर्जरांनी नेमून दिलेले काम चोख बजावले. ते आकस्मिक शाळा तपासणीस जात. शिक्षक वेळेवर येतात की नाही, मुलांची हजिरी वाढते की नाही, वर्ग नीट चालविले जातात की नाही, वगैरे सर्व गोष्टींकडे जातीने लक्ष देत. शेरेबुकात त्यांचे तपशीलवार शेरे पाहायला मिळतात."

भागवतांनी मला एक जुने शेरेबुकच दाखवले. पाच डिसेंबर एकोणीसशेबावन्न रोजींची वि० सी० गुर्जरांची शाळातपासणी. त्यांनी स्वहस्ताक्षरात लिहिलेला शेरा असा—

आज दुपारी ३ वाजता शाळेला भेट दिली. अवघे ३ शिक्षक हजर होते. एक,—श्री० शेजवलकर उशिरा येणार असून, दुसरे श्री० काणेकर पोटदुखीमुळे आले नव्हते. एवढी मोठी शाळा फक्त ३ शिक्षकांवर चालू ठेवणे फार कठीणांपैकी आहे. सर्व शिक्षकवर्गाने लक्ष दिल्यास बरे होईल. बाकी सर्व व्यवस्था ठीक दिसली.

शेरा — ३॥ वाजता — वि० सी० गुर्जर

चेअरमन, स्कूल कमिटी, कशेळी

"पण अण्णा गुर्जरांना सामाजिक जाणीव होती व ते गोरगरिबांबद्दल सहृदयतेनंच विचार करीत हे त्यांनी लिहिलेल्या दुसऱ्या एका शेऱ्यावरून दिसून येते—" भागवत सांगत होते. त्यांनी तो शेरा दाखवला. अण्णा गुर्जरांनी लिहिले होते—

आज मोठ्या रजेनंतर भेट दिली. २ शिक्षक रजेवर होते. हजेरी अजूनही वाढत नाही. परीक्षा चालू असल्यामुळे वर्गवार चाचणी घेता आली नाही.

एका अतिशय जरुरीच्या उणीवेचा येथे प्रसंगानुरूप उल्लेख करतो. शाळेसाठी एका चांगल्या विहिरीची फार जरुरी आहे. विद्यार्थ्यांना पाण्याची आवश्यकता वाटताच ते आसपासच्या विहिरींकडे जातात. पण त्या इतरांच्या मालकीच्या. म्हणून पाणी मिळणे त्यांच्या मर्जीवर अवलंबून असते. हरिजन विद्यार्थ्यांना त्यांना बंदी करता येते. सबब या अत्यंत जरुरीच्या बाबीकडे अधिकाऱ्यांनी ताबडतोब लक्ष देणे अवश्य आहे.

हा शेरा २१।८।५२ चा आहे. — वि० सी० गुर्जर

हरिजनांच्या मुलांना पाणी मिळावे, यासाठी मुद्दाम शेरा लिहिणारे गुर्जर प्रत्यक्ष समाजात मिसळत नसले तरी मनाने समाजाला घट्ट चिकटून होते, एवढे आपल्याला कळून येते.

गुर्जर आपल्या त्या जुनाट वास्तूमध्ये जेथे लिहावयास बसत, ती जागा मी पाहिली...पडवीच्या टोकाला, लाकडी रेज्यांच्या भिंतीपाशी ते खाली बसून लिहीत. जवळच एक स्वतंत्र खोली. त्या खोलीत त्यांच्या पुस्तकांच्या ट्रंका असत. त्यांच्या पत्नी इंदिराकाकू आणि ते अशी दोघेच त्या घरात वावरत. नंतर त्यांनी एका लहान नातीला आणले होते. (बहुधा मुलाची किंवा मुलीची ती मुलगी असावी.) या नातीची एक हृदयस्पर्शी आठवण भागवतांनी सांगितली... गुर्जर तसे स्वभावाने गंभीर, अबोल आणि काहीसे तुसडे ...पण ही नात घरात आली नि घरातले वातावरण बदलले. गुर्जरांना गाण्याची आवड होती. एक जुना तानपुराही त्यांच्या संग्रही गवसणीत पडलेला होता.

"अण्णा खुषीत असले की एकटेच तंबोरा घेऊन ॐऽऽऽ ॐऽऽ असे करीत, किनऱ्या सुरात कसले तरी गाणे म्हणत. ते आम्ही लांबून ऐकू...पण नात घरात आली आणि घरात चिमण गाणी सुरू झाली. म्हातारा-म्हातारी पडवीत मोकळेपणी हसू बोलू लागली...नातीला घेऊन आजोबा घाटी उतरून गावात जाऊ लागले. अगदी कनकादित्यासही ते नातीसह जाऊ लागले..." भागवत सांगत होते.

आणि कसलातरी आजार होऊन ती चिमुकली मुलगी देवाघरी गेली. गुर्जरअण्णा नि इंदिराकाकू खचल्या. तानपुरा पुन्हा गवसणीत गेला...मग गुर्जरांनी एक वेगळीच मागणी गावकऱ्यांकडे केली. जिथे त्यांच्या नातीचा अंत्यसंस्कार केला होता तेथली पसाभर जमीन त्यांना विकत हवी होती. स्मशान गावाच्या मालकीचे— अशी जमीन कुणा एका व्यक्तीला देण्याचा पायंडा नव्हता. गुर्जर सरकारदरबारी पत्रव्यवहार करू लागले. पण त्यांच्या प्रयत्नांना यश आले नाही. नातीच्या दहनभूमीवर त्यांना छोटेसे स्मारक बांधायचे होते...मग ते तिच्या मृत्युदिनादिवशी सपत्नीक त्या ठिकाणी

जात नि तिथे गुलाबाची फुले, चॉकलेट, **बिस्किटे** अशा तिला आवडणाऱ्या वस्तू ठेवून, क्षणभर डोळे मिटत आणि शांतपणे परत फिरत.

वरवर कठोर, शुष्क दिसणाऱ्या गुर्जरांच्या अंतःकरणातली ही ओल किती वेगळी होती...पण हेच अण्णा गुर्जर एकदा गावातल्या पोस्टमनच्या आणि पोस्टमास्तरच्या पाठीमागे कसे हात धुऊन लागले होते, ते ऐकले म्हणजे त्यांच्या चमत्कारिक उग्र स्वभावाचीही कल्पना येते... गुर्जरांचे रोज खूप टपाल असे. वृत्तपत्रे, मासिके, पत्रे आणि मनिऑर्डरी...पोस्टमनला मैल दीडमैलाचा चढाव चढून त्यांच्या एकट्यासाठी रोज यावे लागे...बाकी वाडीत कुणाचे पत्र फारसे नसेच. मग पोस्टमन आळस करी. एकदम दोन किंवा तीन दिवसांनी तो सावरेवाडीस गुर्जरांचे टपाल देण्यासाठी खेप करी. तोपर्यंत गुर्जरांना धीर धरवत नसे. त्यांचे रोज पोस्टमनशी भांडण होई...मग त्यांनी थेट मुंबईला पोस्टमास्टर जनरलकडे पत्रव्यवहार सुरू केला... दरम्यान गुर्जरांचे एक वाचकमित्र श्री० कुंजविहारी तळपदे हे रत्नागिरीला पोस्टल सुपरिंटेंडंट म्हणून बदली होऊन आले. त्यांनी गुर्जराच्या तक्रारीत लक्ष घातले आणि त्या पोस्टमनची व पोस्टमास्तरची दूर बदली करून टाकली! त्यानंतर आलेल्या पोस्टमनला गुर्जरांची एवढी दहशत वाटू लागली की तो रोज नियमाने दहा वाजता मुंबईतल्याप्रमाणे गुर्जरांच्या दारावर 'पोस्टमनऽ' म्हणून उभा राहू लागला...दहाची वेळ जरा थोडीफार मागेपुढे झाली की गुर्जरांचे पत्र थेट पी० एम० जी० ब्रॅवे यांसच रवाना होई! त्यामुळे बिचारा तो पोस्टमन काही वेळा अर्धाअर्धा तास घाटीच्या पायथ्याशी एका दगडावर दहा वाजण्याची वाट बघत बसून वेळ काढीत नि दहाला एक मिनिट असताना गुर्जरांच्या पावळीत उभा राही! गुर्जर दार किलकिले करून टपाल घेत नि पुन्हा खाडकन दार लावून घेत. पुढे पुढे तर त्यांनी पी० एम्० जी० कडे तक्रार करून पोस्टाची पेटी स्वतःच्या घराच्या भिंतीलाच बसवून घेतली होती.

गुर्जर घरात बसून गोष्टी लिहीत; पण त्याबद्दल गावातील कुणाशीही चर्चा कधी करीत नसत...कुणाला त्या वाचून दाखवीत नसत...कुणी त्या वाचतात का, याचीही चौकशी करीत नसत...पण गावातल्या ब्राह्मण कुटुंबांत त्यांच्या गोष्टी वाचल्या जात. क्वचित ते गावात घडलेल्या एखाद्या हकी-गतीवरसुद्धा नावे बदलून गोष्ट लिहीत...मग गावात चर्चा होई...पण गुर्जरांना त्याबद्दल विचारण्याचे धाडस कुणाला होत नसे...त्यांचा स्नेह कळके-सावरे या कुटुंबांशी... सावरे यांच्याकडून पोहे, तांदूळ, किराणा वगैरे नेमस्तपणे ते नेत. प्रत्येक गोष्टीचा रोखठोक हिशेब ठेवीत... काही रक्कम ते व्याजानेही देत...मुद्दल-व्याजाचा हिशेब पक्का लिहिलेला असे. रोज तांदूळ किती लागतील, दूध किती लागेल, हे पक्के ठरलेले. कुणाला काही देणार नाहीत... कुणाकडून काही घेणार नाहीत...व्यवहाराला अत्यंत दक्ष... बरेचसे कंजूष...काटकसरी...एका तीन पैशांच्या कार्डात आख्ख्या पाकिटाचा मजकूर लिहू शकत...खाण्यापिण्याची मिरास नव्हती...पण आहार चांगला असे. त्यात काटकसर नसे...इंदिराकाकू दोघांसाठी मोजून भजी-चिवडा किंवा लाडू करीत...त्यात तिसऱ्याची तरतूद नसे!

'एकच प्याल्या'च्या गाण्यांच्या रॉयल्टीची बहुधा त्यांना रक्कम मिळत असावी; शिवाय गोष्टींचे पैसे...याव्यतिरिक्त त्यांचे उत्पन्नाचे साधन नव्हते. त्यांना पहिल्या लग्नापासून दोन मुली आणि एक मुलगा एवढी अपत्ये झाली. मग इंदिराकाकूंशी दुसरे लग्न झाले. मुलांपैकी कशेळीस कोणी येऊन राहिले नाही—पण गुर्जर वर्षातून एकदा मुंबईस जात. मुलीकडे, मेहुण्यांकडे राहात...'विविधवृत्ता'च्या कचेरीत नियमित येऊन गप्पागोष्टी करीत...महिना दीड महिन्यांनी पुन्हा सपत्नीक बोटीने कशेळीस परत येत... पुन्हा आठवड्याची संपूर्ण गोष्ट लिहायला बसत...

पग गोष्टी लिहिणारे गुर्जर गाणीही सुरेख लिहीत. 'एकच प्याल्या'तील त्यांची गाणी तर अजोडच आहेत. पण वेळप्रसंगी ते अन्य कारणानेही गाणी लिहीत. कशेळीचे देवस्थान कनकादित्य. त्याच्या जीर्णोद्धार कमिटीवर गावकऱ्यांनी अण्णा गुर्जरांना घेतले. त्यांच्या नावाचा वर्गणी गोळा करण्यासाठी उपयोग व्हावा, हा हेतू. त्या जीर्णोद्धार समारंभ प्रसंगी अण्णा गुर्जरांनी 'ईशस्तवन' व 'स्वागतपर' पद तात्काळ रचून दिले...

## ईशस्तवन

वंदन त्रिभुचरणां। शरणागतां आधार अपारं॥ धृ०॥
हिमगिरिपरि अविरल तुंग। वा सिंधूसा अमितांग॥
जरी जनांचा संकट संघ। क्षणिं तरी करि जो
संसृतिपार॥

आणि त्यानंतर हे स्वागतगीताचे धृपद पाहा—

गमली सुजनी भरली रम्यही सभा
प्राची जणुं दीप्त करी भास्कर प्रभा ॥ धृ० ॥

आणि या पदांना चालीही अण्णा गुर्जरांच्याच! एकदा गाववाल्यांनी 'कवडीचुंबक' नाटक बसवले...त्याचे डायरेक्टर अण्णा गुर्जर होते...१९५४ सालची ही कथा. 'कवडीचुंबका'त पदे हवीत असा अण्णांचा आग्रह. त्यांनी

पदे लिहिली, चाली लावल्या आणि दणक्यात नाटक हाणले. आचार्य अत्रे यांची परवानगी प्रयोगासाठी घेतली होती... पण आपली पदे त्या नाटकात घुसडली आहेत, ही गोष्ट अण्णांनी अत्र्यांना कळवली नाही की त्याबद्दल फार ऊहापोह केला नाही! हर्षे शिक्षकांनी त्या नाटकात अण्णांच्या दिग्दर्शनाखाली कामही केले होते...त्यांनी एक पद साभिनय म्हणून दाखवले.

मी हुषार बहुत्र तमा न मज लव्र सुरेख पाक्का करी
धनी मज देई न दमडी जरी ॥ धृ० ॥

अखेर अखेरच्या दिवसांत अण्णा गुर्जर आपल्या आठवड्याच्या गोष्टींतून बाहेर पडून जगाच्या कादंबरीची पाने लिहू लागले होते. हळूहळू ते समाजजीवनात मिसळू लागले होते. कशेळी गावासाठी काहीतरी करावे असेही त्यांना वाटू लागले होते. पण आता ते थकले होते. संध्याछाया भिडू लागल्या होत्या. मनात काहीही असले तरी त्याचा स्पष्ट उच्चार कधी झाला नाही. संकल्प मनातच राहिले आणि बेचाळीस वर्षांच्या एका गोष्टीचा मुक्काम पोस्ट कशेळी येथे १९–९–१९६२ रोजी अकस्मात शेवट झाला...

इंदिराकाकूंना त्यानंतर कशेळीत एकटे राहणे शक्यच नव्हते. त्या पुणे येथे निघून गेल्या. गुर्जरांची कित्येक वर्षांची नियमितपणे लिहिलेली डायरी त्यांच्याकडे आहे. त्या डायरीत तत्कालीन मराठी साहित्य व साहित्यिक यांबद्दलची असंख्य दुर्मिळ स्मरणे ग्रथित केलेली आहेत.

आज गुर्जरांच्या त्या पडक्या, जीर्ण घरात काही फुटक्या औषधाच्या बाटल्या, जुन्या फळ्या, डबे, पाळण्याचे खूर, देव्हाऱ्याचे अवशेष फक्त विखुरलेले आहेत...गुर्जरांचे लिहिण्याचे मेज, झोपायची खाट किंवा त्यांच्या स्पर्शाचा वारसा सांगणारी एकही वस्तू आज तिथे अस्तित्वात नाही...आहे ते फक्त एक उजाड घर...आणि दारात आणि परसात माजलेली अस्ताव्यस्त झाडे, वेली...

गुर्जरांच्या हजार गोष्टींपैकीच एखादी करुणरसप्रधान शोकांतिका गुर्जर आपल्या त्या वास्तूच्या रूपाने तिथे ठेवून गेले असावेत असे मला निघताना वाटले.

कशेळी गावातली श्रावणातली सोनेरी उन्हे आता काळवंडली होती...मी गच्च मनाने परत घाटी चढत होतो.

□ □

(हा लेख लिहिताना श्री० वा० रा० ढवळे, मुंबई आणि श्री० भास्कर नारायण भागवत, श्री० सावरे, श्री० दीक्षित, श्री० प्रभाकर दत्तात्रेय हर्षे, कशेळी यांनी पुरविलेल्या माहितीचा खूप उपयोग झाला. छायाचित्रे श्री० प्रकाश विश्वासराव यांनी घेतली आहेत. लेखक या सर्वांचा ऋणनिर्देश करीत आहे.)

# साहित्यसेवक गुर्जर

लेखक : रवींद्र पिंगे

लिहित्या हाताची आमची समस्त मराठी लेखकांची पिढी विठ्ठल सीताराम गुर्जरांना साक्षात आजोबांच्या ठिकाणी मानते. आणि आण्णा तसे होतेही. मराठीत हा असा एक बलदंड साहित्यसेवक होऊन गेला की ज्याने ओळीने साठ वर्षं लेखनयज्ञ मांडला. हे संचित केवळ अपूर्वच म्हणायचं. त्यापलिकडचीही गुर्जरांची खास बहाद्दूरी अशी कीं त्यांनी "संपूर्ण गोष्ट" नावाचं नवं नाणं मराठी सारस्वतात पाडून दाखवलं. जसं स्फुट गोष्ट म्हटलं की हरिभाऊंचं स्मरण होतं. गोष्ट म्हटली कीं दिवाकर कृष्ण केळकरांचं नांव नजरेसमोर येतं, त्याप्रमाणेच "संपूर्ण गोष्ट" म्हणजे आण्णा गुर्जरांचीच, अन्य कुणाचीही नाही, असं समीकरण मराठी साहित्यात जारी आहे. एखादा नवा घाट साहित्यात जन्माला घालणं हे अव्वल दर्जाचं कर्तृत्व मानलं जातं. तो जन्मदाता लेखक साहित्याच्या प्रांगणातला मैलाचा दगड बनतो. हे अहोभाग्य ललाटी असणारे लेखक विरळा. कविवर्य केशवसुत, रेंदाळकर, दिवाकर, आण्णासाहेब किर्लोस्कर, ना. सी. फडके, आचार्य अत्रे, मर्ढेकर अशा नव्या घाटाला जन्म देणाऱ्यांची एक दैववान पंगत आहे. वि. सी. गुर्जरांचा हक्काचा रंगीत पाट त्या पंगतीत कायमचाच मांडलेला राहील. आण्णा गुर्जरांचा कीर्तिध्वज खाली येणे नाही. तो सदैव फडफडतच राहणार.

इतका मोठा लेखक कालपरवांपर्यंत आपल्यात वावरत होता खरा, परंतु त्यांना प्रत्यक्ष पाहिलेली माणसं अगदीच तुरळक आहेत. ह्याला कारण गुर्जरांचा अलिप्त, अबोल नि काटेकोर स्वभाव, आणि त्यांची दूर कशेळीला कायमची वस्ती. आम्हाला जी काही माहिती आहे ती सारी ऐकीव आहे. प्रा. वि. ह. कुलकर्णी आणि वा. रा. ढवळे कारणपरत्वे गुर्जरांच्या आठवणी सांगत. गुर्जरांबद्दल फारसं कुणी लिहिलंही नाही. गुर्जरांचा माझ्या माहितीप्रमाणे मराठीतला पहिला सविस्तर परिचय पत्रकार र. गो सरदेसाई यांनी लिहिला. तो 'मनोहर' मासिकाच्या फेब्रुवारी १९४२ च्या अंकात प्रसिद्ध झाला आहे. औरंगाबादहून प्रकाशीत होणाऱ्या 'प्रतिष्ठान' ह्या त्रैमासिकाच्या जून १९६६ च्या अंकात वा. ल. कुळकर्णी ह्यांनी आण्णांचा काही पत्रव्यवहार प्रकाशीत केला आहे. त्याच त्रैमासिका-च्या ऑक्टोबर १९६७ च्या अंकात प्रा. म. ना. आदवन्तानी घेतलेल्या गुर्जरांच्या कथालेखनाचा परामर्ष प्रसिद्ध झाला आहे "बहुरूपी" ह्या चिंतामणराव कोल्हटकरांच्या ग्रंथात गुर्जरांच्या नाट्य-सेवेवर एक रोकठोक लेख आहे. आचार्य अत्रे, ग. त्र्यं. माडखोलकर, वा. रा. ढवळे ह्यांनी गुर्जरांवर माहितीपूर्ण मृत्यूलेख लिहिले होते. गुर्जरांच्या निवडक स्वतंत्र गोष्टींचा संग्रह डॉ. भीमराव कुलकर्णी ह्यांनी गुदस्तां "गुर्जरकथा" ह्या शिर्षकाने संपादित केला आहे. त्या संग्रहाला लाभलेल्या डॉ. भीमरावांच्या अभ्यासपूर्ण प्रस्तावनेत गुर्जरांच्या व्यक्तिगत जीवनावर बराच प्रकाश टाकलेला

आहे. गुर्जरांच्या पत्नी श्रीमती इंदिराबाई, ज्या पुण्यातल्या शनिवार पेठेत तांबेवाड्यात श्री. चांदोरकरांकडे राहातात, त्यांची एक प्रदिर्घ मुलाखत घेऊन ती 'पुणे सकाळ' च्या १९८३ च्या दिवाळी अंकात मी अग्रक्रमाने प्रकाशीत केली होती. त्यात गुर्जरांच्या दैनंदिन आयुष्यक्रमावर प्रकाशझोत टाकला होता. नंतर मी बाईंची 'दूरदर्शन'वरुन 'प्रतिमा-प्रतिभा' कार्यक्रमात प्रकट मुलाखत घेतली होती. साधारणपणे ह्याच्या पलिकडे गुर्जरांवर माहितीपर लेखन उपलब्ध नाहीच. 'ललित' मासिकाच्या १९७७ च्या दिवाळी अंकात मधु मंगेश कर्णिक ह्यांनी आण्णा कर्णिकांच्या घरावर मोठा हृद्य लेख लिहिलेला आहे.

गुर्जरांनी अफाट लिहिलं. त्याचा सुरक्षित संग्रह कुठेच नाही. आचार्य अत्रे, प्रा. फडके, वसंत शांताराम देसाई वगैरे त्यांच्या स्नेह्यांनी आण्णांना साहित्यसेवेतल्या स्मृती लिहून काढण्यासाठी अनेकदां गळ घालून पाहचलं. गुर्जरांनी ती विनंती साभार अव्हेरली. "ध्रुव" मासिकाच्या १९३५ च्या अंकात गुर्जरांची एक व्यक्तिगत मुलाखत प्रकाशीत झाली आहे, तेवढीच. गुर्जरांनी आपल्या हयातीत ६९६ गोष्टी लिहिल्या. त्यांची यादी प्रसिद्ध आहे. पण एवढं धबधब्यासारखं लिहूनही आण्णांच्या जेमतेम पंचवीस गोष्टी पुस्तकरूपाने उपलब्ध आहेत. उरलेल्या पावणेसातशे गोष्टी गंगेलाच मिळाल्या म्हणायच्या! गुर्जरांनी पंचवीस कादंबऱ्या, अकरा नाटकं, शंभर कविता नि पदं, दोन कथासंग्रह, आणि दोन मूकपटांच्या कथा लिहिल्या होत्या. 'रायगड' ह्या बोलपटाची कथाही त्यांनी लिहिली. भाषांतरं नि अनुवाद तर वारेमाप केले. गुर्जरांच्या जन्मशताब्दी निमित्ताने 'महाराष्ट्र टाइम्स'च्या २७ मे १९८४ च्या अंकात मी एक टिपण प्रसिद्ध केलं आहे, त्यात ह्या अवांतर लेखणाची यादी मी दिलेली आहे.

गुर्जरांनी कशेळीत बसून हा जो लेखनाचा रहाट ओढला, त्याला तुलनाच नाही; आणि अशा समर्थ साहित्यसेवकाच्या अर्ध्याअधिक कृती उपलब्धच असू नयेत, ह्यासारखं दुर्दैव नाही. बिचारे आण्णा! किती जीव लावून त्यांनीं लिहिलं! आणि कुठे गेला तो लेखनसागर? नुसतं वाऱ्यावर वाहून गेलं सारं? दोष गुर्जरांकडेही जातो; थोडासा, उदासवाण्या कालखंडाकडेही जातो, गुर्जरांनी पुढाकार घेतला असता तर त्यांचे कथासंग्रह नक्कीच निघाले असते. प्रत्येक छापील पुस्तकाची प्रत अन्य कुठे रक्षणासाठी ठेवली असती, तर आज ते रत्नभांडार डोळ्यांना दिपवीत राहीलं असतं. विद्यापीठांनीही गुर्जरांच्या लेखनाकडे आत्मीयतेनं पाहिलं नाही आणि आतां तर जमानाच पालटला!

वि. सी. गुर्जर हा माणूस थोर ह्यात शंकाच नाही. 'मनोरंजन' चा त्याग करुन ते जे कशेळीत पत्नीच्या प्रकृतिस्वास्थ्यासाठी म्हणून गेले, ते अखेरपर्यंत तिथेच रमले! कशेळीत आण्णांचा वावर कालपरवापर्यंत होता. ते रहात होते ते घरही पडून गेलं. त्यांच्या वाङमयीन कागद पत्रांचाही नाश झाला. तरीही आण्णांची आठवण मागे उरलेली आहे नि बहुत काळ लेखक मंडळी त्यांचा जयजय-कारच करतील. कशेळीतल्या शाळेला आण्णा गुर्जरांचं नांव दिलं ही लाख गोष्ट झाली. त्या शाळेला चांगले दिवस दाखवणं हा साहित्यसेवक गुर्जरांबद्दल कृतज्ञता दाखवण्याचा उत्तम मार्ग आहे.

★ ★ ★

# आमची कशेळी

जवळ जवळ ३००० लोक वस्तीचा हा गांव शहरांपासून दूर आहे, आणि म्हणूनच तो अद्यापही निसर्ग सौंदर्याने पुरेपूर नटलेला आहे. रत्नागिरी शहराच्या दक्षिणेला केवळ १८ मैलांचे अंतरावर असूनही मध्ये दोन खाडया असल्यामुळे कशेळीला जाणारी थेट सडक नाही. गांवाच्या पूर्वेला १८ मैलावर राजापुर हें तालुक्याचे ठिकाण आहे. तेथून कशेळीला थेट सडक आहे. कशेळीला जाण्यासाठी आतां मुंबई–गांवखडी हीं एस. टी. बस रोज सायंकाळी ५-४५ वा. बॉम्बेसेंट्रल येथून सुटते व दुसऱ्या दिवशी सकाळी ५-४५ वा. म्हणजे १२ तासांनी कशेळीला पोंचते. दुसरा मार्ग बोटीचा; भाऊच्या धक्यावरुन सकाळी १० वा. निघणारी बोट मुसाकाजी बंदरात रात्री १० ते ११ वाजतां पोचतें; व तेथून सकाळी ६ वा. एस टी ची मुसाकाजी-गांवखडी बस कशेळीला पोंचतें. वायुदूतचे विमानाने रत्नागिरीला जायला ५० मिनिटें लागतात व तेथून पुढे पावस-पूर्णगड-गांवखडी मार्गे कशेळीला २-३० ते ३ तासांत पोंचतां येतें.

कशेळी गांव हा अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर वसला असल्यामुळे या गांवाला निसर्गाचा वरद हस्त लाभला आहे. या गांवाला ३ मैल समुद्रकिनारा लाभला आहे. पण किनाऱ्याला उंचच उंच डोंगरकडे असल्यामुळें होडया, लाँचिस अगर बोटीचे बदर नाहीं. समुद्राच्या निळया भोर लाटा रात्रंदिवस या कडयांवर आदळत असतात. या कडयांमध्यें असलेली केवडयाची बनें तर सागराची रोज केवडयाने पूजा व्हावी म्हणूनच निर्माण झाली की काय असा भास होतो. सायंकाळचे वेळी या कडयांवर उभें राहून समुद्रांत मावळणाऱ्या सूर्याचें दर्शन घेणें हा एक अविस्मरणीय क्षण असतो.

कशेळी गांवाचे वरचा वाडा व खालचा वाडा असे दोन भाग ठळकपणे दिसतात. पैकी वरचा वाडा हा डोंगराळ व खालचा वाडा थोडा सपाट आहे. या दोन भागांच्या मध्यावर गांवातील सर्वांत उच डोंगर आहे. त्याला "दुर्गवाडा" म्हणतात. पूर्णगड खाडीच्या मुचकुंदी नदीचे एक फांसू (शाखा) कशेळी गांवात आली आहे. या खाडीतून समुद्राचे पाणी पूर्वी २ मैल गांवात येत असे. सुमारे ४०० वर्षांपूर्वी मागील वर्षाप्रमाणेंच या भागांत दुष्काळ पडला तेव्हां कळसवली येथील रामाजीपंत ठाकुर देसाई घराण्यांतील जमीनदारांनी येथील लोकांना अन्न पूरवून या खाडीला कशेळी बांध येथे बांध बांधून तेथे खाडीचें पाणी अडविलें. या बांधाला असलेल्या लाकडी दरवाजांची उघडझाप भरती ओहोटीच्या पाण्याने आपोआपच होत असते त्यामुळें भरतीचे खारे पाणी गांवात जाऊ शकत नाही व पावसाळी पुराचे पाणी मात्र समुद्राकडे जाऊ शकते. ही ४०० वर्षांपूर्वी केलेली दरवाजांची आखणी आजही शासनाने बांध सुधारला तरीही मूळ स्वरुपांत चालू आहे. या बांधामुळे गांवामध्ये खाडीच्या खारटण भागात सुमारे ३०० ते ४०० एकर भातशेती तयार झाली. या शेतीमध्ये उन्हाळी व पावसाळी अशी दोन वेळां भातशेती केली जाते. या भातशेतीच्या थोडया उंच भागावर नारळ सुपारीच्या बागा आहेत. या बागांच्या वरील बाजूला रहाण्याची घरे व या

घरांच्या वरील बाजूला हापूस आंबा, काजू यांच्या बागा व त्यावरील माळावर कातळाच्या मधील मातीच्या भागांत भातशेती व गुरेचराईची कुरणें अशी एकूण डोंगर उतारावरील गांवाची ठेवण आहे. गांवात पाणी विपुल असल्यामुळे गांव नेहमी हिरवागार दिसतो. गांवात विद्युत पुरवठा झाल्या-पासून गेल्या १५/२० वर्षांत ग्रामस्थांनी इले. पंप बसवून भातशेती व नारळ, सुपारी व हापूस आंब्यांच्या बागा बऱ्याच प्रमाणांत वाढविल्या आहेत.

गांवात दोन छोटचा नद्या (ओढें) असून त्यांमध्ये ८/९ महिने वहातें पाणी असतें या पाण्या-मुळे उन्हाळी भातशेतीचे पीक घेणे शक्य होते. वरच्या वाडचांतून वहाणारा आगव्याचा वहाळ किंवा वायंगोड वहाळ या वहाळाच्या उगमाच्या बाजूला धरण झाल्यास त्याचा पाण्याच्या सांठा १ कि.मि लांबीचा साठणारा आहे व त्याचा उपयोग कशेळी व गांवखडी या दोन गांवाना होणारा आहे. या धरणासाठी शासनाकडे मागणी करण्यात आली आहे. दुसरा सांवरे वहाळ. या वहाळावर उगमाचे बाजूला सुमारे १ कोटी खर्चाचें धरण शासनाने मंजूर केलें असून त्याचे प्राथमिक कामही सुरु झालें आहे. या धरणाच्या पाण्याचा उपयोग कशेळी, नवेदर व वेत्ये या गांवाना होणार आहे.

सुमारे ४०० वर्षापूर्वी बांधलेला खारलॅण्ड बंधारा ज्याला "देसाई बांध" असे म्हणत. तो नादुरुस्त झाल्यामुळे शासनाने १९५२ साली दुरुस्त केला त्यामुळे या बांधावरुन राजापूर गांवखडी या मार्गावर एस. टी. बस व ट्रकची वहातूक चालू झाली, पण खाऱ्या पाण्यापासून शेतीचे संरक्षण करण्यांत हा बांध अपयशी ठरल्यामुळें या बांधापासून समुद्राचे बाजूला सुमारे अर्धा किलोमिटर अंतरावर एक खारलॅन्ड बंधारा बांधण्याचे का शासनाने तीन वर्षापूर्वी सुरु केले. या कामाला सुमारे २५ लाख रुपये खर्च होईल व ते काम १/२ वर्षांत पूर्ण होईल. या बांधाला सिमेंटचे पाईप व फायबर ग्लासची झडपे बसविण्यात येणार आहेत. या बांधामुळे १००० एकर नवीन खारजमीनीत शेती उत्पादन होणार आहे. कशेळी गांवाचे मुख्य अन्नधान्याचे उत्पादन भाताचे आहे. त्याचबरोबर डोंगरावर व माळावर नाचणा व वरीचेही उत्पादन काही प्रमाणात घेण्यात येते.

शेतीच्या नवीन नवीन संशोधनाचा फायदा घेऊन येथील शेतकरी संकरित बियाणी वापरुन शेतीचे भरघोस उत्पादन काढतात. या गांवातील एक शेतकरी श्री. शरद बाळकृष्ण धाक्रस यांना २ वेळा तालुका पातळीवरील व मागील दुष्काळाचे वर्षात जिल्हा पातळीवरील पीक स्पर्धेचे पहिले बक्षिस मिळाले.

या गांवातील लोकांची दृष्टी पूर्वीपासून समाजाभिमूख होती हे दाखवून देणारे पुरावे म्हणजे ठिकठिकाणी प्रवाशांसाठी बांधलेली तळी व छायेसाठी बांधलेले पिंपळाचे पार हे होत. या गांवातील एक जमीनदार कै. बाबुराव केशव कुळकर्णी यांनी वाटसरूंच्या व ग्रामस्थांच्या सोईसाठी सुमारे मैलभर लांबीचा रस्ता चिऱ्यांनी बांधून काढला त्याला फरसबंदी असे म्हणतात. तसेच अनेक डोंगर उताराचे रस्तेही (घांटचा) चिऱ्यांनी बांधून काढलेल्या आहेत.

सूर्यनारायणाने आपल्या स्थापनेसाठी या गांवाची निवड केली. आद्य शंकराचार्यांनी या भागाला भेट दिली, शीलाहार राजे गंडरादित्य, शिवाजी महाराज, संभाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने ही भूमी पावन झाली म्हणूनच की काय या गांवातील लोकांनी शिक्षण क्षेत्रातही अद्वितीय कार्य केलेले आहे व अनेक नररत्ने या गावाने आपल्या देशाला अर्पण केली आहेत.

शासनमान्य मराठी शाळा गांवात प्रथम १० ऑक्टोबर १८६१ साली चालू झाली. पण त्यापूर्वी कित्येक वर्षे खाजगी रीतीने मुलाना शिक्षण देण्याचे काम ग्रामस्थ करीतच होते. कै. भिकाजीपंत नाफडे हे त्यावेळी पंतोजी म्हणून काम करीत असत. शासनमान्य शाळेसाठीही केंबळी इमारत गांवकऱ्यांनी सुरुवातीला बांधून दिली. त्यानंतर १९१० सालपर्यंत २/३ वेळां ही पडल्यामुळें ग्रामस्थांनी नवीन इमारत बांधावी लागली. शेवटीं १९१० साली त्यावेळच्या लोकल-बोर्डाने २ खोल्यांची चिरेबंदी इमारत बांधली ती आजपर्यन्त अस्तित्वात आहे. सुरुवातीला ही शाळा ४ इयत्तांपर्यंत होती पुढे ही शाळा ७ वी पर्यंत झाली तेव्हा जागा कमी पडू लागली म्हणून कै. भास्कर नीळकंठ सांवरे व राजारामभाऊ हर्डिकर व वि सी. गुर्जर यांनी पुढाकार घेऊन ग्रामस्थ, व कशेळी प्राथमिक पतपेढी यांचे मदतीने शाळेसाठी दुसरी इमारत बांधली. शिक्षणाची ग्रामस्थामध्यें गोडी वाढू लागली तशी गांवात असलेली एकच शाळा अपुरी व गैरसोईची वाटू लागली. म्हणून कशेळी बांध येथे कै. जगन्नाथ विष्णु सांवरे यांनी व्हॉलंटरी शाळा सुरू केली व पुढें ती शासनमान्य झाली. या शाळेसाठी आवश्यक असलेली इमारत फोडकरवाडी व कोंभेवाडी येथील ग्रामस्थांचे मदतीने श्री. बा. अ. बोरवणकर यांनी बांधून दिली ती आज ग्रामपंचायतीचे मालकीची आहे. तसेच वरचावाडा येथे कै. बाळाजी कृष्ण कुळकर्णी व कै. विश्वनाथ उद्धव कशेळकर यांचे पुढाकाराने व्हॉलंटरी शाळा सुरू करण्यात आली. या शाळेत मुलांना शिकविण्याचे काम श्री. पुंडलीक गोविंद न्हावी हे करीत असत. ते आजही हयात आहेत. ही शाळा इमारत बांधण्यापूर्वी कशेळकर, कुळकर्णी, ठाकुर, नाफडे यांचे घरात तर कांही वर्षे गांवचे चावडीत भरत असे. पुढें १९७३ साली ग्रामस्थांनी एक छोटीशी इमारत या शाळेसाठी बांधली. ही इमारत बांधणेसाठी श्री. जगन्नाथराव ठाकुर यांनी आपली अडीच एकर जमीन मोफत दिली. मागील वर्षी याच जागेत श्री. जगन्नाथराव नाफडे यांनी **"सेवा संकल्प ट्रस्ट"** तर्फे ४ खोल्यांची पक्की इमारत बांधून दिली. आतां या शाळेंत इ. १ ली तें ७ वी चे वर्ग चालू आहेत.

सुतारवाडी व सांवरेवाडी परिसरांतील मुलांचे सोईसाठी विश्वकर्मा ज्ञातीबांधव संस्थेच्या कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन ग्रामस्थांचे मदतीने सुतारवाडी शाळेची इमारत बांधून दिली तेथे आज इ. १ ली ते इ. ५ वी पर्यंत वर्ग चालू आहेत. आवळीचीवाडी परिसरांतील मुलांचे सोईसाठी शाळा होणे अत्यंत आवश्यक होते. तेव्हा आवळीचे वाडीतील लोकांनी पुढाकार घेऊन तेलीवाडी, बौद्धवाडी

हार्दिक शुभेच्छा –
**अतुल्य प्रिंट मेकर्स**
लक्ष्मीबाई चाळ, इस्लामपुरा, अंधेरी (पूर्व), मुंबई–४०० ०९९.

वाडीवठार येथील ग्रामस्थांचे सहकार्याने मे १९८७ मध्यें शाळेची इमारत बांधून दिली. या शाळेसाठी आवश्यक असलेली जमीन श्री. सखाराम भागोजी लाखण यांनी विनामूल्य दिली. या इमारतीत जून १९८७ पासून इ. १ ली ते ४ थी पर्यन्तचे वर्ग चालू झाले आहेत.

गांवातील प्राथमिक शिक्षणाची सोय ग्रामस्थांनी केली पण हायस्कूल नसल्यामुळे ७५ टक्के मुलांना हायस्कूलचे शिक्षणाला मुकावे लागे. ही गोष्ट ग्रामस्थांना अनेक वर्षे जाणवत होती. दोन वर्षांपूर्वी (१९८५ साली) गांवातील एक सुप्रसिद्ध लेखक कै. वि. सी. गुर्जर जन्मशताब्दि साजरी करण्यात आली. त्यावेळी त्यांचे स्मारक म्हणून ग्रामस्थांनी त्यांचे नांवाने **"विठ्ठल सीताराम गुर्जर विद्यामंदिर"** हे हायस्कूल चालू केले. शासनाने या हायस्कूलला पाच वर्षे विनाअनुदान तत्वावर चालविण्याच्या अटीवर मान्यता दिली. पैकी २ वर्षे पूर्ण झाली आहेत व आणखी तीन वर्षे संस्थेला हायस्कूल स्वखर्चाने चालवावयाचे आहे. सध्या हे हायस्कूल कै. श्रीधर बाळाजी कुळकर्णी स्मारक इमारतीत भरत आहे. येत्या ६ महिन्यांत हायस्कूलसाठी ३ खोल्यांची चिरेबंदी इमारत बांधून देण्याचे "सेवा संकल्प ट्रस्टचे" ट्रस्टी श्री. जे. आर. नाफडे यांनी मान्य केले आहे.

अशा प्रकारे गांवात २ पूर्वप्राथमिक शाळा, ३ प्राथमिक शाळा व एक हायस्कूल मिळून एकूण सुमारे ६०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शिक्षण क्षेत्रातील गांवची प्रगति या टप्प्यांपर्यन्त येण्यासाठी गेल्या १५० वर्षांत ग्रामस्थांनी केलेल्या परिश्रमांना तोड नाही हे वरील वर्णनावरुन लक्षांत येईल. व आणखी तीन वर्षे असेच परिश्रम करणे आवश्यक आहे याचीही जाणीव होईल.

अशा प्रकारे शेती व शिक्षणक्षेत्रात गांवाची प्रगती होत असताना कारागिरीचे बाबतींतही गांव मागे नव्हता. पूर्वी समुद्रावरुन मालाची वहातुक करण्यासाठीं वापरण्यांत येणारी गलबतें (जहाजे) बांधण्यात या गांवचे सुतार–मेस्त्री अत्यंत निष्णात गणले जात. कारवार, गोवा येथपासून मुरुड, जंजिरा येथपर्यन्तचे गलबत मालक मुद्दाम कशेळीला येऊन येंथींल सुतार (विश्वकर्मा) लोकांना आपली गलबते बांधण्यासाठी घेऊन जात. गलबतांचा जमाना मागे पडला तरी आजही मच्छीमार लाँचसाठी लांकडीं बॉडचा बांधण्याचे काम कशेळीतील सुतार उत्तमप्रकारे करीत आहेत. येथींल सुतार मंडळी फर्निचर काम, इमारतीचे बांधकाम, लोखंडी व पोलादी हत्यारे घडविण्याचे काम उत्तमप्रकारे करू शकतात. गणपतीच्या मूर्ती बनविणारे मूर्तिकारही कशेळी गांवात अनेक आहेत व त्यांचा दर्जाही चांगला आहे. बांबूपासून सुपे, रोवळचा, टोपल्या, धान्याच्या कणगी वगैरे बनविण्याचा पुरातन काळापासूनचा धंदा आजही येथील लोक उत्तम प्रकारे करीत आहेत. तीळ, उडीद, भुईमूग यांचे पासून तेल काढण्याचे काम करणारे कारागीर आजही कशेळी गांवात हा धंदा करीत आहेत.

---


हार्दिक शुभेच्छा –
**जिगनेश पेपर स्टोअर्स**
खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई–४०० ००४.

विकास कामांचे बाबतीतही गांव तालुक्यात आघाडीवर आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. गांवची ग्रामपंचायत लोकाभिमुख असून गांवाच्या विकासासाठी शासनाकडून येणारी प्रत्येक योजना गांवात राबवून तिचा सामान्य माणसाला लाभ मिळावा यासाठी सतत प्रयत्न करण्यात येतो. एकात्मिक ग्रामीण विकास योजनेखाली गांवातील गरीब शेतकऱ्यांना बॅन्केमार्फत शेतीसाठी बैल, रेडे, गाई व म्हशी घेऊन देण्यांत आले आहे. जिल्हा परिषदेच्या लघु उपसा सिंचन योजनेखाली प्रत्येकी पांच शेतकऱ्यांच्या २५ गटांना प्रत्येकी एक इलेक्ट्रिक पंप शेतीच्या पाणी-पुरवठ्यासाठी बसवून देण्यात आले आहेत. शेतकऱ्यांना जोडधंदा म्हणून बैलगाडी, शिवणाचे मशिन, कोंबड्या पाळणे, बकऱ्या पाळणें, मासळी विकणे, स्टेशनरी व किराणा दुकान चालविणे, पानाची गादी चालविणें वगैरे छोट्या धंद्यांसाठी बॅन्कांमार्फत कर्ज व सबसिडी मिळवून देण्यात आली. एकात्मिक ग्रामीण विकास योजनेमार्फत २५ शेतकऱ्यांना बँन्केमार्फत कर्जाऊ शेती पंप बसवून देण्यांत आले आहेत. गांवात गोबर गॅस योजनेखाली जनावरांच्या शेणावर चालणारे १५ गोबर गॅस प्लँट शेतकऱ्यांनी उभारले आहेत. त्यासाठी त्यांना बॅन्केकडून कर्ज व सबसिडी मिळाली आहे.

या सर्वांबरोबरच गांवात कुटुंब कल्याण योजनेखाली कुटुंब नियोजनाचे कामही मोठ्या प्रमाणावर झाले आहे.

गांवात पोस्ट ऑफीस आहे; गांवातील सर्व वाड्यांना विद्युत पुरवठा झालेला आहे; रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅन्केची शाखा गांवात आहे; दोन वर्षांपूर्वी गांवात टेलिफोन आले आहेत; गांवची सहकारी संस्था कार्यक्षम असून शेती कर्ज, कंझुमर स्टोअर्स, नियंत्रित कापड दुकान, खत पुरवठा वगैरे सेवा उपलब्ध आहेत. कशेळी बांध ते आगवेकरवाडी मार्गे गांवखडी हे ४ लाख रुपये खर्चाचे रोजगारहमी रस्त्याचे काम जवळ जवळ पूर्ण होत आले आहे, त्यामुळे गांवखडीला जाणाऱ्या एस. टी. बस संपूर्ण गांवातून जाणार आहेत. गांवात शेती पाणी पुरवठासाठी १२५ इलेक्ट्रिक पंप आहेत; पांच पिठाच्या व भाताच्या गिरण्या आहेत, एक लाकूड चिरकामाची गिरण आहे; एक गादी कारखाना आहे. इलेक्ट्रिक वायरिंग व दुरुस्ती करणारे दोन कॉन्ट्रॅक्टर आहेत. गांवातील महत्वाचे सांकव पक्के बांधून झालेले आहेत. गांवात एक मेडिकल स्टोअर्सही आहे.

अशा प्रकारे गांवची विकास कार्याची वाटचालही चांगल्याप्रकारे चालू आहे त्यामध्ये ग्रामस्थां-च्या त्यागाचा व गांवातील सार्वजनिक संस्था व निस्वार्थी कार्यकर्ते यांचा मोठा वाटा आहे.

भारतातील सहकारी तत्वावरील पहिला कौल उत्पादन करणारा कारखाना गेली २७ वर्षे यशस्वीपणें कौलांचे उत्पादन करीत असून त्याची नवीन शाखा वाटुळ येथे लवकरच आपले उत्पादन

---

हार्दिक शुभेच्छा –
यु. के. ट्रेडर्स
राम भुवन, सुभाष रोड, विलेपारले (पूर्व), मुंबई–४०० ०५७.

चालू करीत आहे. कर्तृत्वशील व निःस्वार्थ स्थानिक नेतृत्व व त्याला लाभलेली मुंबईवासियांची जोड यांचे जोरावर गांव सर्वच क्षेत्रात झपाटयाने प्रगती करीत आहे. आता या परिसराची एक महत्वाची मूलभूत गरज पुरी व्हायची राहिली आहे ती म्हणजे आरोग्य केंद्र आणि औषधोपचाराची सार्वजनिक सोय! त्यासाठी कै. श्रीधर बाळाजी कुळकर्णी स्मारक समितीने जमीत विकत घेऊन स्वतःची ४०' X २०' या आकाराची पक्की इमारत बांधली आहे. कायमचे डॉक्टर नेमून या इमारतीत दवाखाना सुरू करण्याची योजना लवकरच मूर्त स्वरुप घेईल अशा दृष्टीने प्रयत्न चालू आहेत.

गांवच्या सर्व विकासात अत्यंत महत्वाचे आहे ते भगवंताचे अधिष्ठान! गांवातील श्री कनकादित्य, श्री लक्ष्मीनारायण, श्री जाखादेवी, श्री आगबादेवी व श्री दत्त महाराज ही ग्रामस्थांची ग्रामदैवतें व श्रद्धास्थाने आहेत. ही दैवते ग्रामस्थांना सदैव नवीन कार्याची स्फूर्ती देतात.

**श्री कनकादित्य मंदिर** – हे सूर्यनारायणाचे मंदिर आहे. भारतात फारच थोडी सूर्य-नारायणाची मंदिरें आहेत. त्यापैकी हे मंदिर आहे. इ. स च्या बाराव्या शतकात उत्तरेतील मुस्लिम आक्रमणापासून वाचविण्यासाठी द्वारका बंदरातून कांही मूर्ती गलबतांत भरुन दक्षिणेकडे नेण्यात येत होत्या. कशेळीच्या किनाऱ्यासमोर गलबत आल्यावर ते पुढे चालेना. तेव्हा गलबताच्या तांडेलाला दृष्टांत झाला की यापैकी ठराविक मूर्ती काठावरील गुहेत नेऊन ठेव म्हणजे गलबत पुढे जाईल, त्याप्रमाणे करतांच गलबत पुढे गेले. त्याचवेळी गांवात असलेल्या एका सूर्यभक्त गणिकेला दृष्टांत झाला की, समुद्रकाठी सूर्यनारायण गुहेत उभे आहेत. तेव्हा तिने ग्रामस्थांना नेऊन सदर मूर्ती गांवात आणून तिची स्थापना केली. व नंतर मंदिर बांधण्यांत आले. पुढे शीलाहार वंशातील गंडरादित्य या राजाने या देवळास ताम्रपट लिहून दिला. व गांवातील गोविंद भट्ट भागवत याला देवस्था-नची पूजा, अर्चा व रोज अग्निहोम करण्यासाठी नेमले त्यासाठी त्याला गांवातील जमिनी दिल्या. या ताम्रपटामुळे या परिसराचा ८०० वर्षांपूर्वीचा इतिहास ज्ञात होतो. भागवत नांवाचे ब्राह्मण त्या वेळी व त्यापूर्वीही या गावात रहात होते. हे या ताम्रपटावरुन सिद्ध होते. कनकादित्य नवसाला पावून मुलगा झाल्यामुळे कै. नाना शंकरशेट यांनी देवळाला ८०' लांब व ४०' रुंद एवढा प्रशस्त सभामंडप बांधून दिला आहे मंदिराचे आवार विस्तिर्ण असून बाजूने १० फूट उंचीची चिऱ्याची भिंत आहे. देवळावर गुर्जरपाध्ये यांचे घराण्यांतील व्यक्तींचे प्रयत्नाने तांब्याचा पत्रा घालण्यात आला आहे. माघ शु. ७ ते ११ या वेळी देवळाचा वार्षिक उत्सव व यात्रा असते. या मंदिरावरही यवनांनीं आक्रमण केलें होते. त्यावेळी चतुर पुजाऱ्यांनी मूळ विहिरीत टाकून ठेवल्यामुळे वाचली. द्वारपालांना देव समजून त्यांचे पायाचे आंगठे यवनानी तोडले तसेच गणपतीची मूर्ती सोंड तोडून विद्रुप केली. या मूर्ती आजही ७०० वर्षानंतर पहायला मिळतात.

---


हार्दिक शुभेच्छा –

**जिगनेश पेपर स्टोअर्स**

खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई–४०० ००४.

**श्री लक्ष्मीनारायण मंदिर** – कनकादित्य मंदिरापेक्षा हे मंदिर २००/३०० वर्षे जुने असावे असे म्हणतात. या मंदिराचे तळघरातून समुद्र किनाऱ्यापर्यंत भुयार गेले आहे असे म्हणतात. त्यामुळे देवळाचे बाजूचे भुयाराचे तोंडावर समुद्राच्या लाटा ऐकू येतात. या मंदिराचा जीर्णोद्धार संभाजी महाराजांनी केला होता असे म्हणतात. या देवळाचे पुजारी गावखडी गांवातील परांजपे होते. परांजपे घराण्याचे कुलदैवत लक्ष्मीनारायण – कशेळी असल्याबद्दल परांजपे घराण्याच्या इतिहासात नोंद आहे. या लक्ष्मीनारायण मंदिराची पुजारकी गांवखडीच्या ज्या परांजपे घराण्याकडे होती ते घराणे आता सोलापूर येथे स्थायिक झाले आहे.

**श्री जाखादेवी** – हे मंदिर कनकादित्य मंदिराजवळच आहे. हे देवालयही फार पुरातन आहे. श्री देव कनकादित्य याची पत्नी श्री कालिकादेवी (देऊळ कालिकावाडी येथे आहे.) हिची ही बहीण आहे. नवरात्रामध्ये या देवळात उत्सव असतो. या देवळाची पुजारकी व व्यवस्था गुरव घराण्याकडे आहे.

**श्री आगवादेवी** – हे देऊळही पुरातन आहे पण इतिहास ज्ञात नाही. मात्र ही देवी संसारिक माणसाच्या अडीनडी दूर करते अशी समजूत असल्यामुळे जिल्ह्यातील लांबवरचे लोक कौल प्रसाद घ्यायला या देवळात येतात. देवळाची व्यवस्था कुळकर्णी, शिरवडकर, बावकर, गोठणकर, जुवळे वगैरे तीन वाड्यातील ग्रामस्थ पहातात.

**पुरुख** – हे देऊळही कनकादित्य मंदिराजवळच आहे. पूर्वी हरिजन मंडळींचे हे देऊळ मानले जाई. पण हरिजनानी बौद्ध धर्म स्वीकारल्यामुळे या देवळाकडे दुर्लक्ष झाले आहे.

**श्री दत्तमंदिर** – कशेळी बांधाजवळ फोडकर वाडीचे सुरुवातीला स्वामी विश्वनाथ महाराज बोरकर यांनी संपूर्ण स्वखर्चाने त्यांना दत्तमहाराजांचा दृष्टांत झाल्यामुळें आपले मालकीचे जमिनीत अध्यात्मिक पद्धतीचे दत्तमंदिर बांधले आहे. या परिसरातील हे पहिलेच दत्तमंदिर होय. दत्तजयंती-पूर्वी ६ दिवस या मंदिरात दत्तजयंतीचा उत्सव चालू होतो. ७ दिवस अखंड तंबोऱ्यासह नामस्मरण चालू असते.

याशिवाय १) ब्राह्मण देव व २) पावणादेवी ही दोन मंदिरे पडक्या अवस्थेत आहेत. त्यांचा जिर्णोद्धार करणे आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे कशेळी गांवातील सर्व देवस्थाने जागृत आहेत व ग्रामस्थानीही त्यांची व्यवस्था चांगली ठेवली आहे. ही मंदिरे म्हणजे भव्यता, स्थापत्यशास्त्र व कला यांची अमर स्मारके हजारो ग्रामवासियांची श्रद्धास्थाने आहेत. या साऱ्या देवळांची देखभाल व्हावी, तिथले दैनंदिन धार्मिक विधी आणि वार्षिक उत्सव अव्याहत चालू रहावे यासाठी ग्रामस्थांनी बरेच प्रयत्न केले आहेत.

हार्दिक शुभेच्छा –
**अक्षय एन्टरप्राइझेस**
कमला टेरेस, सुभाष रोड, विलेपारले (पूर्व), मुंबई–४०० ०५७.

मुंबईकर ग्रामस्थानी "मुंबई निवासी कशेळी ग्रामस्थ मंडळ" स्थापन केले असून बावीस हजार रुपयांचा एक विश्वस्त निधी उभारला आहे. त्याच्या उत्पन्नातून कांही देवालयांसाठी दरवर्षी ठरविक रक्कम पाठविली जाते.

गावाची जी सामाजिक व आर्थिक प्रगति झालेली दिसते ती काही आभाळातून पडली नाही अनेक व्यक्तींचा स्वार्थत्याग, सेवाभावीवृत्ती या संस्थांत अविरत काम करणारे ग्रामस्थ यांच्या दीर्घ प्रयत्नांनी आपण आजच्या परिस्थितीपर्यन्त पोचलो आहोत. या संस्थांचा थोडक्यात नामनिर्देश केल्याशिवाय कशेळी गांवच्या इतिहासाला पूर्णत्व येणार नाही.

१) **ग्रामस्थ समाज** – महाराष्ट्रात जेव्हा सहकारी चळवळीचा जन्मही झाला नव्हता तेव्हा म्हणजे १८९० मध्ये ही संस्था स्थापन झाली. गांवची सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक सुधारणा करण्यासाठी सुरू करण्यात आलेली ही सर्वात पहिली आणि जुनी सार्वजनिक संस्था.

२) **मुष्टिफंड संस्था** – ग्रामस्थ समाजाने सुरू केलेली ही चळवळ, अल्पबचतीचे ज्यावेळी कुणाला माहीत नव्हते, त्या काळात मुष्टिफंडाचे काम सुरु झाले. प्रत्येक गृहिणीने आपल्या जेवणासाठी तांदूळ घेण्यापूर्वी त्यातील एक मूठ तांदूळ मुष्ठिफंडासाठी बाजूला काढून ठेवायचे स्वयंसेवक हे तांदूळ घरोघर जाऊन दर आठवड्याला गोळा करीत. आणि संस्था ते विकून आलेल्या पैशातून समाजोपयोगी कामे करी. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेला "पैसा फंड" आणि आमच्या गांवच्या लोकांनी सुरू केलेला "मुष्टिफंड" याची तात्विक आणि व्यावहारिक बैठक सारखीच होती. आजही हे कार्य चालू असून तांदुळाचे वर्गणीचे रूपांतर महिना १ रु. वर्गणीमध्ये करण्यात आले आहे. संस्थेने जमलेल्या पैशातून नाटकाचे पडदे तयार केले असून परिसरांतील १०/१५ गांवात नाटकांसाठी भाड्याने दिले जातात. भाड्याचे उत्पन्न संस्थेच्या निधीत जमा केले जाते.

३) **कशेळी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि.** – जिल्ह्यात सहकारी चळवळ सुरू झाली त्यावेळी स्थापन झालेल्या संस्थांपैकी ही संस्था अत्यंत यशस्वीपणे कार्य करीत आहे. या संस्थेची रीतसर नोंदणी १९१६ साली. सुरुवातीला १५ शेतकरी सभासद व ७५ रु ठेव एवढ्यावर या संस्थेने कारभार सुरु केला. प्रारंभी प्रत्येकी रु. ५/– कर्ज देण्यात येत असे. आता या संस्थेचे सुमारे ८०० शेतकरी सभासद असून भाग भांडवल रु ६१०००/- आहे. सभासद ठेवी रु. ७००००/- असून संस्था स्वतःच्या पैशातून सभासदांना पीककर्ज प्रत्येकी रु. २०००/– पर्यन्त देते. तसेच मध्यममुदत कर्ज बैल खरेदी, बैलगाडी खरेदी, मासळी विक्री धंदा, स्टेशनरी दुकान यासाठी रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅन्केमार्फत शेतकऱ्यांना पुरविते. किराणा दुकानासाठी कॅशक्रेडिट कज

---

हार्दिक शुभेच्छा –
**प्रभात प्रिंटींग प्रेस**
लक्ष्मीबाई चाळ, इस्लामपुरा, अंधेरी (पूर्व), मुंबई–४०० ०९९.

व्यापाऱ्यांना बँकेकडून मिळवून देण्याचे कार्यही संस्थेने चालू केले आहे. संस्थेची चालू थकबाकी अगदी अल्प असून तीन वर्षांवरील थकबाकी नाही. संस्थेला ऑडिट वर्ग "अ" मिळाला आहे. संस्था २० कलमी कार्यक्रमाखाली सभासदांसाठी ग्राहक भंडार नियंत्रित व अनियंत्रित कापड दुकान चालविते. शेतकऱ्यांना योग्य दरात खत व जंतूनाशकेही संस्था पुरविते. संस्थेच्या मालकीची सुमारे २० हजार रुपये किमतीची चिरेबंदी इमारत होती श्रीकनकादित्य मंदिराजवळ आहे.

४) **जनता सेवा संघ मुंबई** – गांवच्या लोकांना सुशिक्षित करणें, लोकशाही तत्वावर निरनिराळचा क्षेत्रांतील संस्था चालवायला शिकविणे आणि ग्रामस्थांच्या अडचणी दूर करणे, या उद्देशाने ही संस्था स्थापन झाली आणि ती १९५६ साली रजिस्टर झाली. कशेळी आणि परिसरांतील रहिवाशांसाठी सार्वजनिक दवाखाना सुरु करण्याच्या खटपटींत सध्यां ही संस्था आहे. त्या हेतूने संकल्पित दवाखान्यासाठी श्री. श्रीधर राजाराम हर्डिकर यांनी मोफत दिलेल्या जमिनीवर इमारत बांधली. अडीच लाख रुपये जमवून त्याचा सार्वजनिक विश्वस्त निधी करावा आणि त्याच्या कायम उत्पन्नांतून डॉक्टर नेमून हा दवाखाना शक्य तितक्या लवकर सुरु करावा अशी ही योजना आहे हा निधी गोळा गोळा करण्याचे काम सध्या संस्था करीत आहे.

ज्यांच्याकडे हा संघ स्थापन करण्याचे श्रेय आहे त्या कै. श्रीधर बाळाजी कुळकर्णी यांचे स्मारक उभारण्यासाठी नेमलेल्या समितीने निधी जमा केला, स्थानिक ग्रामस्थांनी देणगी दाखल इमारती लाकडे दिली. त्यामधून त्यांचे स्मारक म्हणून ही इमारत बांधली आहे. आता ही समिती मूळ संस्थेत विलीन झाली आहे.

५) **जनता सहाकारी पतपेढी लि. मुंबई** – कशेळी जनता सेवा संघाने ही पतपेढी १९४८ साली सुरु केली. प्रत्येकी ५ रु. भाग व रु. ५००० भागभांवल एवढचावर पतपेढी सुरु केली. मुंबईत काम करणाऱ्या कशेळीच्या गरीब लोकांना पिढयान् पिढया चालत आलेल्या सावकाराच्या कर्जातून मुक्त करणे आणि त्याच बरोबर त्यांना दरमहा काही ना काहीतरी पैसे (अगदी आठ आणे सुद्धा) शिल्लक ठेवण्याची सवय लावणे असा सुरुवातीचा मर्यादित उद्देश होता. नंतर सहकारी संस्था कशा चालवाव्या याचे शिक्षण देऊन काही सेवाभावी ग्रामस्थांना तयार करण्यात आले हे सुरुवातीचे कार्यकर्ते आणि त्यांचे सहकारी यांच्या प्रामाणिक आणि निरलस परिश्रमांचे फळ म्हणजे आज या पतपेढीचे ४८० वर सभासद व शेअर भांडवल १ लाख आहे. ते सारे सभासद सावकाराच्या पाशातून मोकळे झाले आहेत. त्यांनी शिल्लक ठेवलेली रक्कम दीड लाख रुपयांच्या घरात आहे. आणि पतपेढीची वार्षिक उलाढाल ३ लाख रुपयांपर्यन्त गेली आहे.

---


हार्दिक शुभेच्छा –

**कमला कार्डस्**

ग्रिटींग्ज व लग्नपत्रिकांचे व्यापारी

खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई–४०० ००४.

आहे. आज अनेक तरुण लोक गावात रहिले आहेत. भातशेती किफायतशीर होत नसल्यामुळे आता लोक फळबागांची लागवड करू लागले आहेत. १९६६ च्या चक्रीवादळात गावातील ७५ टक्के फळझाडे नष्ट झाली होती. पण ग्रामस्थांच्या प्रदीर्घ मेहनतीमुळे त्या जागी पुन्हा फळबागा उभ्या राहिल्या आहेत. आता नारळ, सुपारी, केळी, आंबा, फणस, काजू, चिंच, कोकम, अननस, काळेमिरी, जायफळ, कोको, लवंग दालचिनी या फळझाडांचे व मसाल्याच्या पिकांचे उत्पन्न शास्त्रीय पद्धत व आधुनिक तंत्रज्ञान यांचे सहाय्याने वाढवायला हवे. तसेच त्यावर आधारित लहान मोठे उद्योगधंदे सुरु करायला हवेत. तसेच मासेमारीची परंपरागत पद्धत बदलून आधुनिक पद्धतीने लाँच व नायलॉन जाळी वापरुन मासेमारीचे उत्पादन वाढविले पाहिजे. छोटया मासेमारी होडया लावणे-साठी किनाऱ्यालगत लहान धक्का बांधण्याच्या योजनेचा पाठपुरावा केला पाहिजे.

गावात हायस्कूल काढणेचे धाडसी पाऊल श्री लक्ष्मीनारायण शिक्षण प्रसारक मंडळाने उचलेले आहे. हायस्कूल शिक्षणाला ग्रामीण भागात करता येणाऱ्या छोटया धंद्यांच्या शिक्षणाची तसेच तांत्रिक शिक्षणाची जोड द्यायला पाहिजे तसेच किमान १२ वी पर्यन्तचे शिक्षण गांवात घेता येईल अशी सोय केली पाहिजे.

कोंडसर खारलॅन्ड बंधारा बांधून पुरा झालेवर खारटाण खाजण जमिनी लागवडीला आणणे-साठी सहकारी तत्वावर शेतकऱ्यांना संघटीत केले पाहिजे. सावरे धरण पूर्ण झालेवर उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा पुरेपुर वापर करण्याची योजना आजपासून तयार केली पाहिजे.

गावात सुसज्ज वाचनालय, व्यायामशाळा व क्रीडांगण नाहीत नवीन पिढीच्या गरजा लक्षात घेता या गोष्टींची अग्रक्रमाने आवश्यकता आहे. मागील वर्षीच्या दुष्काळापासून योग्य धडा घेऊन गावातील नष्ट होत चाललेली जंगले पुन्हा वाढविण्याचे कार्य युद्धपातळीवरुन होणे आवश्यक आहे.

कशेळी गावाचा इतिहास पहाताना या गावाचे नाव जगात अजरामर करणाऱ्या काही सुपुत्रांची माहिती घेणे अत्यंत महत्वाचे आहे. त्याचप्रमाणे आजही गावच्या किर्तीमध्ये आपल्या कर्तृत्वाने भर टाकीत असलेल्या लहानमोठ्या ग्रामस्थांचीही माहिती घेणे आवश्यक आहे. अशा व्यक्ती

**कै. राजारामशास्त्री भागवत** – (१८५१ ते १९०८) कै. राजाराम रामकृष्ण भागवत ही ज्ञात असलेली कशेळीतील पहिली नामवंत व्यक्ती. जन्म कशेळी पण शिक्षण मुंबईत. संस्कृत, पाली, प्राकृत, अरबी, लॅटिन, ग्रीक, फ्रेंच व हिंदी भाषा यांचा अभ्यास केला. ऋग्वेद, मराठ्यांचा इतिहास व मराठी संस्कृती यांचा विशेष अभ्यास. सेंट झेव्हियर कॉलेजमध्ये ३० वर्षे संस्कृतचे अध्यापक म्हणून काम केले. त्यांची मते क्रांतिकारक होती. महात्मा फुले यांचे नंतर ब्राह्मणेतर दलित, शोषित

शुभेच्छा –
**म. बा. चव्हाण**, मुख्याध्यापक
श्री महाकाली इंग्लिश स्कूल, आडिवरे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी.

समाजाच्या चळवळीची सूत्रे त्यांनी हाती घेतली. वैदिक धर्मामध्ये जातिभेद, लोभ, अज्ञान, असत्य यांना थारा नाही अशी त्यांची शिकवण होती.

**कै सखाराम केशव (बापूसाहेब) भागवत** – (१८६१ ते १९३४) जन्म कशेळीत. मुंबईत बी.ए. एलएल.बी. झाले. ठाणे येथे सरकारी वकील म्हणून अनेक वर्षे काम केले. १९२० साली शासनाने त्यांना रावबहाद्दुर पदवी देऊन गौरव केला.

**कै. राजाराम सखाराम भागवत** – (१८८५ ते १९६८) जन्म कशेळीला. शिक्षण मुंबईला एम. ए. (केमिस्ट्री) थिऑसॉफीचा अभ्यास व प्रचार केला. त्यांना ॲनी बेझंट यांचे वारस मानतात. त्यांनी 'पूनर्जन्म आहे का?', 'मृत्यू आणि मृत्यूनंतर', 'ॲनी बेझंटचे चरित्र', 'कर्माचा सिद्धांत', 'जे. कृष्णमूर्तींचे चरित्र', 'राजयोगाची मूलतत्वे', 'संत व साक्षात्कार' इत्यादी ग्रंथ लिहिले. अविवाहित राहून थिऑसॉफीचा प्रचार केला. यांच्या १०० व्या जन्मदिनी जागृती मासिकाने 'खास' भागवत अंक प्रसिद्ध केला.

**कै. सीताराम बाबाजी गुर्जर** – हे साहित्यिक होते. त्यांनी संस्कृतमध्ये २/३ पुस्तके लिहिली होती. 'उदार दामोदर' हे नाटक लिहिले.

**कै. विठ्ठल सीताराम गुर्जर** – (१८/५/१८८५ ते १९/९/१९६२) जन्म कशेळी. शिक्षण मुंबईत. वडिलांचा लेखनाचा वारसा घेऊन सुमारे १००० कथा, १० नाटके, १० कादंबऱ्या, बंगाली व इंग्रजी कादंबऱ्यांचे रुपांतर केले. द्राक्षांचा घोस हा कथासंग्रह प्रसिद्ध. एकच प्याला नाटकाची अमर पदे यांनीच लिहिली. कशेळी गावी सतत ४० वर्षे राहून लिखाण केले.

**कै. त्र्यंबक शंकर शेजवलकर** – (२५-५-१८९५ ते २८-११-१९६३) जन्म कशेळीत. शिक्षण मुंबईत. बी.ए. पास. इतिहास संशोधनाची गोडी त्यासाठी इतिहासशास्त्र, भूगोलशास्त्र, भूस्वरुपवर्णनशास्त्र, कालगणना शास्त्र, राजनीतीशास्त्र, समाजशास्त्र, सैन्यरचना शास्त्र, संस्कृत व गणित या विषयांचा अभ्यास केला 'प्रगति' या साप्ताहिकाचे १९२९ मध्ये संपादक झाले. 'पानिपत १७६१', 'नानासाहेब' हे लेख वादळी ठरले. भारत सरकारने त्यांचेवर शिवचरित्र लिखाणाचे काम सोपविले होते. पण ते पुरे झाले नाही. त्यासाठी त्यांनी एकत्र केलेली टाचणे व साहित्य इतके प्रचंड आहे की मराठी वाङमयात त्याला तोड नाही.

**कै. रघुनाथ भगवंत कळके** – जन्म व वास्तव्य कशेळी. शिक्षण थोडेच पण संस्कृतचा गाढा अभ्यास-रामायणावर टीकात्मक लिखाण लिहून अंधश्रद्धेला धक्का दिला. ज्योतिष शास्त्राच्या

शुभेच्छा –
**प्रकाश रामचंद्र चव्हाण**
मु. राजीवडा, पो. ता. जि. रत्नागिरी.

आधारे रामायणाच्या काळासंबंधी त्यांनी लेख लिहिले. ते चांगले लेखक होते. त्या काळात गावच्या सुधारणा विषयक गोष्टीत ज्या चार ज्येष्ठ व्यक्ती रस घेत निर्णय करीत असत त्यात रघुनाथराव हे एक होते.

**कै. विठ्ठल हरी कुळकर्णी** – (१४-८-१९०२ ते ९-१२-१९८२) जन्म कशेळीला. शिक्षण मुंबईला. इंग्रजी घेऊन एम.ए. झाले व इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून रुइया कॉलेजमध्ये १९४१ मध्ये दाखल. १९६२ पर्यन्त अत्यंत लोकप्रिय व विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून काम केले. "इंग्लिश" शिकविण्यात त्यांचा हातखंडा होता. ते काही वर्षे 'प्रतिभा' व 'ज्योत्स्ना' मासिकांचे संपादक होते. 'व्यक्तिचित्रे', 'केळकर चरित्र' व 'अ ब. कोल्हटकर चरित्र' हे ग्रंथ त्यांनी लिहिले. त्यांच्या विद्यार्थी वर्गात फार विद्वान लोकांचा समावेश आहे. त्यांनी आपल्या गुरुजींच्या स्मृती प्रीत्यर्थ "As you Like him" हे पुस्तक लिहिले आहे. मृत्यू अमेरिकेत मुलाचे घरी झाला.

**कै. राजाराम हरी शेजवलकर** – जन्म कशेळीत. पण पुढे ते लाहोर येथील मेयो स्कूल ऑफ फाइन आर्टस् मध्ये मॉडेलिंग सेक्शनचे प्रमुख होते. त्यांनी अखिल भारतीय स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते. ते अव्वल दर्जाचे आर्टिस्ट होते. लाहोर येथील आपल्या घराला त्यांनी 'महाराष्ट्र मंडळ' असे नाव दिले होते. लोकमान्य टिळक, डी. व्ही. पलुस्कर वगैरे मोठमोठे महाराष्ट्रियन लाहोरला जात तेव्हा येथेच रहात असत.

**कै. महादेव विष्णू साबरे** – जन्म कशेळी पण पुढे ते लाहोर येथील मेयो स्कूल ऑफ फाइन आर्टस् मध्ये ड्रॉइंग विभागाचे प्रमुख होते.

**कै. श्रीधर बाळाजी कुलकर्णी** – कशेळीत १८-४-१९२० रोजी जन्म प्राथमिक शिक्षणही कशेळीत झाले. हायस्कूल शिक्षण हिंद विद्यालय हायस्कूल मधून, विल्सन हायस्कूल मधून इंग्लिश विषय घेऊन बी.ए. पास झाले. इंग्लिश विषयाचे ते उत्कृष्ट शिक्षक गणले जात. युवक चळवळीत ते भाग घेत असत. गरीब लोकांच्या उद्धारासाठी त्यांनी जनता सेवा संघ, कशेळी व जनता सहकारी पतपेढीची स्थापना केली संयुक्त महाराष्ट्र चळवळीत कै. न. र फाटक, कै बॅ. नाथ पै, कै. म. म. दत्तो, वामन पोतदार याचे मार्गदर्शनाखाली ते काम करीत. हायस्कूल व कॉलेज मध्ये फक्त पुस्तकी शिक्षण दिले जाते विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकसित करण्याचा त्यामध्ये प्रयत्न नसतो. तेव्हा विद्यार्थ्यांना पुस्तकी शिक्षणाबरोबरच त्यांचे व्यक्तिमत्व विकसित करुन त्यांच्यामध्ये सामाजिक व राष्ट्रीय जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याचा प्रयोग करण्यासाठी त्यांनी जानेवारी १९५१ मध्ये हायस्कूल व कॉलेजच्या विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी "जनता टयुटोरियल ॲकॅडेमी" या नावाने

हार्दिक शुभेच्छा –
**अनंत यशवंत तळये**
मु. कोंडसर, पो. आडिवरे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी.

गिरगावात मेहेंदळे बिल्डिंग मध्ये क्लासेस सुरु केले. विद्यार्थ्यांच्या वैयक्तीक कौटुंबिक समस्यांचे बाबतीतही ते त्यांना मार्गदर्शन करीत त्या मुळे ते आपल्या कुटुंबातलेच आहेत असे विद्यार्थ्यांना वाटे. त्यांना शिकवून तयार केलेले अनेक विद्यार्थी फार यशस्वीपणे आपले जीवन जगून सामाजिक कार्य करीत आहेत डिसेंबर १९५४ मध्ये त्यांचे मोटारसायकल अपघातात अकाली निधन झाले. त्यांच्या मागे त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती विद्यावाहिनी या आजपर्यन्त हे क्लासेस चालवीत आहेत.

**कै. शंकर बाळकृष्ण ओळकर** – (१८९० ते १९७३) जन्म कशेळीत. गरिबीत आयुष्याला सुरुवात केली. १९१२ मध्ये एका गिरणीत महिना १० रु. पगारावर कष्ट, प्रामाणिकपणे, चिकाटी आणि नवीन गोष्टी शिकण्याची इच्छा आणि त्यासाठी पडतील ते कष्ट उपसण्याची तयारी या गुणांमुळे त्यांना बढती मिळत अहमदाबादच्या गुजरात कॉटन मिलच्या मॅनेजरपदी पोचले. व तेथून १९४२ मध्ये निवृत्त झाले उर्वरित आयुष्य त्यांनी कशेळी गावात घालविले. गावच्या सर्व सामाजिक कार्यात ते भाग घेत असत.

**कै गुणाजी विठ्ठल माळी** – कशेळी गांवी गरीब कुणबी घराण्यात जन्म घेऊन नोकरी निमित्त मुंबईत आले तेथे नोकरी सांभाळून ज्ञातिबांधवांच्या हितासाठी झटत असत. गरीब कुणबी समाजाला सावकराच्या मगर मिठीतून सोडविण्यासाठी त्यांनी कुणबी सहकारी बॅन्केची स्थापना केली. आज ही बॅन्क चांगलीच वाढली असून मुंबई व पुणे येथेही या बॅन्केच्या अनेक शाखा काम करीत आहेत. कुणबी समाजाची शैक्षणिक व सांस्कृतिक परिस्थिती सुधारण्यासाठी त्यांनी तिल्लोरी कुणबी सेवा संघाची स्थापना केली. ज्या काळात समाजात ५ टक्के लोकही शिक्षित नव्हते त्यावेळी या संस्था स्थापन करणारे कै. माळी हे मोठे द्रष्टे पुरुष होते यात शंका नाही.

**कै. सखाराम सदाशिव भागवत** – (१९०२ रे १९५७) जन्म सावंतवाडी जवळच्या कोबुर्ले गावी, चार वर्षाचे असताना कशेळीला आले व प्राथमिक शिक्षण आडिवऱ्यात झाले. प्राथमिक शिक्षण झाल्यावर तबला वादनाचे शिक्षण घेण्यासाठी आसूद गावी अप्पा दामले यांचेकडे गेले. गुरुंनी तबल्याचा बोल सांगितला की प्रथम तो लाकडावर वाजवून गुरुंचे पसंतीस आल्यावर मगच जसाच्या तसा तबल्यावर उमटवायचा अशा प्रकारे त्यांनी तबल्याचे शिक्षण घेतले. त्यांनी अनेक नामवंत गवयांची साथ केली होती मीरादेवी चटर्जी या नर्तिकेबरोबर ते तबलासाथ करण्यासाठी इंग्लंडमध्ये गेले होते. १९३३ ते १९५३ या वीस वर्षाच्या काळात मुंबईत त्यांनी अनेकांना तबल्याचे शिक्षण दिले. १९५३ साली ते कशेळीला रहायला गेले. कशेळी परिसरातील अनेक तरूणांना त्यांनी मृत्यूपूर्वी तबलावादनाचे शिक्षण दिले.

**कै. रामचंद्र भिकाजी नाफडे** – (१८५५ ते १९५२) जन्म कशेळीत. मुंबईत हायस्कूल

शुभेच्छा –

**लक्ष्मण ह. फडके**

मालाड.

शिक्षण घेत असतानाच ते सोडून तबला शिक्षणाची संधी मिळवून बडोद्याला गेले. नागपूर संस्थानात तबलजीची नोकरी केली आणि हिंदुस्थानातील अनेक ख्यातनाम गायकांची साथ दिली. राजापूरकर नाटक मंडळी आणि प्रभात कंपनीत नोकरी केली व नंतर स्वतंत्रपणे साथ करीत. ते पखवाजही उत्तम वाजवीत. त्यांनी अनेकांना त्याचे शिक्षण दिले. आंतरबाह्य स्वच्छ व वक्तशीर म्हणून ते प्रसिद्ध होते. ते कीर्तनही करीत. पुढे कशेळीला गेले व तेथेच अखेरपर्यन्त राहिले.

**कै भास्कर नीळकंठ सावरे** उर्फ **भाऊ सावरे** – (१८८० ते १९४५) कशेळी गावच्या जडण घडणात यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यानी कशेळी गावात "कशेळी सोसायटी"ची स्थापना करण्यात फार परिश्रम घेतले व ती यशस्वीपणे चालविली. कशेळी गावात ग्रामपंचायतीची स्थापना केली. कशेळीचे कनकादित्य मंदिर व देवीहसोळचे आर्यादुर्गा मंदिर यांचे नैमित्तिक कामात व विशेष दुरुस्तीचे कामात यांनी लक्ष घालून देवळांच्या इमारती अद्यावत केल्या. गांवकऱ्यांनी त्यांचे स्मारक म्हणून कशेळी सोसायटीची इमारत बांधली आहे.

**कै. बाबाजी कृष्णाजी कुळकर्णी** उर्फ **बाबल्याभाऊ कुलकर्णी** – (१८९० ते १९६०) कशेळी गावची सोसायटी व ग्रामपंचायत यांच्या स्थापनेत महत्वाचे कार्य. लक्ष्मीनारायण मंदिर, आगवादेवी मंदिर यांचे नैमित्तिक उत्सव व धार्मिक विधी यांची स्वतः व्यवस्था करीत. आपल्या स्वच्छ चारित्र्याने त्यांनी आदराचे स्थान संपादन केले होते.

**कै. राजारामभाऊ हर्डिकर** – गावच्या सर्व सार्वजनिक कार्यात यांचे फार मोठे सहकार्य असे. ग्रामपंचायत व सहकारी संस्था स्थापना करण्याचे कामी यांनी परिश्रम घेतले. कशेळीचे शाळा नं. १ चे इमारतीसाठी त्यांनी आपली जागा मोफत दिली. म्हणूनच शाळेची इमारत बांधणे शक्य झाले.

**कै. जगन्नाथ विष्णु सावरे** – जन्म कशेळीत. प्राथमिक शिक्षक म्हणून नोकरीला सुरुवात. नोकरी करताच "रत्नागिरी जिल्ह्याचा भूगोल" हे पुस्तक लिहिले. ते शासनाने इयत्ता ३ री साठी शिक्षणक्रमात लागू केले होते. ते मांत्रिक होते मंत्राच्या पाण्याने ते सर्व वीष उतवीत असत. तसेच मंत्राच्या पाण्याने चर्मरोग बरे करीत. त्यांच्या मत्राच्या पाण्याने गुण आलेले अनेक सुशिक्षित लोकही आज हयात आहेत. ते जनावरांच्या रोगावर झाडपाल्याची औधधे देत असत. "जनावरांचे रोग व त्यावर इलाज" हे त्यांनी लिहिलेले पुस्तक नवीन पिढीतील जनावरांचे वैद्य यशस्वीपणे वापरीत आहेत. ज्याकाळात तालुक्यात राजापूरशिवाय कोठेही हायस्कूल नव्हते त्या काळात म्हणजे १९३० मध्ये त्यांनी कशेळी येथे हायस्कूल चालविले. हायस्कूल बरोबर बोर्डिंगचीही सोय केल्यामुळ

शुभेच्छा –
**गणेश कृपा**
ग्रँट रोड रेल्वे स्टेशन.

जिल्ह्यातील लांबवरची अनेक मुले कशेळीत हायस्कूलचे शिक्षण घेत होती. सन १९४९ मध्ये शासनाने ७ वी पर्यन्तचे इंग्लिश काढून टाकल्यामुळे हे हायस्कूल बंद करावे लागले.

**कै अनंत गोविंद आवळकर उर्फ तात्या खोत** – हे गावचे खोत होते पण खोत शब्दाबरोर येणारा दुर्गुण यांच्यामध्ये नव्हता. साधी रहाणी, समाजवादी विचारसरणी यामुळे दलित व कुणबी समाजात ते प्रिय होते. ज्या काळात हरिजन मुलांना शाळेत प्रवेश नव्हता त्यावेळी त्यांनी आपल्या घरात हरिजनासाठी शाळा काढली होती. त्यामुळे आप्त व स्वजनांची फार मोठी टीका व विरोध त्यांना सहन करावा लागला. तरीही त्यांनी आपले कार्य थांबविले नाही.

**कै. अनंत आसुभाऊ कुळकर्णी** – परदेशी बोटीवर नोकरी निमित्त अफ्रिकेत गेले. निवृत्त झाल्यावर कशेळीला पोस्ट ऑफीस सुरु करुन त्याचे पहिले पोस्ट मास्तर झाले. हापूस आंब्यांची निरनिराळ्या प्रकारे कलमे तयार करण्याचे बाबतींत त्यांनी मोठे संशोधन केले होते. मोठचारायवळ आंब्यावर शेंडा छाटून फुटणाऱ्या फांद्यांना ते निरनिराळ्या प्रकारची कलमे बांधीत व त्या काळात एकाच झाडावर अनेक जातींची फळे घेण्याची किमया त्यांनी करुन दाखविली.

**कै. गोविंद महादेव हर्डिकर** – कशेळीत जन्म प्राथमिक शिक्षण झाल्यावर मुंबईत आले. वकिलीची परीक्षा देऊन रेल्वेचे वकील म्हणून नोकरी केली. कायद्याचा अभ्यास उत्तम, त्याचबरोबर उत्तम वक्ते होते. नोकरीतून निवृत्त झाल्यावर १९४५ मध्ये कशेळीला रहायला गेले. ते गरीब व दलित लोकांना सहाय्य करणारे दानशूर गृहस्थ होते. गांवच्या प्रत्येक सामाजिक कार्यात ते अखेर पर्यन्त भाग घेत असत.

**कै. बाबुराव सुतार (मेस्त्री)** – हे फार निष्णात मेस्त्री होते. लाकडावर कलाकुसरीचे काम करण्यात त्यांचा हातखंडा होता. कनकादित्य मंदिराचे सभामंडपाचे १२ फूट लांब व ३ फूट घेराच्या अखंड लाकडाचे खांब त्यांनी कोणत्याही यंत्राशिवाय टर्निंग (कातकाम) करुन दिले. तसेच त्या खांबावर उत्तम नक्षीकाम कोरले आहे.

**कै. अनंतराव भागवत उर्फ अंतूकाका भागवत** – हे कशेळी गावचे पहिले पोलिस पाटील. कायद्याचा उत्तम अभ्यास म्हणून त्यांनी एकदां वर्दी न देता गावात आलेल्या सरकारी अधिकाऱ्याला अटक केली होती. सरकार दरबारी त्यांचा दरारा फार होता.

**कै. लक्ष्मण गंगाधर भागवत उर्फ लखूनाना भागवत** (१८८५ ते १९८४) हे अत्यंत अबोल व सालस वृत्तीचे होते. कोणाच्याही संकटात ते प्रथम धावून जात घड्याळे तुरुस्तीची कला ते शिकले

---

हार्दिक शुभेच्छा –
**म. चि. साखळकर**
मॅनेजर, रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., रत्नागिरी.

होते. पण ग्रामस्थांची घड्याळे मोफत दुरुस्त करुन देत असत. वीषबाधेवर व काही आजारावर ते वनस्पतींची औषधे देत असत. फुरसे, घणस वगैरेच्या विषाराने आजारी झालेल्या अनेक लोकांना त्यांनी बरे केले होते.

**कै. नारायण हरशेट गुजर** – (१८७१ ते १९५६) हे गावातील जुने पशुवैद्य. जनावरांच्या रोगावर ते झाडपाल्याचे औषधोपचार करीत. तसेच प्रसूतीचे वेळी अडलेली जनावरे ते उत्तम प्रकारे सुटका करुन वाचवीत असत. या परिसरातील लोकांना त्यावेळी त्यांचा मोठाच आधार वाटत असे.

**कै. गुणीजी दुदम** – हेही त्या काळाचे गुरांचे वैद्य होते. झाडपाल्याच्या औषधानी ते गुरांचे रोग बरे करीत. काही रोगात जनावरांना निरनिराळ्या भागावर डाग देऊन ते रोग बरा करीत. जनावरांच्या पायात भरलेले काटे ते मोठ्या कौशल्याने काढीत असत व हे सर्व काम ते समाजसेवेच्या दृष्टीकोनातू मोफत करीत असत.

**कै. वासुदेव विनायक लाड** – जन्म कशेळीत. कुणबी समाजातील गरीब घराण्यात नोकरी निमित्त मुंबईला आले. भजनाचे शिक्षण घेऊन प्रख्यात भजनीबुवा बनले.

**कै रामचंद्र श्रीकृष्ण हर्डिकर** – वकील – प्राथमिक शिक्षण कशेळीत, हायस्कूल शिक्षण राजापूरात व कॉलेज शिक्षण डेक्कन कॉलेज पुणे येथे बी.ए., एलएल.बी. झाल्यावर राजापूर कोर्टात वकिली केली. कायद्याचा त्यांचा अभ्यास दांडगा होता. काही केसिसमध्ये न्यायमूर्ती ही त्यांना कायद्याचा संदर्भ विचारीत असत. याशिवाय वैदिक, धार्मिक, वाङमय व संस्कृत भाषेचा त्यांचा अभ्यास दांडगा होता. पंचांगासाठी आवश्यक ड्रिगॉनॉमेट्री गणिताचाही त्यांचा व्यासंग होता. गुळवणी पंचांग कर्त्यांना ते मदत करीत असत. राजापूर हायस्कूल व राजापूर संस्कृत पाठशाळेचे ते अनेक वर्षे अध्यक्ष होते. कशेळीच्या शैक्षणिक व सामाजिक कार्यात ते फार मदत करीत. त्यांचा मृत्यू ता. २९/१/१९७७ रोजी झाला.

**कै. यशवंत भास्कर भागवत** – जन्म १९२८ मृत्यू १९८४. जन्म कशेळीत मराठी शिक्षण कशेळीत. हायस्कूल शिक्षण राजापूरला चालू असता १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीत भाग घेऊन शिक्षण सोडले. त्यांना एकदा चळवळ केल्याबद्दल अटक झाली होती. पुढे मुंबईला १०/१२ वर्षे औषधी दुकानाचा व्यवसाय केला नंतर कशेळी गावी राहिले. कशेळी गावचे सरपंच होते राजापूर तालुका जनता पक्षाचे काही वर्षे अध्यक्ष होते. कौलकारखान्याच्या डायरेक्टर बोर्डावर सदस्य होते. कशेळी गावच्या सर्व सामाजिक व शैक्षणिक चळवळीत सहभाग.

---


शुभेच्छा –

**मुळे ब्रदर्स**

मु. पो. कशेळी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी

**श्री. भास्कर यशवंत ओळकर** – जन्म कशेळीत सन १९३८. प्राथमिक शिक्षण कशेळीत. हायस्कूल शिक्षण राजापूर हायस्कूल मध्ये पुढे मुंबईला येऊन नोकरी करुन उच्च शिक्षण घेतले. बॅन्क ऑफ इंडियामध्ये अधिकारी पदावर नेमणूक, पुढे ५ वर्षे बॅन्क ऑफ इंडियाचे लंडन शाखेत नेमणूक व त्यानंतर १० वर्षे हॉंगकॉंग शाखेत मोठ्या अधिकारावर नेमणूक. सध्या पुणे येथे नेमणूक.

**श्री. दिगंबर सीताराम फोडकर** – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळी येथे. मुंबईला नोकरी निमित्त आले. नोकरी करुन उच्च शिक्षण घेतले. सध्या मुंबई महापालिकेत अधिकारी म्हणून नोकरी· गावचे सर्व सार्वजनिक कार्यात सहभाग.

**श्री. भार्गव रावजी हळदणकर** – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत. नंतर शेती व्यवसाय सांभाळून माडी व्यवसायही केला. हे अव्वल दर्जाचे शिकारी असून गावातील शेतकऱ्यांना उपद्रव देणारे वाघ व डुक्कर यांची शिकार यांनी केली. अनेक वर्षे त्यांनी बहुजन समाजाचे नेतृत्व केले.

**श्री. रघुनाथ रावजी हळदणकर** – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत. व्यवसाय शेती व माडी दुकान. शेतोला जोडधंदा म्हणून यांनी आंबा विक्री व्यवसाय केला. यांच्या सचोटीच्या व्यापारामुळे अनेक मोठे बागायतदार यांचे शिवाय अन्य कोणाला आपली बाग देत नाहीत. हे मोठ दानशूर मानले जातात. कोणत्याही सार्वजनिक कार्यांत उदार हस्ते मदत करतात.

**श्री. रामचंद्र पर्शराम कशाळकर** – जन्म व शिक्षण कशेळीत. पुढे काही दिवस मुंबईला राहून परत कशेळीला आले. आपला पिढीजात सोनारकामाचा धंदा सांभाळून शेती व कलम बाग·" यतीकडे विशेष लक्ष दिले. या परिसरात काडतुसी बंदूक आणून शिकार करणारे हे पहिले शिकारी· यांनीही शेतकऱ्यांना उपद्रव देणारे काही वाघ व शेकडो डुकरांची शिकार केली.

**श्री. चंद्रकांत रघुनाथ कशेळकर** – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत. पुढे नोकरीसाठी मुंबईत आले. अत्यंत गरिबीत हायस्कूल व कॉलेज शिक्षण घेतले. पुढे मुंबई हायकोर्टात नोकरीला लागले. सध्या गॅझेटेड ऑफिसर आहेत. कोकण प्रांतातील पांचाळ (सुतार) समाज मंडळाचे जनरल सेक्रेटरी, विश्वकर्मा ज्ञातिबांधव कशेळी सुतारवाडी या संस्थेचे संस्थापक व सेक्रेटरी, विवाह मंडळ मुंबईचे संचालक अशा अनेक सामाजिक संस्थात काम करतात. कशेळीगावचे विकास कार्यात विशेष लक्ष घालून अनेक समस्या सरकारदरबारी पोचवितात.

**भिवा नागू गोठणकर** – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत. मुंबईला नोकरी करुन हायस्कूल शिक्षण केले. डोंबिवली येथील टाइम केमिकल्स प्रा. लि. कंपनीत मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून काम

With Best Wishes From :
SHRI. DILIP J. SHAH
9-A, Ramjhruka, S. V. Road, Andheri (West), Bombay-400 058.

पहातात. केमिकल उत्पादनाची सर्व जबाबदारी यशस्वीपणे सांभाळतात. गावच्या कोणत्याही कामात सहकार्य.

**सहदेव धर्माजी सातोपे** – कशेळी गावच्या सार्वजनिक कार्यात सहभाग. जनता सहकारी पतपेढीचे कामात फार परिश्रम घेतले

**शरद बाळकृष्ण धाकस** – प्रगतिशील शेतकरी. जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत. १९८६ च्या दुष्काळातही विक्रमी भातशेतीचे पीक काढून जिल्हा पातळीवर पहिले बक्षीस मिळाले.

**रामचंद्र धर्माजी सातोपे** – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत. पुढे मुंबईत नोकरी करुन हायस्कूल शिक्षण घेतले. सध्या महाराष्ट्र नाइट हायस्कूल ही शाळा चालवितात.

**राजा सुतार** – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत. मुंबईला नोकरी करुन हायस्कूल शिक्षण पुरे केले. गेली २५ वर्षे सामाजिक कार्य करतात. अनेक सामाजिक व धार्मिक संस्थांच्या कार्यात सहभाग. सध्या शिवसेनेच्या बांद्रा ते अंधेरी विभागाचे उपविभागप्रमुख म्हणून काम करतात.

**पर्शराम बाबुराव फणसे** – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत. मुंबईत येऊन अल्प शिक्षण असताही बिल्डिंग बांधणेचे काम उत्कृष्टपणे करतात. गावच्या सार्वजनिक कार्यात नेहमी आघाडीवर असतात.

**नारायण धोंडू फणसे** – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत. मुंबईला आल्यावर वॉचस्ट्रॅप कारखान्यात काम करुन नंतर स्वतःचा कारखाना काढला. सध्या 'इमिटेशन जुवेलरीचा स्वत.चा कारखाना' काढून यशस्वीपणे चालवितात.

**काशिनाथ चंद्रकांत जाधव** – जन्म वेत्ये. प्राथमिक शिक्षण कशेळीत. कशेळी गाव आपलाच मानून गावचे धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक कामात सहकार्य. सध्या स्टॅम्प ऑफिसमध्ये अधिकारी पदावर नोकरी नाट्यसेवेची हौस. अनेक नाटकात पतिपत्नींनी उत्कृष्ट कामे केली.

**श्री. हरीभाऊ महादेव जाधव** – जन्म वेत्ये. प्राथमिक शिक्षण कशेळीत. हायस्कूल शिक्षण मुंबईत. मुंबई म्युनिसिपालिटीमध्ये अधिकारी म्हणून नोकरी. आता नोकरीतून निवृत्त होऊन राजापूर जवळ मोठी जमीन घेऊन नारळ, सुपारी, हापूस आंबा, काजू यांची लागवड करुन तेथेच राहतात. कै. प. पू पांचलेगावकर महाराजांचे अनुग्रहीत. या परिसरातील सर्व सामाजिक कार्यात मोठी मदत

---

शुभेच्छा –

**एक शुभचिंतक**

**मधुकर शंकर जाधव** – जन्म वेत्ये. प्राथमिक शिक्षण कशेळीत. हायस्कूल शिक्षण मुंबईत. कॉलेज शिक्षण मुंबईत ग्रॅज्युएट झाल्यावर सचिवालयात नोकरी. सध्या शिपिंग कार्पोरेशन मध्ये ऑफिसर म्हणून नोकरी. यांच्या सुविद्य पत्नी महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशनमध्ये ऑफिसर आहेत. सार्वजनिक कामात सहकार्य.

**गणपत महादेव ठकरुळ** – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत. हायस्कूल शिक्षण मुंबईत. स्वत:च्या हिम्मतीवर स्क्रीन प्रिंटिंगचा व्यवसाय 'शार्प अेन्टरप्राइजेस' या नावावर यशस्वीपणे चालवितात. गेली १५ वर्षे गावची व समाजाची सेवा करतात.

**नरेंद्र हरिश्चंद्र घाणेकर** – जन्म, प्राथमिक शिक्षण, हायस्कूल व कॉलेज शिक्षण मुंबईत. असोसिएटेड सिमेंट कंपनीत नोकरी. वडिलांची सार्वजनिक कार्याची दीक्षा यांनी लहानपणीच घेतली. गेली १५ वर्षे कशेळी-गावखडी-आडिवरे परिसराची समाजसेवा करीत आहेत. तिल्लोरी कुणबी बॅन्केचे डायरेक्टर बोर्डाचे सदस्य आहेत.

**मधुकर मारुती पेडणेकर** – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत. हायस्कूल शिक्षण मुंबईत. स्टॅम्प ऑफिसमध्ये नोकरी करुन कशेळी गावच्या सर्व सामाजिक कार्यात संघटकाचे कार्य करतात. तसेच दत्तमंदिराच्या कार्यात अपार कष्ट घेतात.

**श्री. श्रीराम विनायक भागवत** – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत. हायस्कूल शिक्षण मुंबईत पुढे अहमदाबाद येथे जाऊन स्वत:चे इंजिनीअरिंग वर्क शॉप काढले आहे.

**श्री. श्रीपाद रामचंद्र हर्डीकर** – जन्म कशेळी. हायस्कूल शिक्षण राजापूर. उच्च शिक्षण मुंबईत. पुढे एस. टी. कार्पोरेशनमध्ये नोकरी अॅड्मिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर पदावरुन निवृत्त झाले.

**कै. भिकाजी लाखण उर्फ डॉक्टर भिका** – हे पूर्वीच्या काळात गावात जनावरे व माणसे यांना झाडपाल्याची औषधे देत असत. तसेच बाळंतपणात अडलेल्या स्त्रियांची सुटका करण्याचे काम ते करीत. त्याचप्रमाणे विताना अडलेल्या गाई, म्हशी यांचीही ते सुटका करीत.

**श्री. हरी गोपाळ शिंदे** – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत. जनावरांच्या रोगामध्ये कै. जगुअण्णा सावरे यांचे पुस्तकातील मार्गदर्शन व स्वानुभव यांचे सहाय्याने औषधे देऊन हजारो जनावरांना रोगमुक्त करणारे विद्यमान पिढीतील वैद्य. पंचक्रोशीमधून यांना नेहमी जनावरांना उपचार करण्यासाठी मागणी असते. कशेळी ग्रामपंचायतीचे विद्यमान सदस्य.

---

With Best Complimsnts From :
FOR BUSINESS GIVEAWAYS
**ADVENT GIFTS**
302, Creative Industrial Estate, N. M. Joshi Marg, Bombay-400 011.
Phone : 893311 / 898079

**श्री. रमेश पांडूरंग ओळकर** - जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळ‌ीत. सार्वजनिक कार्याची आवड. सध्या कशेळी ग्रामपंचायतीचे उपसरपंच. स्वतःची शेती, बागायत व दुकान सांभाळून गोरगरिबांची कामे विनामूल्य करणारे 'आप्पा' म्हणून प्रसिद्ध.

**श्री. मुरलीधर रामचंद्र कशाळकर** – जन्म कशेळीत प्राथमिक व हायस्कूल शिक्षण कशेळीत. सुविख्यात सुवर्णकार. विद्यमान पिढीतील अव्वल दर्जाचे शिकारी. जाखादेवी मंदिर, ग्रामपंचायत कशेळी सोसायटी यांचे कार्यात बहुमोल सहकार्य.

**श्री. रमाकांत भार्गव हळदणकर** – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत. हायस्कूल शिक्षण आडिवऱ्यात. कशेळी येथे स्वतःचे दुकान सांभाळून गावच्या सर्व सार्वजनिक कामात उत्साहाने व सक्रीय भाग घेतात.

**श्री. वाय. टी, हळदणकर** – जन्म, प्राथमिक व हायस्कूल शिक्षण कशेळीत. पुढे तलाठी म्हणून नोकरीला लागून सध्या सर्कल इन्स्पेक्टर झाले. शासकीय कर्मचारी असून गोरगरिबांची कामे करण्यात सदैव गुंतलेले. त्यामुळे यांना जन्मसिद्ध 'आमदार' म्हणून सर्व तालुक्यातील लोक संबोधतात.

**श्री. भास्कर कृष्णाजी नाटेकर** – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत. मुंबईला आल्यावर किराणा दुकान व्यवसाय करुन पुढे कशेळी येथे किराणा दुकान सुरु केले. व्यवसाय सांभाळून गावच्या ग्रामपंचायतीचे ५ वर्षे सरपंच होते. गायनाची कला चांगली अवगत आहे. भजने वगैरे कार्यक्रमात व, लक्ष्मीनारायण मंदिर कार्यात सक्रीय सहभाग.

**भिकू सखाराम शिरवडकर** – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत. शेती व्यवसाय सांभाळून आगवादेवी मंदिराचे व्यवस्थापनात फार कष्ट घेतात. श्री लक्ष्मीनारायण शिक्षण प्रसारक मंडळाचे कमिटी सदस्य.

**शिवा नागू गोठणकर** – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत. गावाच्या सर्व कामात सहभाग. कशेळी ग्रामपंचायतीचे विद्यमान सदस्य

**भास्कर नारायण भागवत** – जन्म व प्राथमिक शिक्षक कशेळीत. सध्या आडिवरे येथे प्राथमिक शिक्षक म्हणून नोकरी. श्री कनकादित्य मंदिरचे सर्व कार्यात प्रमुख सहभाग. वि. सी. गुर्जर, विद्यामंदिर स्कूल कमिटी सदस्य.

**श्री. चिंतामणी सखाराम भागवत** – जन्म कशेळीत. शिक्षण कशेळी-मुंबई. प्रख्यात गवई तबलापट्टु व भजनीबुवा. रत्नागिरी आकाशबाणी केंद्रावर अनेक वेळा भजन व गायनाचे कार्यक्रम होतात. गेली १० वर्षे अंधत्व प्राप्त झाले असले तरी गायन कलेची सेवा सतत चालू असते. गावच्या सामाजिक व शैक्षणिक कार्यात सहकार्य.

**श्री. राजाराम हरी ठाकुर** – मुंबईत कशेळीचे पहिले चार्टर्ड अकाउन्टन्ट अनेक वर्षे यशस्वीपणे व्यवसाय केल्यावर आता निवृत्त झाले. जनता सहकारी पतपेढीच्या कार्यात यांचे बहुमोल मार्गदर्शन झाले आहे.

**श्री. मोतिराम शंकर कशाळकर** – जन्म कशेळीत हायस्कूल शिक्षण राजापूर येथे. नंतर मुम्बईत येऊन कमर्शिअल आर्टिस्टची पदविका घेतली अनेक वर्षे ब्लॅक ॲन्ड व्हाइट आर्टिस्ट म्हणून व्यवसाय केल्यावर इंग्लंड मध्ये जाऊन स्क्रीन प्रिंटिंग मधील उच्च शिक्षण घेतले परत आल्यावर प्लॅस्टिकच्या प्रेझेन्टेशन आर्टिकल्स तयार करण्याचा भारतातील पहिला कारखाना काढला गावच्या सर्व सार्वजनिक कार्यात सहकार्य करतात.

**श्री. वामन बाळाजी कुलकर्णी** – जन्म आजोळी नाटे येथें १९१९ मध्ये. प्राथमिक शिक्षण कशेळीला पुढें मुंबईला १९४३ मध्यें विल्सन कॉलेजमधून एम्. ए. झाले. ५।६ वर्षे सचिवालयात नोकरी केल्यावर स्टेट ट्रान्स्पोर्ट मध्यें त्यांना पाठविण्यात आले. तेथे विविध खात्यात जबाबदारीची कामे केल्यावर डेप्युटी जनरल मॅनेजर म्हणून १९७७ साली निवृत्त. पुढें राजस्थान स्टेट ट्रॅन्स्पोर्ट-मध्यें भांडार प्रमुख व डेप्युटी जनरल मॅनेजर म्हणून काम केल्यावर एका खाजगी कंपनीत भांडार प्रमुख म्हणून काम करुन १९८५ मध्यें निवृत्त. व्यवस्थापन, भांडार विषयक प्रश्न आणि नियंत्रण या विषयांचे आजही ते एक तज्ञ म्हणून गणले जातात. रत्नागिरी मध्यें स्टेट ट्रॅन्स्पोर्टमध्ये काम करीत असताना १९५४ मध्यें त्यांनी कशेळी, आडिवरे, नाटे गावखडी परिसरात एस. टी. बस सेवा सुरु करुन या भागाच्या विकासाचा मार्ग मोकळा करुन दिला. जनता सेवा संघ व जनता सहकारी पतपेढी यांच्या कामात अनेक वर्षे मार्गदर्शन करीत आहेत.

**डॉ. गंगाधर बाळाजी कुलकर्णी** – जन्म १९२६ मध्यें कशेळीला. प्राथमिक शिक्षण कशेळीला. पुढे हायस्कूल व मेडिकल शिक्षण एम्. बी. बी. एस्. पर्यंत मुंबईला ग्रँट मेडिकल कॉलेजमध्यें. व्यावसायिक कार्याला प्रारंभ नायर हॉस्पिटलमध्यें केला. पुढें गिरगांवमध्यें स्वतःचा दवाखाना चालू केला. अचुक निदान करण्याची देणगी व रोग्याच्या मनाला भिडणारा प्रेमळ स्वभाव यामुळे यांनी बऱ्याच रोग्यांना जिंकले आहे. कोणत्याही वेळी व्हिजिटला यतील अशी सर्वांना खात्री असलेले हे एकमेव डॉक्टर आहेत. जनता सेवा सघ व जनता सहकारी पतपेढीचे कामात विशेष लक्ष देतात.

**श्रीमती जानकीबाई भगवंत पळसुले उर्फ मनुताई पळसुले** – जन्म कशेळीत सन १९१७ मध्यें मराठी शिक्षण कशेळीतच. कशेळी गावात ग्रा. पं. स्थापन झाल्या पासून महिला सदस्य


शुभेच्छा

**प्रकाश धोंडू सातोपे**

मु. पो. कशेळी, ता. राजापूर.

म्हणून २५ वर्षे काम केले- रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या ५ वर्षे महिला सदस्य म्हणून काम केले. कशेळीत जागृती महिला मंडळ स्थापन करुन शिवण क्लास, बालवाडी वगैरे कार्यक्रम राबवून महिलांच्या विकासासाठी प्रयत्न. अगदी लहानपणीच वडिलांनी सुरु केलेल्या हरिजनांच्या शाळेत शिकविण्याच्या कार्यानेच समाज सेवेची उत्पन्न झालेली आवड आज वृद्ध पणांतही कायम आहे.

**श्री. जगन्नाथ रामचंद्र नाफडे** – जन्म आजोळी नाटे येथे. पुढील शिक्षण मुंबईत आणि सुरतेला जाऊन बी. ए. झाले. कायद्याच्या शिक्षणासाठी ते अहमदाबादला गेले. नोकरी करून त्यांनी आपले शिक्षण केले. मुंबईला आल्यावर पर्सोनेल मॅनेजमेन्टचा पोस्ट ग्रॅज्युएट कोर्स पुरा केला. खटाव मिल व झेनिथ स्टील कंपनीत पर्सोनेल मॅनेजर म्हणून काम केले. सध्या ते महिंद्र अॅन्ड महिन्द्र कं. लि. चे जनरल मॅनेजर पर्सोनेल या पदावर काम करतात. रत्नागिरी जिल्ह्यातील खेडे गावात शिक्षण क्षेत्रामध्ये विधायक कार्य करण्यासाठी त्यांनी "सेवा संकल्प" या ट्रस्टची स्थापना केली या ट्रस्ट मार्फत त्यांनी कशेळी गावी एक लोखंडी पक्का साकव, मराठी शाळेची ४ खोल्यांची पक्की इमारत, संडास, बाथरुम व विहीर बांधून दिली. त्यासाठी सुमारे दीड लाख रुपये खर्च केले. हायस्कूलला सायन्सचे सर्व साहित्य त्यांनी सुरुवातीलाच दिल्यामुळे हायस्कूलची अत्यंत महत्वाची प्राथमिक गरज भागली. आता ते हायस्कूलसाठी तीन खोल्यांची पक्की इमारत बांधून देत आहेत.

**श्री. शंकर भास्कर सावरे** – कशेळी गावचे सहकारी सोसायटीचे सतत २५ वर्षे चेअरमन होते. कशेळी ग्रामपंचायतीचे १५ वर्षे सरपंच होते. एवढीच गोष्ट त्यांच्या कशेळी गावातील सार्वजनिक कार्याची कल्पना यायला पुरेशी आहे. आजही वयाच्या ७५ व्या वर्षी ते कशेळी सोसायटीचे डायरेक्टर असून संस्थेच्या कार्यात सक्रीय भाग घेत आहेत.

**श्री. नारायण अनंत बोरवणकर** – जन्म १९१० कशेळी येथें. प्राथमिक शिक्षण कशेळीत हायस्कूल शिक्षण राजापूरांत. पुढें गिरणीत नोकरी करून वीव्हिंग मास्तर पदाला पोचले पुढे नोकरी सोडल्यावर कशेळीला स्थायिक झाले. त्यांनी सहकारी कौल कारखान्याचे संस्थापनेत मोठे काम केले. कशेळी गावचे सरपंच, सोसायटीचे चेअरमन म्हणून त्यांनी गावच्या विकास कामात फार मोठे काम केले.

**श्री. बाळकृष्ण दिनकर धाक्रस** – हे कशेळी गावचे शेतीतज्ञ. जन्म कशेळीत. प्राथमिक शिक्षण कशेळीत. शेतीमध्ये निरनिराळे प्रयोग करून उत्पादन वाढविण्याचा यांनी विक्रम केला आहे. कौल कारखान्याचे ते काही वर्षे चेअरमन होते.

---

शुभेच्छा

मु. पो. कसेळी, ता. राजापूर.

सुनिल नारायण भागवत.

**श्री. भास्कर अनंत भागवत** – वकील मराठी शिक्षण कशेळीत हायस्कूल शिक्षण राजापूरला पुढे एल्फिस्टन कॉलेज मधून LL., B. झाल्यावर राजापूर कोर्टात वकिली केली. आयुष्याच्या अखेर पर्यंत एक यशस्वी वकील म्हणून राजापूर कोर्टात वकीली केली.

**कै. डॉ. शिवराम भाऊ युदम** – हे मुंबईला परुळेकर डॉक्टरांकडे कम्पाउन्डर होते. तेथे काम करून त्यांनी डॉक्टरची माहिती घेतली. व नंतर रजि. घेऊन हर्णे येथे स्वतंत्र डॉक्टरी व्यवसाय केला.

**श्री. शंकर अनंत नाफडे** जन्म १९१० साली कशेळी येथे ४ थी पर्यंत शिक्षण कशेळी मध्ये पुढें मुंबईला विलेपारले हायस्कूल मधये नोकरीची संधी नाकारून भाजी विक्रीचा धंदा स्वीकारला १९३२ साली दुधाचे दुकान घातले त्यामध्ये भरपूर पैसा मिळाला. आता त्यांनी दुकान विकून निवृत्ती स्वीकारली आहे. शून्यातून सृष्टी निर्माण करणारे हे कर्तबगार ग्रामस्थ.

**श्री. शिवराम काशिनाथ हर्डिकर** – जन्म १९१६ साली नागोठणे येथे प्राथमिक शिक्षण आडिवरे. इग्रजी शिक्षण मुंबईला वडील वारल्यामुळे शिक्षण सोडावे लागले १९३२ १९३५ कशेळीला शेती केली. परत मुंबईला आले. व शिवणकाम शिकले. नोकरी करून घरोघरी चहा विकण्याचा धंदा सुरु केला. लग्न समारंभाला भांडी, कपबशा भाड्याने देण्याचा. धंदाही त्यांनी सुरू केला. आज ते ४,५ लाखाची उलाढाल करीत आहेत. कौल कारखान्याच्या स्थापनेसही त्यांनी फार मेहनत घेतली होती.

**श्री अच्युत बाळाजी कुळकर्णी** – जन्म २३ सप्टेंबर १९१५ कशेळी येथे प्राथमिक शिक्षण कशेळी व आडिवरे येथे पुढील. हायस्कूल शिक्षण मुंबईला ७ वर्षाचे शिक्षण ४ वर्षात पुरे केले. दुसऱ्या महायुध्दात स्कॉटिश हायलॅन्डर्सच्या फलटणीबरोबर ब्रम्हदेश सिलोन वगैर देशात नोकरी केली. बुध्दी आणि कौशल्य यांचे जोरावर इलेक्ट्रिकल्स मध्ये नैपुण्य संपादन केले. तब्येतीमुळे सैन्यातील नोकरी सोडावी लागली त्यानंतर कऱ्हाड येथे माजी सैनिकांची संघटना स्थापन करून कऱ्हाड को-ऑप. वर्कशॉप चालू केंले. गेली ४० वर्षे मॅनेजर म्हणून काम करतात सहकारी कौल कारखान्याचे हे आद्य प्रवर्तक आहेत.

**श्री. नारायण राजाराम शेजवलकर** – जन्म २७-१२-१९१४ रोजी प्राथमिक शिक्षण कशेळी हायस्कूल शिक्षण राजापूर लाहोरला मेयोस्कूल मधून ड्रॉइंग टीचर्स डिप्लोमा घेतला पण पुढे कार्य क्षेत्र बदलून हिंदीच्या स. भा. पंडित पर्यंतच्या पदव्या घेतल्या. पुढे गोव्याला हिंदी शिक्षक व प्रचारक म्हणून नोकरी उत्कृष्ट शिक्षक म्हणून आखिल भारतीय पूरस्कार मिळला. १९७५ मध्य निवृत्त होऊन गोव्यात स्यायिक झाले. गोवा कर्मभूमी व कशेळी श्रध्देची, कृतज्ञतेची व अपार प्रेमाची भूमी आजही मानतात.

---

शुभेच्छा
**सौ. शुभांगी महादेव जुवळे**
आगवेकर वाडी. कसेळी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी·

**डॉ श्रीराम वासुदेव भागवत** – जन्म कशेळींत १९१५ प्राथमिक शिक्षण कशेळीत नंतर मुंबईला एम ए. पी. एच् डी. संपादन केल्यावर एस् एस् सी. बोर्ड विद्यापीठ डेक्कन कॉलेज मध्ये काम केल्यावर नागपुर विद्यापीठात गेले. व १९७५ मध्ये रजिस्ट्रार म्हणून निवृत्त झाले. त्यांनी १९८५ मध्ये लिपी शास्त्रावर प्रबंध लिहीला त्यांनी "शीघ्रनागरी." ही लघुलिपीही प्रसिध्द केली.

**डॉ. शिवराम वासुदेव भागवत** – जन्म मूर्तिजापूर १९२४ मॅट्रीक पर्यंत शिक्षण मुंबईत मेटॅलर्जी हा खास विषय घेऊन एम् एस् सी. झाले सुरवातीला मेटर्लजिस्ट म्हणून चौगुले कंपनीत नोकरी नंतर हॉस्पेट येथे लोखंड कारखान्यात व आता कऱ्हाड येथे खंडेलवाल कारखान्यात प्लॅन्ट मॅनेजर आहेत.

**डॉ. राजाराम वासुदेव भागवत** – जन्म १९२१ प्राथमिक व इंग्रजी शिक्षण मुंबईत छबिलदास हायस्कूल मधून मॅट्रीकचे परिक्षेत पहिले आल्यामुळे अनेक पारितोषिके मिळाली पुढे एम् एस् सी. पी. एच् डी. पदवी मिळविली. मुंबई विद्यापीठाने पदव्युत्तर प्राध्यापक म्हणुन मान्यता दिली. मुंबई विद्यापीठात व्हा. चॅन्सेलरच्या पदापर्यंत पोचले काही दिवस त्यांचेकडे चॅन्सेलर पदाचा चार्ज होता प्रामाणिक व निगर्वी वृत्तीमुळे विद्यार्थ्यात अत्यंत प्रिय. त्यांचे विद्यार्थी व चाहते यांनी रु. २१००० ची देणगी विद्यापीठास देऊन त्यांचे नावे तीन बक्षिसे ठेवली. आहेत. या एकाच गोष्टीवरून त्यांची योग्यता सिध्द होते.

**कै. नारायण राजाराम हर्डिकर** – ( १८९६ ते १९६७ ) जन्म कशेळीत प्राथमिक शिक्षण कशेळीत शेतीची आवड म्हणून भंडारा येथे शेतीची व्यवस्था पहाण्याचे काम स्वीकारले तेथे आपल्या हुशारीवर व कौशल्याने शेतीमध्ये ऊसाची लागवड करून गूळ व साखर तयार केली. त्यांच्या कर्तृत्वावर खुष होऊन त्यांच्या मालकाने आपली शेती त्यांनाच विकली. आधुनिक यंत्र सामुग्री वापरून त्यांनी शेतीचे आधुनिकीकरण केले.

**श्री. भास्कर नारायण हर्डिकर** – शिक्षण भंडारा येथे वडिलांनी संपादन केलेल्या शेतीमध्ये मोलाची भर घातली. शेतीचे जोडीला वाहतूक व्यवसाय सुरू केला. सार्वजनिक कार्यात भाग घेतला सध्या भंडारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे डायरेक्टर बोर्डावर निवडून आले आहेत.

**श्री. श्रीकृष्ण विनायक गुर्जर** – कशेळीत जन्म कै. वि. सी. गुर्जर यांचे शेजारी घर जन्म कशेळीत पुढं उच्च शिक्षण मुम्बईत घेऊन चार्टर्ड अकाउन्टटची परीक्षा पास झाले. त्यांची एस् व्ही गुजर अॅन्ड कं. ही. चार्टर्ड अकाऊंटन्ट फर्म संपूर्ण अहमद नगर येथे स्थायिक झाले. असले तरी सहकारी कौल कारखाना लक्ष्मी नारायण शिक्षण प्रसारक मडळ श्रीदेव कनकादित्य मंदिर ट्रस्ट श्रीदेव लक्ष्मी नारायण मंदिर ट्रस्ट यांचे कामात ते फार मोलाची मदत करतात.

---

शुभेच्छा
**मधुकर यशवंत जायदे**
मु. पो. कशेळी, ता. राजापूर.

**कै. धोंडू रावजी पेडणेकर** – मागच्या पिढीतील अत्यंत सुसंस्कृत व नेमस्त प्रवृत्तीचे म्हणून यांना गावात मान होता. टेलरिंगचा धंदा सांभाळून त्यांनी गणपती मूर्ती बनविण्याचा व्यवसाय केला. व उत्तम मूर्तीकार म्हणून लौकिक मिळवला.

**श्री. पुंडलिक गुणाजी पेडणेकर** – कशेळी गावात जन्म घेऊन गावातच शेती व्यवसाय सांभाळून यांनी गावच्या अनेक सार्वजनिक कामात भाग घेतला. सुमारे १५ वर्षे ग्रामपंचायतीचे सक्रीय सभासद होते. आजही ते गावच्या विकास कामात सक्रीय सहभाग घेत आहेत.

**श्री. विनायक लक्ष्मण वाघधरे** – जन्म गावखडी पण कशेळी बांध जवळच असल्यामुळे सर्व व्यवहार कशेळी गावाशी. नोकरी साठी मुंबईत येऊन येथे बॉडी बिल्डिंग करुन अनेक शक्तीचे प्रयोग केले. दातांनी तीन टनी ट्रक रोखणे, दातांनी घोडा उचलणे, छातीवरुन ट्रक नेणे असे अचाट शक्तीचे प्रयोग करुन त्यांनी भारताचे पोलादी पुरुष म्हणून भारतात व जगात कीर्ती मिळवली. त्यांचे समाज कार्यही मोठे आहे. ते मुंबई महापालिकेत ५ वर्षे शिवसेनेचे नगरसेवक होते.

**प. पू. स्वामी विश्वनाथ महाराज बोरकर** – जन्म कशेळीत. नोकरीसाठी मुंबईत आले. सिंधिया स्टीमशिप्स मध्ये नोकरी. नोकरी सांभाळून त्यांनी अध्यामिक मार्गात प्रगती केली त्यांना दत्तमहाराजांनी दृष्टांत दिल्यामुळे कशेळी बांधजवळील फोडकर वाडीमध्ये संपूर्ण स्वखर्चाने अध्यात्मिक पद्धतीचे दत्तमंदिर बांधले. सदर मंदिरात दरवर्षी दत्तजयंतीचा उत्सव ७ दिवस उत्साहात साजरा केला जातो. सदर उत्सवासाठी मुंबईपासून दूरदूरचे लोक येतात.

**श्री. वसंत शिवराम फोडकर** – जन्म कशेळीत. नोकरीनिमित्त मुंबईत आले. श्री. विनायक वाघधरे यांच्या मार्गदर्शनाखाली बॉडीबिल्डिंग व वेटलिफ्टिंग करुन अचाट शक्तीचे प्रयोग करून नांवलौकिक मिळविला. महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेचे शरीरसौष्ठव स्पर्धेत त्यांना मा भाऊसाहेब हिरे यांच्या हस्ते बक्षिस मिळाले.

**श्री. कुमार फोडकर** – जन्म मुंबईत. गिरणीत नोकरी करुन त्यांनी नाट्य सृष्टीत प्रवेश केला. 'पुरुष' या नाटकात नाना पाटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'सिद्धार्थ'ची प्रमुख भूमिका करुन नावलौकिक मिळवला. दुसरा सामना' या नाटकात आता ते प्रमुख भूमिका करीत आहेत.

**श्री. सदाशिव भगवंत पळसुले** – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत, ज. वि. सावरे यांचे हायस्कूलमध्ये इंग्लिश ३ री पर्यंत शिक्षण पुढे किंग जॉर्ज हायस्कूल दादर येथे ११ वी पर्यंतचे शिक्षण झाले. त्यानंतर अकाउन्टन्सीमधील एक परीक्षा दिली, सहकारी संस्थेच्या सेक्रेटरीची परीक्षा दिली,

---


शुभेच्छा –

**डॉ. भाऊ जोशी**

नवेदर, पो. आडिवरे, ता. राजापूर.

हिन्दीचा प्रचार केला. महाराष्ट्रीय मंडळ, पुणे या संस्थेचा ३ वर्षांचा शारीरिक शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण केलेला असल्याने समर्थ व्यायाम मंदिर, दादर या संस्थेत १० वर्षे व्यायाम शिक्षकाचे कार्य व महानगरपालिकेच्या बालभवन केन्द्रात १२ वर्षे केन्द्रप्रमुखाचे कार्य. नगरपालिकेच्या शाळातून २१ वर्षे स्काऊट शिक्षकाचे कार्यही केले आहे दि. १ जून १९८३ पासून सेवानिवृत्त.

**डॉ. भगवंत राजाराम कळके** – जन्म १९२७ मध्ये कशेळीतच. प्राथमिक शिक्षण कशेळीतच. हायस्कूल शिक्षण मुंबईत झाले. पुढे एम. बी. बी. एस. परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर काही वर्षे शासकीय रुग्णालयांत सेवा केल्यावर पुढील शिक्षण व संशोधन यासाठी इंग्लंड व अमेरिकेत गेले. तेथे त्यांनी हृदय शस्त्रक्रियेवर संशोधन केले. तेथे डॉ. लिली यांचे सहकार्याने संशोधन करुन हृदयाची कृत्रिम झडप शोधून काढली. यापूर्वी कृत्रिम झडप निर्जीव रसायनापासून बनवीत असत पण कळके यांनी शोधून काढलेली झडप ही हृदयाजवळील स्नायूपासून बनविलेली असल्यामुळे ती हृदयाशी ताबडतोब एकरुप होते जगात ही पहिलीच सजीव झडप होय. म्हणून तिला कळके-लिली व्हॉल्व असे संबोधतात. भारतात परत आल्यावर त्यांनी जे. जे. हॉस्पिटल, नायर हॉस्पिटल, सायन हॉस्पिटल या हॉस्पिटलांचे डीन म्हणून काम केले. त्यांनी टी. एम. मेडिकल कॉलेज व ग्रॅन्ड मेडिकल कॉलेज मध्ये सर्जरी विभागाचे प्रोफेसर म्हणून काम केले तसेच अमेरिकेतील न्यू यॉर्क हॉस्पिटल व मिन्नेसोटा हॉस्पिटल मध्ये सर्जन व प्रोफेसर म्हणून काम केले. नोकरीतून निवृत्त झाल्यावर आता ते अेमरिटस प्रोफेसर व हृदयरोग सल्लागार म्हणून काम करतात. सध्या ते डॉ. एन. व्ही. नेने पॅथॉलॉजिकल लॅबोरेटरी चर्नीरोड, एम. व्हो. मेडिकल सेंटर सांताक्रूझ (प.), डॉ. भगत पॉलिक्लिनिक, बोरिवली (प.), धन्वंतरी हॉस्पिटल शिवाजी पार्क येथे कन्सल्टिंग सर्जन म्हणून काम करतात. त्यांच्या पदव्या वाचल्या तरी त्यांचे श्रेष्ठत्वाची खात्री होते. पदव्या –
M. B. (Bom.), M.S.F.C.P.S., F.I.C.A. (USA), F.I C.S. (USA), PH D. (Minn USA).

**कर्नल डॉ. गोविंद दत्तात्रेय भागवत** – सेनादलात मेडिकल कोअरमध्ये डेंटिस्ट म्हणून सुरुवात करुन कर्नल पदावर काम करीत आहेत. त्यांचे चिरंजीवही सेनादलात अधिकारी पदावर आहेत. यांनी पुणे येथे स्वतःचे घर बांधले आहे.

**श्री. श्रीनिवास दत्तात्रय भागवत** – हे सध्या इंडो-बर्मा पेट्रोलियन कंपनीत रीजनल मॅनेजर पदावर काम करीत आहेत.

**श्री. भा. रा. भागवत** – हे मूळ कशेळीचेच. सध्या पुण्यात रहातात. ते बालसाहित्य लिहितात. त्यांच्या सौभाग्यवती लीलाताई भागवत याही बालसाहित्य लिहितात. नुकतीच मुंबई टी. व्हीवर

---

शुभेच्छा –

**शंकर विश्राम गुरव**
वाडापेठ, आडिवरे, ता. राजापूर.

त्यांची प्रदिर्घ मुलाखत चित्रीकृत करण्यात आली. सौ. लिलाताई यांची बालसाहित्य परिषदेच्या अध्यक्षा म्हणून निवड झाली आहे. कशेळी गावच्या विकास कामात ही उभयता मोलाचे सहकार्य करतात.

**श्री. प्रमोद विश्वनाथ कशाळकर** – जन्म कशेळी येथे. हायस्कूल शिक्षण मुंबईत व पुढील शिक्षण आय. आय. टी. कानपूर येथे झाले. त्यांनी बी. टेक ही पदवी संपादन केली. पुढे त्यांनी डी. बी. एम. ए. हा बिझनेस मॅनेजमेंटचा कोर्स केला. सध्या राष्ट्रीय केमिकल अॅण्ड फर्टिलायझर्स चेंबूर येथे सहाय्यक अभियंता म्हणून नोकरी.

**श्री. शंकर विनायक नाटेकर** – संस्कृत विषय घेऊन मुंबई युनिव्हर्सिटीमध्ये पहिल्या क्रमांकाने पास झाले. अनेक पारितोषिके मिळवली. व्यावसायिक जीवनात चौगुले कं. गोवा मध्ये डेप्युटी इंडस्ट्रीयल रिलेशन्स मॅनेजर म्हणून नोकरी करुन नुकतेच सेवा निवृत्त झाले.

**श्री पांडुरंग नारायण बावकर** – जन्म कशेळीला. नोकरी निमित्त मुंबईत आले. सारस्वत को-ऑप बॅन्केतील नोकरी सांभाळून गेली ३८ वर्षे कशेळी गावच्या जनता सहकारी पतपेढी लि. चे कार्य निरलसपणे करुन ग्रामस्थांची सेवा करीत आहेत.

**कु. लीला विनायक नाटेकर** – गेली २९ वर्षे मुंबई महापालिकेच्या शाळेत शिक्षिका म्हणून विद्यार्थ्यांच्या जडण घडणीचे काम करीत आहेत. १९८०/८१ साली यांना महापौर पुरस्कार मिळाला. १९८१/८२ साली "पाठ्यपुस्तक एक लक्षणीय साधन" या निबंधाला राज्य पातळीवर ३ रे पारितोषिक मिळाले. १९८४/८५ मध्ये राष्ट्रपतींच्या हस्ते 'राष्ट्रीय शिक्षक' पुरस्कार मिळाला. गुणवर्धन केंद्र, नैतिक मूल्यांची जोपासना, नकाशा वाचन प्रकल्प चालू आहेत. आकाशवाणी शालेय कार्यक्रमाच्या सल्लागार समितीवर निवड झाली आहे.

**डॉ. म. ना. भागवत** – डी एस. ए. सी. आयुर्वेदाची डिग्री पोदार मेडिकल कॉलेजमधून मिळविली. भालावली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रावर काही वर्षे नोकरी केल्यावर आता कोतापूर व कशेळी येथे स्वतंत्रपणे प्रॅक्टीस करतात. धार्मिक कामात सदैव गुंतलेले असतात. प. पू. स्वामी कै. स्वरुपानंद महाराजांचे अनुग्रहीत. कनकादित्य मंदिरासाठी निधी जमविण्यासाठी फार परिश्रम घेतले.

**श्री. बी. जे. ठकरुल** – जन्म वि. सी. गुर्जरांच्या सावरेवाडीत. प्राथमिक शिक्षण कशेळीत. पुढे नोकरी निमित्त मुंबईत आले. नोकरी करुन उच्च शिक्षण घेतले. सध्या बॉम्बे पोर्ट ट्रस्टच्या चेंबूर कंटेनर डेपोचे असि मॅनेजर पदावर आहेत. कशेळी परिसरातील सर्व सामाजिक कार्यात नेहमी पुढाकार घेतात.

---

शुभेच्छा –

**नरोत्तम गंगाराम कोरगांवकर**

कालिकावाडी, आडिवरे, ता. राजापूर

**श्री. दिनकर विनायक नाफडे** – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत. पुढे हायस्कूल शिक्षण मुंबईत. नंतर रमण ॲण्ड डेमन कंपनीत टेक्निकल साइडला नोकरी. नोकरी सांभाळून श्री श्रीधर यशवत पाध्ये, आडिवरे यांचेकडे तबलावादनाचे शिक्षण घेतले व अखिल भारतीय आकाशवाणीच्या तबलावादन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला व आपल्या अजोबांच्या कीर्तीत भर घातली कशेळी गावच्या सार्वजनिक कार्यात बहुमोल सहाकार्य.

**श्री. जनार्दन विश्वनाथ उर्फ बाबीनाना कशेळकर** – कशेळी गावचे गेली अनेक वर्षे पोलिस-पाटील. कशेळी वि. का. से. स. सोसायटीचे चेअरमन, व मुष्टिफंट संस्थेचे अध्यक्ष. गावच्या सर्व सार्वजनिक कामात सहभाग.

**श्री.केशव अप्पा राडये** – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत. शेती व्यवसाय सांभाळून वाडीप्रमुख म्हणून कार्य. आवळीची वाडी शाळा इमारत बांधण्याच्या कामी पुढाकार. कशेळी ग्रामपंचायतीचे विद्यमान सदस्य.

**श्री. श्रीधर सखाराम मेस्त्री** – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत. लॉंचच्या बॉडचा बांधण्याचे उत्तम कसब, इमारती बांधण्याचे कंत्राटदार, उत्तम मूर्तिकार म्हणूण गणेश मूर्तींचे कशेळीतील कारखानदार.

**श्री. रामचंद्र भिकाजी जाधव** – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत. मुंबईत म्युनिसिपालिटीत नोकरी. निवृत्त झाल्यावर गावात येऊन कशेळी सोसायटीचे व शाळेच्या कामात सहभाग.

**डॉ. रामचंद्र विनायक भागवत** – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत. उच्च शिक्षण मुंबईत बी. डी. एस. पदवी घेतलेले कशेळीतील पहिले दंतवैद्य. सध्या ठाणे येथे स्थायिक.

**कु. शैलेश वसंत भागवत** – जन्म व शिक्षण मुंबई. सनईवादक बिस्मिल्लाखान यांचे शिष्य. उत्तम सनईवादक. अनेक पारितोषिके मिळवली. ठाणे येथे स्थायिक.

**कै. डॉ शंकर सखाराम भागवत** – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत. उच्च शिक्षण मुंबईत. डॉक्टरी पदवी घेतल्यावर काही वर्षे परदेशात जाऊन आले. ठाणे येथे डॉक्टरी व्यवसाय केला.

**डॉ. प्रभाकर शंकर भागवत**, एम.बी.बी.एस. व **डॉ. शैला प्रभाकर भागवत**, एम.बी.बी.एस. जन्म ठाणे येथे. शिक्षण ठाणे व मुंबईत. ठाणे येथेच वडिलांचा डॉक्टरी व्यवसाय करुन स्वतःचे हॉस्पीटल काढले.

**डॉ मिलिंद प्रभाकर भागवत** – एम.बी.बी.एस., एम.एस. ठाणे येथे जन्म व शिक्षण. ठाणे येथेच डॉक्टरी व्यवसाय तिसऱ्या पिढीतही चालू आहे.

श्री. रविंद्र रामचंद्र भागवत – जन्म ठाणे, शिक्षण ठाणे व पवई येथील आय.आय.टी. मधून केमिकल इंजिनीअरिंग पदवी घेतली. सध्या हिंदुस्थान पेट्रोलियम मध्ये प्लॅनिंग मॅनेजर म्हणून नोकरी.

कै. दत्तात्रेय महादेव पिसे – जन्म कशेळीत. वास्तव्य कशेळीत. शिंपी कामाचा पिढीजात व्यवसाय करुन सर्प दंशावर वनस्पतीची औषधे देत. त्यांनी अनेक विषार झालेल्या लोकांना औषधे देऊन बरे केले. मंत्राच्या साह्याने जिवंत सर्प पकडून त्याला अंगावर खेळवित असत

कै बाळकृष्ण शंकर शेजवलकर उर्फ आप्पा शेजवलकर – इतिहासाचार्य शेजवलकरांचे बंधू. वैद्यकीय पदवी घेऊन कशेळीला राहिले. पण वैद्यकीय व्यवसाय केला नाही. कै आप्पासाहेब पटवर्धन गोपुरी यांचे अनुयायी. १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीत भूमिगत राहून कार्य केले. कशेळी सोसायटीचे काही वर्षे चेअरमन होते.

कै. हरीशास्त्री नाटेकर – जन्म व वास्तव्य कशेळीत. विद्वान संस्कृत वैदिक ब्राह्मण म्हणूम कशेळी परिसरात प्रसिद्धी. ज्योतिषशास्त्राचा अभ्यास. सप्तशतीचे पाठ करण्याची घराण्याची परंपरा आजही त्यांचे चिरंजीव श्री. भास्करराव व श्री. राजाभाऊ हे पुढे चालवीत आहेत.

कै. दत्तात्रेय रामचंद्र शौचे – कशेळी गावचे शासकीत शाळेतील पहिले शिक्षक. यांच्या मुलांना शिकविण्याच्या खास शैलीमुळे ते विद्यार्थी वर्गात अत्यंत लोकप्रिय होते. त्यांच्या निगर्वी स्वभाव, सात्विक वृत्ती व सद्‌वर्तन यामुळ गावात त्यांना फार मान होता. विद्यमान पिढीतील कशेळीच्या अनेक श्रेष्ठ व्यक्तींचे ते पहिले गुरुजी होते.

श्री. भास्कर वसंत दत्ते – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत. नंतर कोल्हापूर यथे हायस्कूल शिक्षण घेऊन बॅन्क ऑफ इंडिया मध्ये क्लार्कचे नोकरीने सुरुवात करुन शाखाधिकारी म्हणून देवरुख शाखेत सध्या काम करतात.

श्री. बाबल्या रामकृष्ण सावरे – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत. रत्नागिरी अर्बन बॅन्केत. क्लार्कचे नोकरीने सुरुवात करुन सध्या जनता सहकारी बॅन्क लि. पुणे मध्ये ऑडिट डिपार्टमध्ये ऑफिसर आहेत.

श्री. राजाराराम रघुनाथ नाटेकर – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत. हायस्कूल शिक्षण राजापूरला. पुढे मुंबईला उच्च शिक्षण घेऊन सध्या इंडियन ऑइल कं. मध्ये ऑफिसर म्हणून नोकरी·

श्री. गजानन पर्शराम जायदे – ज. वि. सावरे यांच्या 'कशेळी इंग्लिश स्कूल' मध्ये काही वर्षे शिक्षक म्हणून नोकरी केल्यावर मुंबईला आले. मुंबई महानगर पालिकेत ऑफिसर म्हणून निवृत्त झाले.

कै. यशवंत कृष्ण जायदे – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत. पुढे नोकरी निमित्त मुंबईत आले. कस्टम खात्यात ऑफिसर म्हणून नोकरी करुन निवृत्त झाल्यावर कशेळीला जाऊन अखेर पर्यंत तेथे राहिले.

# परदेशस्थ कशेळकर

श्री. मधुसुदन बाळाजी कुळकर्णी – जन्म व प्राथमिक शिक्षण कशेळीत. हायस्कूल शिक्षण हिंद विद्यालय हायस्कूल. कॉलेज शिक्षण मुंबईत बी.एस सी. पास झाल्यावर इंग्लंडमध्ये गेले. केमिस्ट म्हणून नोकरी करुन कॉव्हेंड्रीची शिष्यवृत्ती मिळवून बरमिंगहॅम युनिव्हर्सिटीची मेकॅनिकल इंजिनीअर पदवी मिळवली. सध्या इंग्लंडमध्ये इंजिनीअर म्हणून नोकरी करतात. इंग्लंडमध्ये स्थायिक झाले आहेत.

श्री अशोक विठ्ठल कुळकर्णी – जन्म व सर्व शिक्षण मुंबईत. जे. जे. स्कूल ऑफ आर्टस मधून आर्किटेक्ट झाल्यावर अमेरिकेत गेले. तेथे आर्किटेक्ट म्हणून नोकरी करतात.

श्री. हेमंत विठ्ठल कुळकर्णी – जन्म व सर्व शिक्षण मुंबईत. जे. जे. स्कूल ऑफ फाइन आर्टस मधून आर्किटेक्ट झाल्यावर अमेरिकेत गेले.

श्री. जयंत विठ्ठल कुळकर्णी – जन्म व सर्व शिक्षण मुंबईत. जे. जे. स्कूल ऑफ फाइन आर्टस मधून आर्किटेक्ट झाल्यावर अमेरिकेस गेले.

श्री. मनोहर (बंडू) भगवंत पळसुले – जन्म कशेळी १९३९. प्राथमिक शिक्षण कशेळी. हायस्कूल शिक्षण हिंद विद्यालय, कॉलेज शिक्षण इंटरपर्यंत गोगटे कॉलेज रत्नागिरी. इंजिनिअरिंग शिक्षण सांगली व व्ही जे टी. आय. मुंबई येथून बी. ई. (इले.) व बी ई. (मेकॅ.) पदवी घेऊन प. जर्मनीत नोकरी मिळवून तेथे गेल्यावर प्लॅस्टिक टेक्नॉलॉजी, न्युमॅटिक मशिन्स, टेलिफोन इंडस्ट्रीज, इलेक्ट्रॉनिक्स अशा अनेक विभागांचे शिक्षण नोकरी करतानाच घेतले. त्यांनी तयार केलेल्या तीन लाख रुपये किमतीच्या टेलिफोन डायल टेसिंग मशिनला जर्मन पेटंट मिळाले. गेली २० वर्षे जर्मनीत एका इलेक्ट्रॉनिक्स कंपनीत इंजिनीअर.


शुभेच्छा –

**सुरेश गुणाजी तोडणकर** (मुख्याध्यापक)

नाटे नगर विद्यामंदिर, नाटे.

शुभेच्छा –

**लक्ष्मी फुटवेअर**

प्रोप्रा. बाळ कुबडे मु. नाटे, ता. राजापूर.

शुभेच्छा –

**नंदकिशोर पर्शराम जोशी**

मु. पो. नाटे, ता. राजापूर.

**नूरमहंमद उस्मान मेमन**
बाजार पेठ, नाटें, ता. राजापुर.

**मे. संजय एजन्सी**
प्रोप्रा. - संजय नरसिंह कामत
बाजारपेठ-राजापुर.

**श्री. दिनेश केशव दाते** (एलआयसी एजंट)
भटाळी, मु. पो. राजापुर,
ता. राजापुर ४१६७०२.

**श्री. एस्. एम्. कामतेकर**
एलआयसी डेव्हलपमेंट ऑफीसर
भटाळी, मु. पो. ता. राजापुर, जि. रत्नागिरी

**कु. के. प्रभूदेसाई**

**विजय स्टोअर्स**
बाजारपेठ, राजापुर,
इलेक्ट्रिकल साहित्याचे व्यापारी
प्रोप्रा. विजय जनार्दन रानडे

**हॉटेल संतोष**
बाजारपेठ राजापुर.
प्रोप्रा. मधुकर शंकर देवरुखकर

शु
भे
च्छा

**चंद्रू फरसाण मार्ट**
बाजारपेठ राजापुर
प्रोप्रा. चंद्रू भोगटे

**सदानंद शिवराम चव्हाण**
चेअरमन रत्नागिरी जिल्हा कृषी उत्पन्न
बाजार समिती
मु. तेरवण, पो. भू, ता. राजापुर.

**सागर लोणची नेहमी वापरा**
नदीम प्रौडक्टस राजापुर.
फोन नं ७

**आझाद फ्लोअर, राइस, मसाला व पोहा मिल**
राजापुर
प्रोप्रा. बाळासाहेब काझी

**श्री. दत्त स्टोअर्स**
राजापुर.
फोन – ५०
किराणा व मेवामिठाई मिळण्याचे
एकमेव ठिकाण
प्रो. अनिल ठाकूर

**स्मृती फोटो स्टुडिओ**
बाजारपेठ राजापुर
प्रोप्रा. सुहास खानविलकर

**डायमंड वॉच कं.**
डायमंड झेरॉक्स, बाजारपेठ, राजापुर.

॥ श्री ॥

श्री लक्ष्मीनारायण शिक्षण प्रसारक मंडळ, कशेळी.
(रजि. नं. पी. टी. आर-आर. ई-२३०/१६/६/१९६७)

या संस्थेचे

# विठ्ठल सीताराम गुर्जर विद्यामंदिर

मु. पो. कशेळी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, पिन ४१६ ७०७.

महोदय,

आमच्या संस्थेने मागील पीढीतील सुप्रसिध्द साहित्यिक कै॰ वि॰ सी॰ गुर्जर यांचे २५ व्या पुण्यतिथी निमित्ताने शनिवार ता॰ १९ सप्टेंबर १९८७ रोजी "विठ्ठल सीताराम गुर्जर विद्यामंदीर" हायस्कूलचे मदतीसाठी आयोजित केलेल्या समारंभाचे निमित्ताने प्रसिध्द केलेल्या स्मरणिकेत बहुमूल्य जाहीरात देऊन / संस्थेला देणगी देऊन एका थोर साहित्यिकाच्या स्मारकाला हातभार लावून आम्हांस उपकृत केले आहे, याबद्दल आपणाला शतशः धन्यवाद॰ संस्था आपली सदैव ऋणी राहील॰ यापुढेही आपला संस्थेवर असाच कृपालोभ रहावा अशी नम्र विनंती॰

आपले नम्र,

ज॰ वि॰ कशेळकर, अध्यक्ष॰
श्री॰लक्ष्मीनारायण शिक्षण प्रसारक मंडळ

स॰भ॰ पळसुळे, अध्यक्ष॰
विठ्ठल सीताराम गुर्जर विद्यामंदीर

ज॰ रा॰ नापडे, अध्यक्ष
वि॰सी॰गुर्जर स्मारक समिती

ग॰ म॰ ढुकस्ल, सेक्रेटरी॰

## सेवा संकल्प ट्रस्ट.

आमचे गावचे एक सुपुत्र श्री. ज. रा. नाफडे यांनी मुंबईला सेवा संकल्प ट्रस्ट हा विश्वस्त निधी स्थापन केला आहे. या निधीचे रत्नागिरी जिल्ह्यातील मागास खेडेगावाच्या सुधारणेसाठी प्रयत्न करणे, शिक्षण व आरोग्य या मूलभूत गरजा भागविण्यासाठी कार्य करणे हे मुख्य उद्देश आहेत.

या विश्वस्त निधीची रक्कम मुख्यत्वे करून खेडेगावातील गरीब लोक, शिक्षण, शारीरिक शिक्षण व खेळ यांना प्रोत्साहन, आरोग्य सेवा, कुटुंब नियोजन या बाबींवर खर्च करण्यात येईल.

१) खेडेगावात शिक्षण कार्यासाठी शाळा, कॉलेज स्थापन करणे, वाचनालये, खेळ व शारीरिक शिक्षण देणाऱ्या संस्था, दवाखाने, चिकित्सालये, उपचार केंद्र, प्रसुतीगृह, अनाथाश्रम, वृद्धाश्रम, निवारागृह, गरिबांसाठी मदत केंद्र, आरोग्य सेवा, कुटुंबनियोजन व सामान्य मागास समाजाच्या उन्नतीकेंद्रे स्थापन करून कोणताही आर्थिक नफा न घेता कार्य करणे.

२) वाङ्‌मय, कला, साहित्य, औषधी, शास्त्र, हस्तकला, इतिहास, तंत्रज्ञान, तांत्रिक शिक्षण, संशोधन, खेळ व शारीरिक शिक्षण वगैरे सर्व प्रकारचे कार्य करणाऱ्या संस्था स्थापन करणे अगर अशा संस्थांना मदत करणे.

३) शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, आणि इतर शैक्षणिक, खेळ व शारीरिक शिक्षण देणाऱ्या संस्था यामध्ये शिकणाऱ्या योग्य व लायक, विद्यार्थ्यांना, निधीच्या उद्देशांना योग्य व निधीचे नियम व अटी यांना आधीन राहून शिष्यवृत्ती अगर सन्माननीय अनुदान देणे..

वरील उद्देशांना अनुसरून "सेवा संकल्प ट्रस्ट" ने आजपर्यंत कशेळी शाळा नं. २ ची ४ खोल्यांची चिरेबंदी इमारत बांधून दिली, सदर शाळेला येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सोईसाठी वार्यंगोडे वहाळावर एक लोखंडी साकव बांधून दिला, शाळेच्या विद्यार्थ्यांच्या उपयोगासाठी पिण्याच्या पाण्याची विहीर बांधून दिली. संडास व बाथरूम बांधून दिली व हायस्कूलला सायन्सचे सर्व साहित्य देणगीदाखल दिले आहे.

"सेवा संकल्प ट्रस्टने" हायस्कूलसाठी ३ खोल्यांची चिरेबंदी इमारत बांधून देण्याचा निर्धार केला आहे. वरील सर्व गोष्टी पहाता कशेळी गावच्या विकासात या निधीचा फार मोठा वाटा आहे. हे लक्षात येईल.

# = देणगीदार =

सेवा संकल्प ट्रस्ट, मुंबई रु. ७०००/-
मे. निशांत चॅरिटेबल ट्रस्ट रु. ४५००/-
श्री. मो. शं· कशाळकर रु. ११११/-
,, ह. म. जाधव ,, ,,

## रु. १००१/- देणारे देणगीदार

श्री. प. वा. दाते
श्री. य. र. हळदणकर
श्री. वि. प. कशाळकर
कै. सौ. सुशिला दि. भागवत स्मरणार्थ (श्री. दि. स. भागवत)
श्रीमती चंपूताई स. शेजवलकर
श्रीमती सुलभा श्री. देवस्थळी
सौ. सुधा रा. भागवत
श्री. व सौ. डॉ. एस. व्ही. कलवारी
श्री. शंकर ना. गोठणकर
श्री. काशिनाथ चं जाधव.

## रु. १०००/- देणारे देणगीदार

श्री. गो. ना. भागवत
श्री. रा. वा. भागवत
श्री. म. भ. पळसुले
कॅ. जी. डी. भागवत

श्री. मधुकर मा. पेडणेकर (कै. पार्वती मा. पेडणेकर स्मरणार्थ) रु. ५२५/-
श्री. गजानन भि. पोताडे रु. ५२५/-

## रु. ५०१/- देणारे देणगीदार

श्री. ग. रा आडर्ये
,, व. भा. शेजवलकर
,, र. अ. भाटे
सौ. इ. बी. कुलकर्णी
श्री. ज. रा. कळके
,, प्र. का. गुर्जर
,, पुंडलीक गु, पेडणेकर
,, गो. शि. फोडकर (आईवडीलांचे स्मरणार्थ)
,, अरविंद गोखले
श्री. र. रा. हळदणकर
,, शं. भि. गुर्जर
,, चि. स. भागवत
,, डॉ. रा वि. भागवत
सौ. लतिका गो. भट
श्री. लहू धों. पाटील
श्री. अ. द्वा. पोतडे
श्री. शशिकांत ना. गुजर
श्री. भि. ना. गोठणकर
,, र. दा. हर्डीकर
,, प्र. प. नाफडे
,, म भा. भागवत
श्रीमती राधाबाई कृ. प्रभुदेसाई
,, राधाबाई कृ. घाटे
श्री. मधुकर रामचंद्र कशाळकर
वरचावाडा उत्कर्ष मंडळ (बावकर वाडी)

## रु. ५००/- देणारे देणगीदार

मे. अेव्हरेस्ट अेजन्सीज
श्री. अ. ना. परांजपे
श्री. व. भा. शेजवलकर

श्री. मोहन पाठारे रु. ३००/-

## रु. २५१/- देणारे देणगीदार

| | | |
|---|---|---|
| श्री. अ. अ. शेजवलकर | श्री. स. वा. आगवेकर | श्री. प. बा फणसे |
| श्रीमती तारामती रा. बेलवलकर | ,, व. तु. हळदणकर | ,, अ. शं. कशाळकर |
| श्री. श्री. शं. ओळकर | ,, ग. ना. भागवत | ,, प. वि. यल्लापुरकर |
| ,, श्री. रा. हर्डीकर | सौ. मीना विनय देव | ,, एम. आर. मुळये |

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. श्री. ना भागवत | रु. २५०/- | सहिता ट्रेडर्स | रु. २०५/- |
| ,, अ. अ. आवळकर | रु. ,, | स्मीता कन्स्ट्रक्शन | रु. २०१/- |
| नम्रता कन्स्ट्रशन | रु. २०१/- | श्री. दि. वि. नाफडे | रु. २०१/- |
| तिरूपती कन्स्ट्रक्शन | रु. ,, | मोहन एन्टरप्राइझेस | रु. ,, |
| सुपर स्टील | रु. २००/- | सौ. इरावती बी. कुळकर्णी | रु. १५५/- |
| श्री. शां. धो. पाटील | रु. १५१/- | श्री. दा. ज. कळके | रु. १५१ |
| ,, श्री. ज. घुगरे | रु. ,, | ,, मोहनलाल पटेल | रु. ,, |
| ,, भा. रा. हळदणकर | रु. १२५/- | ,, श्रीपाद पी. गांगण | रु. १०७/- |
| ,, ज. म. हर्डीकर | रु. १०५/- | ,, जयवंत म. हर्डीकर | रु. १०५/- |
| ,, हि. सू. तळये | रु ,, | ,, वि. ज. ठाकुरदेसाई | रु. ,, |

## रु. १०१-०० देणारे देणगीदार

| | | |
|---|---|---|
| कु. माया ग. राडये | श्री. शं. भा. सावरे | श्री. श्री. रा. सावरे |
| श्री. ल. बा. माळी | ,, प्र. य. आवळकर | ,, शि. ना. भागवत |
| ,, म. के. ओळकर | ,, र. पां. ओळकर | ,, अ. य. जायदे |
| ,, मु. रा. कशाळकर | ,, स. श्री. हर्डीकर | ,, म. गो. राडये |
| , रा. वि. नाटेकर | ,, भा. ह. नाटेकर | ,, मा. ना. बोरवणकर |
| ,, बा. धो. फणसे | ,, स. रु. राडये | ,, नी. म. सावरे |
| ,, गो. दि. बंडबे | ,, स. वा. गोठणकर | ,, शि. ना. गोठणकर |
| सौ. गि. र हळदणकर | ,, स. भ. पळसुले | ,, शं. अ. सातोपे |
| श्री. स. ध. सातोपे | ,, मु. ल. कशाळकर | ,, य. गो. पाटील |
| ,, तु. अ. पाटील | ,, ग. गो. हळदणकर | ,, वि. अ. हळदणकर |
| ,, हि. ग. ठुंबरे | ,, अ. स. मेस्त्री | ,, श. श्री. हर्डीकर |

## रु. १०१-०० देणारे देणगीदार

| | | |
|---|---|---|
| श्री. सी. स. भोसले | श्री. स. ध. ठुंबरे | श्री. दा. रा. ठुंबरे |
| ,, तु. रा. ठुंबरे | ,, के. अ. पाटील | ,, व. गो. हळदणकर |
| ,, कृ. भि. हळदणकर | ,, बा ल. हळदणकर | ,, ब. वा. कुळकर्णी |
| ,, भि. स. शिरवडकर | ,, अ. दा. हर्डीकर | ,, द. ना. कुळकर्णी |
| ,, श्री. र. हर्डीकर | एस. व्ही. रानडे अॅन्ड सन्स | ,, भा वा. दाते |
| ,, वि. शं. कुळकर्णी | श्री. मा. श्री. जावडेकर | ,, श्री. ना. बोरबणकर |
| ,, वि. प्र. हर्षे | ,, अ. ह. देसाई | ,, एस. के. प्रभुदेसाई |
| ,, ना. वि. भागवत | ,, कल्याणबुवा रामदासी | ,, वि. भा. कशाळकर |
| ,, सु. भा. कशाळकर | ,, अ. भा. कशाळकर | ,, ह. द. मेस्त्री |
| ,, अ. गं. मेस्त्री | ,, द. वा. पाध्ये | ,, रविंद्र पिंगे |
| ,, भा. वा. दाते | ,, डॉ. प्र. शं. भागवत | |
| ,, अ. अ. आवळकर | ,, शं. गो. पळसुले देसाई | ,, ग. आ. नांदगावकर |
| ,, शां. वि. भागवत | ,, श्री. रा. कशेळकर | ,, ना. वा. पाध्ये |
| ,, वि. वा. निगुडकर | ,, गो. स. भाटवडेकर | ,, श्री. का. गुर्जर |
| ,, ज. वा. भागवत | ,, मा. ज. भागवत | ,, डॉ. दि. रा. भागवत |
| ,, बी. वाय. पाध्ये | ,, शं ना. नवरे | ,, म. वि. करंबेळकर |
| जयहिंद प्रकाशन, मुंबई | ,, व. वा. निगुडकर | ,, वि. वा निगुडकर |
| श्री. डी. एच. जैन | ,, वि. ना. महाजन | ,, चंद्रकांत भि. फोडकर |
| कै. प्रमोद र. फोडकर स्मरणार्थ गौ. र. फोडकर | | ,, मधुकर सुर्वे |
| श्री. ए व्ही. राऊत | ,, एस. एस. कावले | ,, अेरीक पिंटो |
| थोरात प्रोव्हीजन स्टोअर्स | ,, भास्कर जी. दळी (पुनस) | ,, प्रदीप धो. संसारे |
| श्रीमती मनोरमा म जगुस्टे | पाल्मसन टेलर्स | माय फेअर |
| ,, र. के. अक्षीकर | श्री सिद्धीविनायक बेनिफीट सो. प्रा. लि. | |
| श्री. द. शि. गोडबोले | श्री. अशोक चांदोरकर | एस. के. प्रिंटर्स |
| ,, भा. सो. चांदोरकर | ,, वाडकर बंधू | श्री हरीश्चंद्र बा. घाणेकर |
| जयहिंद प्रकाशन | ,, वसंत वासुदेव निगुडकर | ,, प्र. श्री. नेरुरकर |
| श्रीमती मधुवंती दांडेकर | ,, शां. के. राडये | ,, रं. म. नाटेकर |
| सौ. हेमा रा. धोपेश्वरकर | | |

,, दुर्गाबाई भागवत रु. १००/– श्री. अ ह. पेटकर रु. ७७/–

,, प्रकाश गं. पोतडे (कै. गं. भि. पोतडे स्मरणार्थ) रु. ७६/–

## रु. ५१/- देणारे देणगीदार

| | | |
|---|---|---|
| श्री. सु. व. दत्ते | श्री. ल. य. जायदे | श्री. म. य. जायदे |
| ,, भा. प. जायदे | ,, बा. गो. भोसले | सौ. मा ग. पित्रे |
| ,, ना ह. घाटे | ,, र. शि. नाटेकर | श्री. गं. जा. ठकरुल |
| ,, म. जा. ठकरुल | ,, अ. भि. मांडवकर | ,, रा. ध. मांडवकर |
| ,, ग. गं. मांडवकर | ,, ज. वि. कशाळकर | ,, भि मा. बावकर |
| ,, ब. बा. पेटावे | ,, आर डी. मिरगे | ,, र. य. यादव |
| सौ. वै व. जायदे | श्रीमती नी. य. भागवत | ,, म. का. पोवार |
| श्री. के. ध. गोठणकर | श्री. अ बा. गोठणकर | ,, दा. बा. गोठणकर |
| ,, गो. वि. सातोपे | ,, पां. के. सातोपे | ,, ना. ल. नवाळे |
| ,, य. भि. मेस्त्री | श्रीमती वा. ग. हळदणकर | ,, प्र. के. देवस्थळी |
| ,, डी. पी. गिजरे | श्री व्ही. आर. विश्वासराव | ,, र वा. सुतार |
| ,, एन. एस. तोडणकर | ,, अनिल दा. हर्डीकर | ,, दा. धो. हर्डीकर |
| ,, मधुकर गंभीर | ,, मु. शं. नांदगांवकर | ,, र. ग मुळे |
| ,, श. शं प्रभुघाटे | ,, वि. ल. वेल्ये | ,, एन. एच. घाणेकर |
| ,, एस. आर. जोटवानी | ,, सुरजमल बैजनाथ | ,, श्री. प. नाफडे |
| ,, वा. सी. निगुडकर | ,, श्री. शं. गुर्जर | ,, व. प. नाफडे |
| ,, ग. प. जायदे | ,, शं. रा मंजुरे | ,, व. रा. काकीर्डे |
| ,, र. ग. मुळे | श्रीमती एम. जी. प्रभुदेसाई | ,, शं. वि. टेंबुलकर |
| ,, श. ग. नाडकर्णी | श्री तु. गो. सुर्वे | ,, अंकुश हिरेवाला |
| एक्सेल इंड. लि (आंबोली वर्क्स शॉप) | | मेसर्स आर व्ही भोजणे |
| श्री. एस. पी. धुरी | श्री. स. रा. परब | श्री. दीपक स. पेडणेकर |
| ,, चंद्रकांत मर्गज | ,, बाबुराव देशमुख | स्टुडन्टस् एजन्सीज |
| डॉ. एम. आर. पटवर्धन | ,, शितल पाणीवाला | एन. मेघजी आणि कं. |
| श्री. मेहता किरण | ,, चित्रा भट | श्री. आर. एस. देवरस |
| ,, नि. पी. गंगण | ,, अ. व्ही. दळी | ,, सु. पी. दळी |
| ,, पंकज व्ही. दळी | ,, शाम श. दळी | रवि सायकल्स |
| ,, नारायण गणेश कळके | सौ. सरिता शशिकांत गुजर | मे. हिंद विजय स्टोअर्स |

,, रघुनाथ गणपत मुळे रु. ५०/-

टीप : वरील सर्व देणग्या १९८४ सालापासून दिलेल्या आहेत.

क्र. एस-२/ब शाळा/कोवि २८०६६/७३
कोल्हापूर दि. १६/१०/१९८५.

प्रति,
BOOK-POST: अध्यक्ष O. I. G. S.
श्री लक्ष्मीनारायण शिक्षण प्रसारक मंडळ,
कशेळी, ता- राजापूर, जि- रत्नागिरी.

विषय :- १९८५-८६ च्या शैक्षणिक वर्षात ( जून १९८५ पासून ) नवीन माध्यमिक शाळेस परवानगी देण्याबद्दल

महोदय,

शासन पत्र क्र. एसएसएन १०८५/१९५(एफ- मराठी) दि. १०/८/८५ अनुसार आपल्या संस्थेस जून १९८५ पासून इ.आठवी च्या वर्गासहित कशेळी बारचावाडा ता. राजापूर येथे मराठी माध्यमाची विनाअनुदान तत्वावर माध्यमिक शाळा सुरु करण्यास खालील अटींवर तसेच शासन पत्रातील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विशेष बाब म्हणून परवानगी देण्यात येत आहे.

अ) या नवीन माध्यमिक शाळेला ( [illegible] ) [illegible] ( १९८५-८६ ते १९८९-९० ) [illegible] ). कोणत्याही प्रकारचे अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

ब) शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे ( उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत इ. ) काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.

क) सदर संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,
[signature]
शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग कोल्हापूर कारिता

स्थळ प्रतिवर मा. शिक्षण
उप संचालक यांची स्वाक्षरी आहे

प्रत :- १) शिक्षणाधिकारी ( माध्य.) जिल्हा परिषद, रत्नागिरी
२) मा. सचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा. शिक्षण संचालक, म. रा. पुणे-१.
४) विभागीय सचिव, पुणे विभागीय मंडळ, एस.एस.सी. बोर्ड पुणे-१०.

Seen
12/11/85
Dy. E.O. 
Ratnagiri

क्र.एस-२/प्र.मान्यता/कोवि/ ५८३०-३)
कोल्हापूर, दि.- 12.9.80
80-3-

प्रति,

अध्यक्ष,
श्री लक्ष्मीनारायण शिक्षण प्रसारक मंडळ
कशेळी, ता- राजापूर जि-रत्नागिरी

विषय- प्रथम मान्यतेबद्दल -
कै विठ्ठल सिताराम गुजर विद्या. कशेळी

उपरोक्त संदर्भात शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी केलेल्या शिफारशी विचारात घेऊन कै विठ्ठल सिताराम गुजर विद्या. कशेळी या माध्यमिक शाळेस नेहमीच्या अटीवर तसेच खास करून तपासणी अहवालातील मुद्द्यांची परिणामकारक अंमलबजावणी करण्याच्या शर्तीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर करिता.

स्वाक्षरित प्रतिवर मा. शिक्षण उप संचालक यांची स्वाक्षरी जसे

प्रत- शिक्षणाधिकारी, जि.प., रत्नागिरी यांना
माहितीस्तव अग्रेषित ....

# श्री लक्ष्मीनारायण शिक्षण प्रसारक मंडळ कशेळी

## -संस्था-प्रपंच-

# विठ्ठल सीताराम गुर्जर विद्यामंदीर कशेळी

-स्थापना-

११ जून १९८५

## विद्यालयाचे यशस्वी तिसरे वर्ष

१९८७-८८

# वि.सी.गुर्जर विद्यामंदीर
# -करोळी-

(वर्ग,शिक्षक,विद्यार्थी-विद्यार्थिनी यांच्या संख्येचा सालबार तक्ता)

| वर्ष | वर्गसंख्या | शिक्षक संख्या | विद्यार्थी | विद्यार्थीनी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १९८५-८६ | १-८ वी | २ | ३१ | १६ | ४७ |
| १९८६-८७ | २-८,९वी | ३ | ४२ | २३ | ६५ |
| १९८७-८८ | ३-८ते१०वी | ५ | ६५ | ३३ | ९८ |

## वार्षिक परीक्षा निकाल

| वर्ष | इयत्ता | पटसंख्या | परीक्षेला बसलेली मुले | उत्तीर्ण संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १९८५-८६ | आठवी | ४७ | ४५ | ४३ | ९२.२% |
| १९८६-८७ | आठवी | २७ | २६ | २२ | ८४:६% |
| १९८६-८७ | नववी | ३८ | ३५ | २७ | ७७.१% |
| १९८७-८८ | दहावी | २९ | यंदाचे विद्यालयाचे | पहिले पुष्प | |

## * वार्षिक परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावून पास होणारे मानकरी

| वर्ष | वर्ग | मानकऱ्याचे नांव | शेकडा गुण |
|---|---|---|---|
| १९८५-८६ | आठवी | कु. प्रगती सदाशिव पळसुले | ७६.७% |
| १९८६-८७ | आठवी | कुमार-निनाद सदाशिव पळसुले | ८६.३% |
| १९८६-८७ | नववी | कु. प्रगती सदाशिव पळसुले | ७९.५% |

# विठ्ठल सीताराम गुर्जर विद्यामंदीर

# कशेळी-१९८७-८८

## -शिक्षक-वृंद-

१) श्री. नझीर करीम मुल्ला (मुख्याद्यापक)- बी.ए. बी.एड्.
२) श्री. अजित यशवंत कांबळे (सहाय्यक शिक्षक)-एम.ए. बी.एड्.
३) श्री. जगन्नाथ कृष्णदेव कोळेकर (सहाय्यक शिक्षक)- बी.एस्सी.
४) श्री. प्रकाश पांडुरंग घुणके (सहाय्यक शिक्षक)- बी.एस्.सी.
५) श्री. दत्तात्रय महादेव डबाळे (सहाय्यक शिक्षक)- बी.ए.

## -कार्यालय-कर्मचारी-

१) श्री. दिपक गणपत हळदणकर (ज्युनि-क्लार्क) -बीकॉम-१

## त्यांना अमुचे त्रिवार वंदन

लेखक - नशीर करीम मुल्ला, मुख्याध्यापक

लेखक आणि प्रसिध्दी विन्मुख ही गोष्ट फारच दुर्मिळ, पण असा अेक प्रसिध्दीविन्मुख लेखक म्हणजेच आमचे अण्णा गुर्जर. अण्णांच्या कथालेखनाचा अुच्चांक आजतागायत कोणीच लेखक मोडू शकलेला नाही.

खरंच, कै.अण्णांचा कथा-संग्रह जेव्हा मी वाचला त्यावेळी त्यातील प्रत्येक गोष्टीतून जीवनाला योग्य वळण देणारे अेक तत्व सिध्द होते याची जाणीव झाली.

निदान ही कथा वाचल्यावर माणसाला जीवनात योग्य सांगाती लाभला नाही तर त्याचे जीवन नीरस होते. जीवनाला कंटाळून माणूस आत्महत्याही करायला प्रवृत्त होतो हे सत्य पटविण्यासाठीं कै.अण्णा यांनी मादी विणांझीचे अुदाहरण दिले आहे व कथानायकाला त्यातून बोध घडवून आणला.

काळी गीता - या कथेत आधुनिक काळात काळाबाजार करणारे लोक ही आजच्या लोकांपुढील समस्या आहे हे विदारक सत्य पटवून दिले आहे. आज ठायी ठायी आपणाला याचा प्रत्यय येतो. खरोखरच अण्णांना द्रष्टे म्हटले पाहिजे.

सौंदर्य - या कथेत सामान्य माणसाची सौंदर्याची व्याख्या शारीरिक सौंदर्यापुरतीच मर्यादित असते, पण शारीरिक सौंदर्य हे खरे सौंदर्य नसून शरीर स्वास्थ्य व मानसिक स्वास्थ्य हेच खरे सौंदर्य आहे हे तत्व पटवून दिले आहे.

स्वर्ग - खरा स्वर्ग कोणता ? सर्वसामान्य कुटुंबात सर्व व्यवहार आटोपून सर्व कुटुंबीय मंडळी जेव्हा सुख-दुःखाच्या गप्पात रंगून जातात तेव्हा ते खरे स्वर्गसुख अुपभोगीत असतात. ही अुदात्त कल्पना अण्णांनी या कथेत पटवून दिली आहे.

कुबडी - आधुनिक जगांत शरीर व्यंगामुळे काही लोकांना कुबडी लागते. पण या कथेत अेक सून आपल्या वृध्द सासऱ्याची कुबडी बनते व सेवा करते. अजूनही भारतीय संस्कृतीला जिवंत ठेवणाऱ्या काही भगिनी या देशात आहेत. हेच सत्य अण्णांनी या कथेच्या रूपाने सिध्द केले आहे.

तिची अिच्छा - या कथेतून अशा व्यक्तीचे दर्शन घडते की जिच्या योगे अितरांचे कल्याण होते. अर्थात अितरांच्या कल्याणासाठी स्वतःवर अशा व्यक्ती अनेक संकटे ओढवून घेतात याची प्रचिती या कथेवरून येते.

जसे जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति
देह कष्टविती अपरंपार :

अशा प्रकारे केवळ मनोरंजनाच्या भावनेतून लिहिलेल्या कै. अण्णांच्या कथाही वाचकाला अनेक गोष्टी शिकवून जातात. खरेच अण्णांच्या कथा म्हणजे वाचकाला चिरसमाधान देणारा व मनोरंजन व प्रबोधन करणारा अमोल ठेवाच होय.

- नशीर करीम मुल्ला

# " वि·सी· गुर्जर विद्यामंदिराची जन्मकथा "

ले· श्री· स· भ· पकसुले·

१९८४।८५ हे वर्ष कै· वि· सी· गुर्जर व· कै· राम गणेश गडकरी यांचे जन्मशताब्दीचे वर्ष. त्यानिमित्ताने लोकसत्ते- मध्ये कै· वि· सी· गुर्जरांचा जन्मदिवस कोणता? या प्रश्नावर श्री· र· गो· सरदेसाई व· श्री· भालचंद्र चोंदोरकर यांचा पत्र व्यवहार प्रसिध्द होत होता. त्यावेळी कै· अण्णांची कर्मभूमि असलेल्या कशेळी गांवाबद्दल चर्चा चालू होती. कै· अण्णांचे रहाते घरही कशेळीत उभे राहिले नाही, ही खंत आम्हा ग्राम- स्थांच्या मनात जाचत होती· तेव्हा त्यांच्या स्मृति गांवात चिर- स्वरुपात रहाव्या या साठी काहीतरी केले पाहीजे याची जाणीव ही मनाला होत होती· कै· अण्णानी कशेळी गावच्या शैक्षणिक कार्या- त फार रस घेतला होता, व फार कष्टही केले होते. तेव्हा त्यांचे स्मारक शिक्षण क्षेत्रांतच व्हावे असे वाटत होते. त्याचवेळी कशेळी हा सुसंस्कृत लोकांचा गाव असताना येथे माध्यमिक शिक्षणाची सोय नाही ही उणीवही भासत होती. त्याच सुमारास श्री· जगन्नाथराव नाफडे कशेळीला आले होते· त्यानी कशेळीला हायस्कूल काढीत असल्यास मदत करतो असे सांगितले· तसेच ते स्वत: मे· जिल्हा शिक्षणाधिकारी, रत्नागिरी याना माझ्याबरोबर येऊन प्रत्यक्ष भेटले, व त्याना विनंती केली की, आपण हायस्कूल ला मंजूरी द्यावी· या नंतर हायस्कूल स्थापनेची चक्रे भराभर फिरू लागली,

ता· २३।११।१९८४ रोजी " श्री लक्ष्मीनारायण शिक्षण प्रसारक मंडळाची " वार्षिक साधारण सभा घेण्यात आली व कशेळीत कै· वि· सी· गुर्जर यांचे नावाने हायस्कूल स्थापन करण्याचा ठराव करण्यात आला· ता· २४।११।८४ रोजी श्री देव कनकादित्य मंदिरात संपूर्ण गावाची सभा घेण्यात आली· व "विठ्ठल सीताराम गुर्जर विद्यामंदिर " हायस्कूल जून १९८५ या शैक्ष- णिक वर्षापासून सुरू करण्याचा ठराव एकमताने करण्यात आला. तसेच या कार्यासाठी गावातून देणग्या गोळा करण्याचे ठरविण्यात आले· हायस्कूल मंजूरीसाठी शासनाकडे जरुर तो अर्ज ठरा- विक नमुन्यात फि सह दाखल करण्याचे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे दि· ४·१२·८४ रोजो स्टेट बँक ऑफ इंडिया चे रत्नागिरी शाखेत रुपये २५।- चे चलन भरून तीन प्रतीत

अर्ज सोबत सर्व माहितीसह माननीय जिल्हा शिक्षणाधिकारी, रत्नागिरी, याचेकडे दाखल करण्यात आला. वरील सभेत ठरविल्याप्रमाणे ता० १८-५-८५ रोजी ग्रामस्थाची सभा घेऊन कै. वि. सी. गुर्जर यांची जन्मशताब्दी साजरी करण्यात आली. सदर समारंभाला गावातील सर्व प्रतिष्ठीत तसेच सर्व थरातील लोक उपस्थित होते. कै. अण्णा गुर्जर यांचे बद्दल अनेक वक्त्यांनी गौरवपर भाषणें केली. महाराष्ट्र शासनातर्फे दि.२६ मे १९८५ रोजी पुणे येथील बालगंधर्व मंदिरात कै. राम गणेश गडकरी व कै. वि. सी. गुर्जर यांच्या पत्नींचा सत्कार मुख्यमंत्रि मा. ना. वसंतदादा पाटील यांचे हस्ते संपन्न झाला. त्यावेळी श्री० चाँदोरकर व मी त्या कार्यक्रमाला हजर राहिलो. व. मा. ना. वसंतदादा पाटील, मुख्यमंत्रि, व. मा. ना. विलासराव देशमुख, शिक्षणमंत्रि, महाराष्ट्र राज्य, यांना भेटून वि. सी गुर्जर विद्या मंदिरास मान्यता देण्याची विनंती केली. पण मंत्रिमंडळाने एकाही हायस्कूलला या पुढे मान्यता द्यायची नाही असा निर्णय घेतल्यामुळें मान्यता देता येणार नाही असे मा. ना वसंतदादा पाटील यानी सांगितले. त्यामुळें निराश होऊन आम्ही परत फिरलो. पण पुढे महिनाभरांत मंत्रिमंडळ बदलले व. मा. ना. शंकरराव चव्हाण, मुख्यमंत्रि झाले. तसेच मा. ना. प्रा. राम मेघे शिक्षण मंत्रि झाले. त्यानी एकशे पंचवीस हायस्कूलना विना अनुदान तत्वावर मान्यता देण्याचे ठरविले. त्यात आमचे हायस्कूल व तालुक्यातील ससाळे हायस्कूलला विना अनुदान तत्वावर पाच वर्षं चालविण्याच्या अटीवर मान्यता मिळाली. या कामी तालुक्याचे आमदार मा. भाईसाहेब हातणकर व जिल्ह्याचे पालक मंत्रि मा. ना. भाईसाहेब सावंत यांची फार मदत झाली. पण याही ठिकाणी मोठी अडचण आली ती म्हणजे आमचे हायस्कूलचे प्रपोजल मे. जिल्हा शिक्षणाधिकारी, रत्नागिरी यांचे कडून मंत्रालयात आलेच नव्हते. तेव्हा खास आदेश घेऊन रत्नागिरी येथे प्रपोजल पूर्ण करून सर्व कागदपत्रांसह व शिफारसीशह रत्नागिरी व कोल्हापूर हून मंत्रालयात आणण्याची व्यवस्था करावी लागली. हे काम करण्यासाठी मुंबईला तीन खेपा कराव्या

लागल्या. पण एकदाची शासनाची मान्यता मिळाली. ही मान्यता मिळाली नसती तर फार मोठी अडचण आली असती कारण मे. जिल्हा शिक्षणाधिकारी रत्नागिरी, यानी 'विठ्ठल सीताराम गुर्जर विद्या मंदिर" हे हायस्कूल अनधिकृत असून त्यामध्यें कोणीही मुलांना पाठवूनये. पाठविल्यास त्यांची जबाबदारी शासनावर राहणार नाही अशी नोटीस जिल्ह्यातील वर्तमान पत्रातून प्रसिध्द केली होती. ही नोटीस जाहिर झाली तरीही ग्रामस्थ-पालक यांचा हायस्कूल चालविण्याचा निर्धार एवढा जबरदस्त होता की, सर्वांनी मुले हायस्कूलमध्यें पाठविणे चालूच ठेवले. आम्ही हायस्कूलचे चालक आमदार भाईसाहेब हातणकर व पालक मंत्रि मा.ना. भाईसाहेब सावंत यांचे शब्दावर विश्वास ठेऊन हायस्कूल चालवित होतो. शेवटी ता० १६/१०/१९८५ ची मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर यांची क्र/एस/२/न.शाळा/को.वि २००६९/७३ ची विशेष बाब म्हणून हायस्कूलला मंजूरी दिल्याबद्दल पत्र दि० २४/१०/८५ रोजी आम्हाला मिळाले. व प्रदीर्घकाळ कै. वि. सी. गुर्जर यांचे स्मारक हायस्कूलचे ~~मंजूर~~ मंजूरीसाठी चाललेली धडपड थांबली. व कशेळी गावचे शैक्षणिक जीवनात एका नवीन पर्वाची सुरवात झाली. कथेचे औत्सुक्य वाढविण्यासाठी रहस्याचा वापर करून शेवटी आनंद पर्यवसायी कलाटणी देऊन वाचकाना सुखद धक्का देणाऱ्या या कथा लेखकाचीं 'स्मारक' हायस्कूलच्या बाबतीतही तसाच रहस्यमय व विस्मय कारक आनंदाचा सुखद धक्का चालकाना मिळावा ही परमेश्वरी इच्छाच म्हणावी लागेल.

☆ विनम्र श्रध्दांजली ☆

दिनांक १९ सप्टेंबर १९८७ हा दिवस म्हणजे आप्पांच्या स्मृतीचा. त्यांच्या या २५ व्या स्मृतिदिनी आम्हां शिक्षक-वृंदांकडून भावपूर्ण श्रध्दांजली.

शिक्षकवृंद
वि. सी. गुर्जर विद्यामंदिर, कशेळी.

# - कथासम्राट वि.सी. गुर्जर -

आमचे अण्णा आम्हाला सोडून गेल्याला आज २५ वर्षे झाली. त्यांच्या अखेरच्या काळात त्यांचा अगदी जवळचा संबंध आल्यामुळे १९७३ ते १९६२ च्या काळात अनेक वेळा त्यांच्या घरी जाऊन, चहा पिऊन त्यांचेशी चर्चा करण्याची संधी मिळाली. अर्थात आमची चर्चा ही घरगुती बाबी, त्यांच्या घरगुती अडचणी, त्याना आवश्यक असलेल्या वस्तू, व त्याना इतरांकडून होणारा त्रास या संबंधातच असायची. साहित्याबद्दल चर्चा करण्याचे माझे वय नव्हते. व एखादवेळी एखाद्या कथेच्या बाबतीत कुतुहल असले तरी आदरयुक्त भीतीमुळे विषय काढण्याचे मुळीच धाडस झाले नाही.

त्यापूर्वी १९४२ ते १९५२ या काळात कशेळीला शाळेत शिकत असताना शाळेत जाताना अगर येताना अनेकवेळा त्यांची वाटेत भेट व्हायची. उंचीने कमी, देहयष्टी कृष पण ताठ खांद्यावर मानेच्या पाठीमागून छत्री अगर काठी आडवी घेऊन त्यावर दोन बाजूला दोन हात टाकून एखाद्या यंत्राप्रमाणे चालणारे अण्णा त्यावेळी आम्हा शाळकरी मुलाना हिमालया एवढे वाटायचे. त्याना लांबून पाहिल्यावर आम्ही मुले रस्त्याच्या दोन हात दूर उभी राहून असू. शाळकरी जीवनात विद्यार्थ्याची आपले गुरुजी म्हणजे या जगातील सर्व श्रेष्ठ व्यक्ती अशी भावना असते. पण कै. अण्णा शाळेत आल्यावर गुरुजींची झालेली थरकांप अवस्था पाहिली की "अण्णा म्हणजे कोणीतरी या जगातील "कर्तुमकर्तुम" शक्ती आहे असा भास आम्हाला होई.

कै. अण्णा थोडेसे अलिप्त जीवन जगले. म्हणून त्यांचे बाबतीत अनेकांचे गैरसमजही होते. पण कै. अण्णानी ज्यांचेशी संबंध ठेवले त्याना त्यानी आपले सर्वस्व दिले. त्यांच्या घराजवळील, अनेक गरीब कुटुंबाना त्यानी अनेक प्रकारे मदत करून त्यांचे प्रेम संपादन केले होते. त्यामुळेच कशेळी गांवच्या त्या एका टोकाच्या घरी कै. अण्णा मुंबईला आल्यावर ४।५ महीने एकट्याने रहाणे ती. माईना (श्रीमती इंदिराबाईना) शक्य झाले. पूर्वीच्या काळात ऋषिमुनीनी वेद, उपनिषदे, चरक संहिता, भृगुसंहिता वगैरे संशोधन ग्रंथ लिहिले त्यानाही समाजापासून अलिप्त जंगलात राहून हे कार्य करावे लागले होते.

के. अण्णानाही त्यांच्या अलिप्तवासामुळेंच हजारावर कथा, दहा नाटके, तीसहून अधिक कादंबऱ्या बंगाली व इंग्लीश कादंबऱ्यांचे मराठी रुपांतर एवढा साहित्य संभार लिहिणे शक्य झाले

त्यांच्यातील सुप्त समाजाभिमुख व भावनिक प्रवृत्ती त्यांच्या गांवच्या स्कूल कमिटीवर अनेक वर्षे केलेले काम, गाव च्या सहकारी सोसायटीला वेळोवेळी केलेले मार्गदर्शन, मराठी शाळेची इमारत बांधण्याचे कामी घेतलेला पुढाकार, त्यावेळी कशे-कीत चालू असलेल्या के. ज. वि. सावरे यांच्या 'कशेळी इंग्लीश स्कूल' या हायस्कूलच्या कार्यात त्यानी केलेली मदत, लाडकी नात मृत झाल्यावर तिच्या अंत्यविधीच्या जागी रोज भेट देणे ज्ञातीतील कोणीही मृत झाल्यास अंत्यविधीला न चुकता हजर राहणे या त्यांच्या कार्यामुळें त्यावेळीही प्रकट होत होत्या.

त्यांच्या अलिप्त वागणुकीला त्यांच्या चिरंजीवांचे अल्प वयात झालेले अकाली निधन लाडक्या नातीचे निधन या दुःखपर घटनाही काही प्रमाणात कारणीभूत झाल्या असाव्या त्यांच्या आयुष्यात वक्तशीरपणा, काटकसर व हिशोबीपणा हे गुण प्रकर्षाने जाणवत असत. त्याना पुरविलेल्या वस्तूंचे पैसे ते आणा पैशात पुरे देत असत. रुपयाचे वरील पैसे राहू देत असे म्हटले तर त्यानी कधीच मानले नाही त्यानी आयुष्यांत कुणाकडून कांही बेहिशोबी घेतले नाही. अगर कुणाला काही बेहिशोबी दिले नाही.

प्रत्येक माणसाच्या आयुष्यांत कांही मर्मस्थानें असतात. त्या प्रमाणे के. अण्णांच्या आयुष्यातही सभाकंप व परीक्षा कंप ही मर्मस्थाने होती. त्यामुळे त्यानी कधीच कोणत्या सभा संम्मेलनात भाग घेतला नाही. अगदी त्यांचा सन्मान करण्या साठी साहित्यसंघात योजलेल्या सभेला व मालवण येथील साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून त्यांची नेमणूक झाली असताही ते दोनही ठिकाणी गेले नाहीत. त्यांची प्रसिध्दी कमी होण्याला ही एक बाबही कारणीभूत असावी ते बी. ए. पर्यंत शिकले उत्तम अभ्यास असूनही परिक्षेच्यावेळी त्याना कंप सुटे म्हणून ते परीक्षेला बसू शकले नाहीत. तरीही त्यानी लिहिलेली पुस्तके बी. ए. च्या अभ्यासक्रमासाठी लावलेली होती.

के. अण्णाना लेखन कार्याचा वारसा त्याचे वडील के.

कै. सीताराम बाबाजी गुर्जर यांचेकडूनच लाभला होता. असे म्हणणे योग्य ठरेल. कै. सीतारामपंत हे सुध्दा एक नाणावलेले लेखक होते. दामाजीच्या चरित्रावरील "उद्धार दामाजी" हे गद्य नाटक व "रत्नावली" हे संगीत नाटकही त्यानी लिहिले आहे. तसेच 'सीता' ही त्यांची मोठी पौराणिक कादंबरीही प्रसिध्द झालेली आहे. त्यानी बाणभट्टाच्या "कादंबरीच्या उत्तरार्धाचे मराठीत रूपांतर केले होते. त्यामुळे संस्कृतचा वारसाही कै. अण्णांकडे आला होता.

कै. अण्णांशी प्रत्यक्ष ९ वर्षाच्या सहवास असला तरी मी त्याना एक मनोरंजक कथालेखक व एकच प्याला "नाटकाची पदे लिहिणारे म्हणूनच ओळखत होतो. याची प्रथमच कबुली दिली पाहिजे. त्यांच्या लेखन कार्याचा अभ्यास करण्याची संधी मिळाली ती आम्ही त्यांचे स्मारक म्हणून कशेळी येथे त्यांचे नावाने " विठ्ठल सीताराम गुर्जर विद्या मंदिर " या हायस्कूलची स्थापना केल्या नंतरच. हायस्कूलची स्थापना केल्यावर मी कै. अण्णांचे एक चाहते श्री. वा. ल. कुळकर्णी यांचेकडे गेलो. त्याना आमची योजना सांगितली. तेव्हा त्यानी आमचे गावकऱ्यांचे या कार्याबद्दल कौतुक केले. व कै. अण्णांची "ध्रुव" मासिकांत १९३९ साली प्रसिध्द झालेली दीर्घ मुलाखत त्यानी मला दिली. तसेच नायगांव येथील मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयामध्यें कै. अण्णांच्या लेखन कार्याविषयी निरनिराळ्या मासिकात प्रसिध्द झालेले लेख जतन करून ठेवलेले आहेत. तेथे गेल्यास श्री. अच्युत तारी हे माहिती देतील. असेही त्यानी सांगितले. त्याप्रमाणे मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात गेल्यावर तेथें व्यवस्थित बाइंड केलेली ८।५ पुस्तकेच माझ्या समोर ठेवण्यात आली. त्यामध्यें मनोहर, प्रतिष्ठान, दीप. लक्ष्मी, सह्याद्री या मासिकांचे जुने अंक होते. त्यामध्ये प्रा. म. ना. अदवंत, प्रा. वा. ल. कुलकर्णी व वा. रा. ढवळे यांचे कै. अण्णा गुर्जर यांचे लेखन कार्याविषयी प्रदीर्घ लेख, प्रा. वा. ल. कुळकर्णी यांचा कै. अण्णांशी झालेला पत्र व्यवहार हे सर्व वाचल्यावर कै. अण्णांच्या लेखन कार्याची खरी माहिती मिळाली. एका थोर साहित्यमहर्षीच्या कार्याचा अभ्यास करताना ६ तास केव्हा गेले ते समजलेच नाही. ग्रंथसंग्रहालयाचे वाचनालयातून बाहेर पडताना 'युरेका युरेका' म्हणून आनंदाने बेहोष होऊन नाचणाऱ्या न्यूटनची आठवण झाली.

व त्या आनंदाच्या भरातच कै. आण्णांच्या स्मारकासाठी प्राणपणाने कार्य करण्याची प्रतिज्ञाही नकळत केली गेली.

कै. लहानपणापासून कथा वाचनाचा छंद होता. वडील कै. सीतारामपंत हे स्वतः उत्तम लेखक असल्यामुळे त्याना अनेक पौराणिक पुस्तके, व कथा पुस्तके भेटी दाखल मिळत असत. ती वाचण्यामुळेच त्याना कथा या वाङ्मय प्रकाराने आकर्षित केले. तरीही त्यांच्या लेखन कार्याला प्रारंभ झाला तो कविता लेखनाने च। त्यांचे जीवलग मित्र कै काशिनाथपंत मित्र यांच्या खास आग्रहावरून कै. अण्णा कथा लेखनाकडे वळले. कै. मित्र यानी त्यांच्या पहिल्या कथेपासून त्याना मोबदला देणे सुरु केले; त्यामुळे तर अधिकच प्रोत्साहन मिळाले. मनोरंजन मासिकात मराठीत भाषांतरीत केलेल्या बंगाली व इंग्लीश कथा कै आण्णाना फार आवडायच्या बंगाली भाषांतरीत कथा इतक्या सुरस मग मूळ कथा किती चांगल्या असतील अशी जिज्ञासा त्यांच्यात उत्पन्न झाली त्यासाठी त्यानी बंगाली भाषा शिकण्याचा निश्चय केला याबाबतीतही त्याना त्यांचे मित्र कै काशिनाथपंत मित्र यांनी मार्गदर्शन केले. त्यांचे मार्गदर्शन व बंगाली मराठी मार्गदर्शक यांचे मदतीने एका वर्षात ते बंगाली भाषा उत्तम प्रकारे शिकले. कै हरिभाऊ आपटे यांच्या स्फूट कथांचे युग संपले व १९२० चे सुमारास, कै. अण्णांच्या कथांचे युग सुरु झाले. त्यांच्या लिखाणावर बंगाली लेखक कै प्रभात कुमार मुखर्जी यांच्या लिखाणाची छाप पडली होती. कै प्रभातकुमार मुखर्जींना ते आदर्श कथा लेखक म्हणून गुरुस्थानी मानीत. ललीत वाङमयाचा उद्देश वाचकाला निरागस आनंद देणे एवढाच आहे व असला पाहिजे असे ते मानीत रंजकत्व व रसवत्ता हेच गुण प्रामुख्याने असल्या लेखनात असले पाहिजेत, वाचकाला शुद्ध सात्विक आनंदाचा उपभोग कोणत्याही सामाजिक राष्ट्रीय प्रबोधनाशिवाय घेता आला पाहिजे अशी त्यांची धारणा होती. संपूर्ण कथा वाचण्याची गोडी लावून वाचकांना आकर्षित करण्याचे कार्य गुर्जर कथानी केले. वाचकाची उत्कंठा वाढविण्यासाठी रहस्य उत्पन्न करायचे व शेवटी अगदी अनपेक्षित कलाटणी देऊन विस्मयकारक आनंदाचा धक्का वाचकाला द्यायचा हे ओ हेन्री यांचे तंत्र कै. अण्णानी आत्मसात केले होते. आनंदपर्यवसायी व विनोदी कथा लिहिण्याकडे त्यांच्या मनाचा कल होता. शोक दुःखमय लिखा

लिखाणाने वाचकाच्या मनावर वेळी भव्य व उदात्त परिणाम होतो खरा परंतु नंतर बराच वेळ मन उदास व निरानंद रहाते. असे झाले म्हणजे आपल्या व्यावहारिक विविध दुःखात आणखी शोकमय वाङ्मय सेवनाच्या दुःखाची भर घालून जीवन नीरस करण्यापेक्षा आनंद रसपूर्ण वाङ्मय समाजाचे सांसारिक जीवन सुसह्य बनविण्यासाठी अधिक उपकारी व हितकर आहे; अशी कै. अण्णांची मनोधारणा होती. त्यामुळेच त्यांना मार्कट्वेन व डब्ल्यू. डब्ल्यू. जेकब हे इंग्लिश लेखक व बंकिमचंद्र चटर्जी, रमेशचंद्र दत्त, रवीन्द्रनाथ ठाकुर, शरदचंद्र चटर्जी या बंगाली लेखकांच्या लिखाणाने आकर्षित केले. या लेखकांच्या कथा कादंबऱ्यांची रूपांतरे करण्याचा जणू कारखानाच अण्णांनी १९१० ते १९३० या काळात चालविला. त्यांचे चतुर व मार्मिक संवाद, नर्मविनोद व प्रसन्न भाषाशैली यामुळे त्यांनी वाचकांना आपल्या कथांचे अक्षरशः वेड लावले. 'पौर्णिमेचा चंद्र' 'देवता' या कादंबऱ्या, 'द्राक्षांचा घोस' हा कथासंग्रह शिवाय मनोरंजन, रत्नाकर, यशवंत या मासिकातील असंख्य कथा कै. अण्णांनी लिहून प्रसिद्ध केल्या.

कै. अण्णा गुर्जरांचे एक चाहते प्रा. वा. ल. कुलकर्णी यांनी एकदा त्यांना पत्र लिहून त्यांच्या लेखन कार्यासंबंधी संशोधन करण्यासाठी व अभ्यासासाठी माहिती विचारली त्या संदर्भात कै. अण्णा व प्रा. कुलकर्णी यांच्यात झालेल्या पत्रव्यवहारावरून कै. अण्णांचा आपल्या लेखनकार्याकडे पाहण्याचा पाहण्याचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. प्रतिष्ठान मासिकाच्या मे १९६६ च्या अंकात प्रसिद्ध झालेला १९५५ ते १९५८ सालातील हा पत्र व्यवहार संपूर्णपणे लिहिणे शक्य नसले तरी त्यातील कै. अण्णांची काही वाक्येही त्यांचेबद्दल बरेच काही सांगून जातात. कै. अण्णा लिहितात "माझ्या लेखनकार्याचे स्वरूप स्पष्ट करताना त्याचा जो काही बरेवाईटपणा आपणाला आढळून येईल; तो अभ्यासाने सूक्ष्म निरीक्षण करून आपण लिहिणार केवळ फॅशन म्हणून, ठोकळेबाजपणाने नव्हे अशी खात्री होऊन आपल्या या लेखन समालोचना संबंधाने मी निर्धास्त झालो आहे; आणि त्याची मार्गप्रतीक्षा करीत आहे. माझ्या गोष्टींचा एकच संग्रह 'द्राक्षांचा घोस' प्रसिद्ध झाला हा केवळ माझ्या स्वभावाच्या एका दोषाचा परिणाम आहे. कोणत्याही प्रकाशकाला माझ्या गोष्टींचा संग्रह काढण्यासंबंधाने मी कधी चुकूनही विचारले नाही. एवढेच काय पण कोणत्याही नियतकालिकाने मागितल्याशिवाय मी कधी त्याला गोष्ट किंवा लेख पाठविला नाही. याचना अगदी माझ्या स्वभावधर्माविरुद्ध आहे. माझ्या साहित्य सेवेतील स्मृति लिहिण्याबद्दल आजपर्यंत अनेक मित्रांनी (अत्रे, फडके, वरेरकर, वसंत शां. देसाई इ.) आग्रह केला पण माझ्या स्मृति लेखाने मराठी वाङ्मय व महाराष्ट्रावर काही परिणाम होईल असे मला वाटत नाही. (हा दंभ नव्हे प्रांजळपणे लिहितो) तेवढा मी खरोखरच मोठा नाही. आपण मला माहिती विचारून तसदी देत आहा असे मला मुळीच वाटत नाही. आपल्या सरळपणाच्या जिज्ञासू बुद्धीबद्दल मला कौतुक व आदरच वाटतो. प्रत्यक्ष भेटीचा योग जमल्यास लवकरच येईल. माझ्या प्रकाशित गोष्टी —

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) | मनोरंजन | १२३ | (२) | विविधवृत्त | २१० |
| (३) | नवाकाळ | ४२ | (४) | राशवंत | ३९ |
| (५) | चित्त विनोद मासा | ३१ | (६) | सत्यकथा | २७ |
| (७) | वसंत | २३ | (८) | नवयुग (अत्रे) | २० |
| (९) | लोकसत्ता | १३ | (१०) | समीक्षक (डॉ. भालेराव) | १ |
| (११) | समीक्षक (अत्रे) | ८ | (१२) | त्रिकाळ (पुणे) | ११ |
| (१३) | चित्रमय जगत् | १० | (१४) | स्फूर्ती | ९ |
| (१५) | किर्लोस्कर | ६ | (१६) | मनोहर | ८ |
| (१७) | सह्याद्री | ६ | (१८) | झंकार | ५ |
| (१९) | हंस | ३ | (२०) | मोहिनी | ६ |
| (२१) | उषःकाल | २ | (२२) | खेळगडी | ३ |
| (२३) | विहार | ४ | (२४) | रत्नाकर | २ |
| (२५) | वसुंधरा | २ | (२६) | करमणूक (हरीभाऊ) | २ |
| (२७) | करमणूक (नवी) | १ | (२८) | अरविंद (डॉ. भालेराव) | ३ |
| (२९) | उद्यान | ४ | (३०) | अरुण | २ |
| (३१) | मौज | १ | (३२) | तुतारी | १ |
| (३३) | सहस्रकर | १ | (३४) | नवयुग (मासिक - पुणे) | १ |
| (३५) | राष्ट्रमत (मुंबई-पुणे) | १ | (३६) | प्रमोद | २ |
| (३७) | मधुकर | १ | (३८) | खेळगडी (पूर्वीचा) | १ |
| (३९) | बृहन्महाराष्ट्र (कलकत्ता) | १ | (४०) | विहंगम | २ |
| (४१) | सुबोध (गोवा) | १ | (४२) | काळ (पुणे) | ४ |
| (४३) | वसंत (जुना) | १ | (४४) | नवजीवन | १ |
| (४५) | कौमुदी | १ | (४६) | साहित्य | १ |
| (४७) | नवभारत | १ | (४८) | प्रसाद (य. गो. जोशी) | १ |
| (४९) | ज्ञानप्रकाश | १ | (५०) | बकुळ | १ |
| (५१) | मकरंद | १ | (५२) | वाङ्मय शोभा | १ |
| (५३) | सर्वोदय | १ | (५४) | तिकोनी | १ |
| (५५) | विसावा | १ | (५६) | संपत्ति योग | १ |
| (५७) | धनुर्धारी | १ | (५८) | प्रवासी | १ |
| (५९) | नवा मनु | १ | (६०) | बलवंत | २ |
| (६१) | कथा सृष्टी | १ | (६२) | चिकित्सक | १ |

ही प्रसिद्ध झालेल्या गोष्टींची जंत्री. शिवाय पोष्टात नियतकालिकांकडे, हरवलेल्या व राहून विसरून गेलेल्या, आल्याच नाहीत म्हटलेल्या, जवळ लिहून ठेवलेल्या व नूतन नियतकालिकांकडे पाठविलेल्या गोष्टी आहेत. त्यांची व वरील गोष्टींची एकंदर संख्या आतापर्यंत स्थूलमानाने ७०० आहे.

या यादीवरून सहज लक्षात येईल की, त्या काळातील एकही मराठी नियतकालिक असे नव्हते की, ज्यामधून कै. अण्णांच्या कथा प्रसिद्ध झाल्या नाहीत. मालवण येथील साहित्य संमेलनानंतर पाठविलेल्या पत्रात कै. अण्णा लिहितात :—

" अजूनही मी आजारीच आहे. त्यामुळे सत्कारा प्रीत्यर्थ मालवण सम्मेलनाच्या पदाधिकाऱ्यांचे अत्यंत आदराचे व आग्रहाचे निमंत्रण असताही मी तेथे जाऊ शकलो नाही. तरी सम्मेलनाचे महावस्त्र पाठवून माझा सन्मान केला हे बहुधा आपणाला विदित असेल. आपल्या अध्यक्षीय भाषणात मजबद्दल काढलेल्या प्रशंसोद्गाराबद्दल आपले आभार मानावे तेवढे थोडेच होतील. अगदी मनःपूर्वक लिहितो की, त्या उद्गारांना पात्र होण्याइतकी माझी योग्यता नाही. आपल्या थोर मनामुळे हे उद्गार निघाले आहेत इतकेच। आपल्या भाषणाबद्दल चिकित्सा करण्याची माझी पात्रता नाही. परंतु ते "नवीनां"ना मानवणारे फारसे नाही खरे मात्र माझ्या ताबडतोब ध्यानी आले -

वरील सर्व पत्रातील मजकुरावरून त्यांची स्वतःच्या लेखनकार्याबद्दल विनयशील वृत्तीच दिसून येते. त्यांनी एवढे प्रचंड लेखनकार्य करूनही त्यांची व्हावी तशी प्रसिद्धी झाली नाही त्याचे कारण त्यांची प्रसिद्धी पराङ्मुख प्रकृतीच होय असे म्हणावे लागेल. तसेच एके काळी तरुण पिढीला वेड लावणाऱ्या त्यांच्या कथा पुढे वाचकांच्या विस्मृतीत दडून गेल्या या गोष्टीलाही काही कारण मिमांसा आहे.

आकर्षक सुरुवात, परिणामकारक शेवट व उत्कंठा वाढविणारे रहस्य याचे जनक अण्णाच। जीवनातील तीव्र संघर्ष व त्याची उकल अण्णांच्या कथेत दिसत नाही. त्यांची कथा वाचकाला सुखावते पण अस्वस्थ अंतर्मुख करीत नाही. रहस्यमय कथांचे आकर्षण रहस्य समजेपर्यंतच असते. एकदा रहस्य समजले की ते परत वाचावेसे वाटत नाही. सौंदर्यरसनिर्मिती व वाचकांचे सात्त्विक मनोरंजन एवढा एकच हेतू डोळ्यासमोर ठेवून आपण कथालेखन करीत आलो असे कै. अण्णा म्हणत. थकल्या भागल्या मनाला काही क्षण आनंद देण्याचे एकमेव कार्य आपल्या कथा करतात असेही ते म्हणत, त्या निकषाला मात्र त्यांच्या कथा पुरेपुर उतरतात. त्यांच्या अनेक कथा बंगाली व इंग्रजी कथांच्या रूपांतरित कथा असल्या तरी देशील परिस्थितीनुरुप मूळ कथानक कायम ठेवून अण्णांनी त्या कथांना कलाटणी दिली, त्यामुळे त्यांच्या कथा रूपांतरित कथा असल्या तरी तशा न वाटता स्वतंत्रच वाटतात. पण शेवटी क्षणिक मनोरंजन या हेतूने

केलेले लिखाण क्षणिक आनंदासाठीच वाचण्यात येऊन कालांतराने वाचकांच्या विस्मृतीत दडून गेले असेच म्हणणे क्रमप्राप्त आहे

काही वर्षांच्या सुप्तावस्थेनंतर कै. अण्णांच्या लेखन-कार्याचे संशोधन करण्याचे विचारमंथन सध्या सुरू झाले आहे. कॉलेजातील तरुण तरुणी यांचे प्रणय व नवपरिणित दांपत्याचे प्रेमप्रसंग यावर आधारित असलेले त्यांचे कथालेखन एकविसाव्या शतकातील तरुणांनाही नक्कीच आकर्षित करील. पण त्या कथा आजच्या समाजापुढे आल्या पाहिजेत. श्री. प्रा. भीमराव कुलकर्णी यांनी गुर्जरकथा हे निवडक कथांचे पुस्तक लिहून तसा प्रयत्न केला आहे. वरील यादीतील ७०० कथांपैकी काही कथा पुनर्मुद्रित झाल्यास आजचा तरुणवर्गही त्यांचे स्वागतच करील अशी खात्री आहे. वि. सी. गुर्जर विद्यामंदिर केवळ कै. अण्णा गुर्जरांचे नावच घेत न बसता त्यांचे लिखाण शोधून काढून ते परत समाजासमोर आणून आजच्या धकाधकीच्या जगात निर्भेळ आनंद उपभोगण्याची संधी नवतरुणांना देईल एवढीच खात्री कै. अण्णांच्या पंचविसाव्या स्मृतिदिनी देऊन कै. अण्णांना ही भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो!

सदाशिव भगवंत पळसुले.
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या
सौजन्याने

# गुर्जर घराण्याची वंशावळ



# आम्ही आभारी आहोत.

सर्व देणगीदार

सर्व जाहिरातदार

ग्रामस्थ व हितचिंतक

अमेय प्रिंटर्स

रंग शारदा प्रतिष्ठान

रविंद्र नाट्य मंदिर व्यवस्थापक व कर्मचारी वर्ग

सर्व नाट्य रसिक

सर्व तळमळीचे कार्यकर्ते

कै. वि. सी. गुर्जरांचे नातलग

## खास आभार

श्री. माधव गडकरी

श्री. रविंद्र पिंगे

श्री. मधु मंगेश कर्णिक

श्री. भालचंद्र चांदोरकर

श्री. सुधाकर घाणेकर

आमदार हातणकर

सर्व पत्रकार, मुंबई आकाशवाणी व दूरदर्शन

– हार्दिक शुभेच्छा –



## ज्योती सॉ मिल्स

## दीपक राइस ॲन्ड फ्लोअर मिल्स

## आरती इलेक्ट्रीकल्स

## प्रसाद न्यूज सर्व्हिस

## कीर्ती बुक स्टॉल

## प्रगती स्टील सेंटर

## निनाद इंडस्ट्रीज

मु. पो. कशेळी, ता. राजापूर
जि. रत्नागिरी

**प्रोप्रा. सदाशिव भगवंत पळसुले**

For your requirement of :

Nickel Formate, Sodium bisulphate,

Cobalt Salts

**M/s. TIME CHEMICALS**
**PVT. LTD.**

SHIVAJI UDYOG NAGAR, MANPADA ROAD,
DOMBIVLI (EAST), DIST : THANE.    TEL. : 5121709

Printed by : **AMEYA PRINTERS**, Opp. United Inks, Subhash Road, Vile Parle (E), Bombay-400 057.